# माणूस

संप पुरवणी पृष्ठ...२५

शनिवार
१० एप्रिल १९८२

किंमत
१॥ रुपया




## चंद्रपूर धुमसते आहे....लोक पोलिसांविरुद्ध का खवळले ?

विशेष लेख पृष्ठ....८।९।१०

# सप्रेम नमस्कार..

¤ दि. १३ व दि. २० मार्च या आठवड्यांचे आपले 'माणूस' अंक केवळ super होते. दि. १३ च्या अंकातील कै. नरहर कुरुंदकर यांच्या दृष्टिकोनातून 'उद्याचा राजकीय भारत' हा लेख वाचून असे वाटले की, आपण केवढा मोठा विचारवंत गमावला आहे. 'साता उत्तराची कहाणी' या पुस्तकावरील श्री. एम. एच. दळवी यांचे पत्र अतिशय उत्तम वाटले. आज जे कोणी विचार वंत म्हणून समजले जातात त्यांच्या विचारसरणीचे अतिशय मार्मिक असे Analysis श्री. दळवी यांनी केले आहे. हे विचारवंत जरी प्रामाणिक असतील तरी असा काही दुसरा विचार असू शकेल याची त्यांना जाणीव झालेली नाही आणि याचे कारण म्हणजे Lack of Communication.

दि. २० च्या अंकातील 'मुंबई मराठी लोकाची, ठीक आहे. मग भारत कोणाचा ?' हा लेख विचारप्रवर्तक आहे.

जाकोबो टिमरमन यांच्या आत्मकथेचा संक्षिप्त अनुवाद फारच छान वाटला.

मी 'माणूस'चा जन्मापासून आज तागायतत वाचक आहे याचा मला सार्थ अभिमान आहे.

२५ मार्च — श्रीराम अनंत केतकर, मुंबई

¤ तुमचे लागोपाठ दोन अग्रलेख नितांत वाचनीय होते, त्याबद्दल अभिनंदन करण्यासाठी हे पत्र !

रामभाऊ म्हाळगीबद्दलचा आपला लेख सर्वार्थाने सुंदर होता. विशेषत. प्रचलित राजकारणाच्या पार्श्वभूमीवर—राजकीय नेत्यांच्या पार्श्वभूमीवर आपल्याला भावलेले रामभाऊंचे वेगळेपण व ज्या मुशीत रामभाऊमधला कार्यकर्ता घडला तो संघकार्याचा संस्कार याचे अतिशय नेमके मर्म तुमच्या संपादकीयात उकलून दाखविलेले दिसले. त्यामुळे एकाच वेळी भावपूर्ण आणि चिकित्सक असा संग्रहणीय मृत्युलेख त्यातून तयार झाला. विशेषत: काही वृत्तपत्रांनी हात राखून लिहिलेल्या लेखांच्या पार्श्वभूमीवर आपल्या संपादकीयाची संयत, साधी पण तरीही रामभाऊंच्या गुणगौरवात कुठेही कमी न पडणारी लय खासच आवडली !

'मुंबई मराठी लोकांची, मग भारत कुणाचा ?' हा अग्रलेखही असाच अभिनंदनीय वाटला. अगदी साध्या व सर्वांना समजतील अशा मुद्द्यावर पुण्याच्या राष्ट्रीय एकात्मता परिषदेच्या संयोजकांच्या भूमिकेचा फोलपणा तुम्ही अगदी सहज उकलून दाखविला आहे. या एका (एकात्मता परिषद) घटनेचे सर्व पैलू समाजवाद्याचे राष्ट्रवादाकडे झुकणे वगैरे— तुमच्या अग्रलेखामुळे बहुधा प्रथमच पुढे आले असावेत. अभिनंदन !

आमचे परीक्षा बचाओ आंदोलन-निदान मुंबईत तरी-किंचित थंडावल्यात जमा आहे. शासनाने प्राध्यापकांची कोंडी करायचे ठरविलेले दिसते. प्राध्यापक पण यात हरले तर गाढवही गेले व ब्रह्मचर्यही गेले, अशी त्यांची अवस्था होईल !

२३ मार्च — विनय सहस्त्रबुद्धे, मुंबई

¤ आपल्या साप्ताहिकाच्या १३ मार्च १९८२ च्या अंकातील प्रा. स. शि. भावे याची 'उत्तरमीमांसा ४१' वाचली. त्यानी केलेली लवादाची सूचना चागली वाटली; पण परीक्षा विद्यापीठाकडून काढून घेऊन पदवी महाविद्यालयाकडे द्याव्या, या त्याच्या सूचनेवर दोन आक्षेप घ्यावेसे वाटतात.

(१) अध्यापन करणाऱ्यांनीच परीक्षा घ्यावी, हे तत्त्व ठीक वाटत नाही. या तत्त्वानुसार अध्यापकाच्या वैयक्तिक रागद्वेषामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय होण्याचा संभव दृष्टीआड करता येत नाही. परीक्षकाकडून जी तटस्था किंवा जो नि.पक्षपातीपणा अपेक्षित असतो, तीच गोष्ट नेमकी या पद्धतीत आढळत नाही.

(२) प्रा. स. शि. भाव्यानी फक्त महाविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचाच विचार केलेला दिसतो. महाविद्यालयात प्रवेश न घेता, बहि:स्थ विद्यार्थी म्हणून परीक्षेला बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्यादेखील खूप मोठी असते. अशा विद्यार्थ्यांची परीक्षा कशी घ्यावयाची याबद्दलचा विचार त्यांनी मांडलेला नाही. बहि:स्थ विद्यार्थ्यांची परीक्षा अध्यापकांकडून घेणे शक्यच नसते. कारण त्यांना कोणीही अधिकृत अध्यापकच नसतो. त्यांच्या परीक्षा जर विद्यापीठानेच घ्यावयाच्या असतील, तर त्याच विद्यापीठाने सर्वांच्याच परीक्षा घेतल्या तर बिघडले कोठे ?

१६ मार्च — रा. पां. निपाणीकर
उरण—इस्लामपूर

¤ कै. नरहर कुरुंदकरांना श्रद्धांजली अर्पण करताना (माणूस दि. ६ मार्च अंक) श्री. बागलकोटे, मिरज यांनी श्री. कुरुंदकरांनी गोळवलकरगुरुजींनी गांधीजींना प्रात:स्मर-


## साप्ताहिक माणूस

**वर्ष : एकविसावे**
**अंक : पंचेचाळिसावा**
**१० एप्रिल १९८२**
**किंमत : दीड रुपया**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

णीय म्हटले म्हणून समाजवाद्यांनी टीका केल्याबद्दल समाजवाद्यांना झाडलं होतं असे म्हटले होते.

श्री. बागलकोटे यांना 'शिवरात्र' मधील 'श्री. गोळवलकरगुरुजी व म. गांधी' हा लेख वाचावयास लावून आपण नीट समजावून द्यावा हे अधिक योग्य. म्हणजे असे विनोद त्याच्या हातून पुन्हा होणार नाहीत व 'माणूस'-मध्ये प्रसिद्ध होणार नाहीत.

२९ मार्च भालचंद्र राजे, कल्याण

□ श्री. भालचंद्र राजे यांचा माझ्या कै. कुरुंदकराचे श्रद्धांजली लेखातील काही भागावरील आक्षेप समजला. माझा खुलासा असा :

श्री. राजे यांना 'कै. कुरुंदकरानी समाजवाद्यांना झाडले' असे लिहिण्याचा राग आलेला दिसतो. कारण तसे घडणे शक्य नाही, असे प्रामाणिकपणे त्यांना वाटत असावे. तेव्हा या जाणिवेतूनच त्यानी त्यांची शंका उपस्थित केली असावी. निरसन करण्याआधीच सागतो ती रास्त व चांगली आहे.

कै. कुरुंदकर हे 'विचार हा विचारांनीच खोडून काढावयाचा असतो' असे मानणारे होते. तेव्हा मा. गोळवलकरांनी जेव्हा म. गांधीना प्रातःस्मरणीय ठरविले त्या वेळी या विचारवंताची साधी व सहज प्रतिक्रिया स्वागताची होती. 'शिवरात्र'मधे त्यांच्या या प्रतिक्रियेची सारीच स्पष्टीकरणे दिलेली नाहीत. तथापी त्यानीच दिलेला खुलासा शेवटी देत आहे. अधिक खुलासा असा–

म. गांधीसारखा राष्ट्रपुरुष या देशाच्या समस्या सोडवताना स्वातंत्र्यप्राप्ती या उद्दिष्टाशिवाय इतरही समस्यांना स्पर्श करीत असतो. आता राजकारणातील डावपेचाबद्दल विरोध असू शकतो. गोळवलकरांचा होताही. तथापी राजकारणी गाधी व समाजकारणी गांधी ही दोन स्वतंत्र व्यक्तिमत्त्वे आहेत. राजकारणी व्यक्तिमत्त्व मृत्यूबरोवर संपते. उरला समाज किंवा धर्मकारण–वादाचा भाग. गोळवलकरांना तो मान्य असणार किंबहुना असावयासच हवा. म. गांधीचे ते विचारधन हा या देशाचा वारसा आहे. त्यावर गोळवलकरांनीही जर हक्क सांगितला तर समाजवाद्यांना दुःख होणं आणि त्यांनी गोळवलकराना ढोंगी म्हणणं हे चूक आहे. असा साधा व निर्भीड विचार कुरुंदकरांचा आहे व तो त्यानी त्याच्या समाजवादी सहकाऱ्यांना सांगितला ही साधी वस्तुस्थिती आहे. तेव्हा मी 'विनोद' वगैरे काही केलेला नाही.

कै. कुरुंदकर विचारावर हल्ला करताना व्यक्तीवर वार करीत नसत. 'गाधी हत्या व मी' या पुस्तकाचे वाभाडे काढतानाही सौ. सिंधु व गोपाळ गोडसे याचेबद्दल त्यानी आदराने लिहिले आहे. अगदी तसेच श्री. गोळवलकरगुरुजींच्या गाधीप्रेमाचे पुढे विश्लेषण करताना त्यानी कोणताही मुलाहिजा ठेवलेला नाही; पण म्हणून त्यांच्या चांगल्या गोष्टीचेही स्वागत करू नये, असा मनाचा कोतेपणाही दाखविलेला नाही.

कै. कुरुंदकरांचा सदर लेख १९६९ चा आहे. त्यानंतर कुरुंदकरांच्या विचारात बदल झाले.–तो स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. वारणानगर येथील मराठीचे प्राध्यापक श्री. अ. रा. तोरो त्याबद्दल स्वतंत्र अभ्यास करून मुबईच्या 'वीरवाणी' या कानडी नियतकालिकात तो प्रसिद्ध करीत आहेत. विचारवंताच्या विचारातील बदल हा अभ्यासाचाच भाग असतो. निदान असावा. 'छुपे संघवादी' म्हणून त्यांचेवर वार होऊ नयेत. कुरुंदकर हे तसे दुर्दैवी विचारवंत होते.

आता थोडेसे वैयक्तिक. श्री राजे यांचे पत्रात एक प्रकारचा डंख आहे. त्या भाषेतच उत्तर देता आले असते. (पण 'सा. माणूस'च्या मर्यादा सांभाळावयास हव्यात.) मी कुरुंदकराचे संपूर्ण वाङ्मय अभ्यासपूर्वक वाचले आहे. मी त्यांचा 'भक्त' आहे. १९७८ ते ८१ सालातील त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणाचे 'टेप्स' माझ्याकड(चे)आहेत, आणि जेव्हा 'माणूस' सारख्या दर्जेदार साप्ताहिकात मी लिहितो त्या वेळी अभ्यास करूनच लिहितो. किंबहुना ते माझे नैतिक बंधनच मानतो. तेव्हा मला कुरुंदकर समजून देण्याचा अनाहूत सल्ला संपादकास देणे माझे मते निदान कुरुंदकराचे (समाजवादी) भक्ताला तरी योग्य दिसत नाही.

५ एप्रिल आनंद बागलकोटे
मिरज (सागली)

**'शिवरात्र' – द्वितीयावृत्तीमधून**

गाधीना श्रद्धांजली विनोबांनी वाहावी, पण इंदिरा गाधीनी वाहू नये. कॉंग्रेसने वाहावी; पण कम्युनिस्टांनी वाहू नये, निदान कुणीही गांधीना आदरांजली अर्पण केली तरी हरकत नाही. गोळवलकरगुरुजीनी मात्र त्यांना आदरांजली वाहता कामा नये, असे काहीजणांना वाटते. हा एक प्रकारचा करंटेपणा आहे....

मध्यवर्ती राष्ट्रीय प्रवाहाशी मुस्लिम समाज कधी एकरूप होतच नाही, अशी आपली तक्रार असते. गोळवलकरांच्या बाबतीत कुणाचे काही मतभेद असले तरी त्यांच्या धैर्याबद्दल शका घेण्याचे कारण नाही. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातसुद्धा ते स्वच्छपणे वर्णव्यवस्थेला पाठिंबा दाखविण्याचे धैर्य करू शकतात! त्यांच्या मनात असते, जर गुरुजींची इच्छाच असती तर गाधी हे आमचे राष्ट्रपिता नव्हेत असे गोळवलकरांनी जाहीरपणे सागितले असते.... (पान २)

जर जाहीररीत्या एखादा मुस्लिम लेखक महंमद पैगंबर व गांधी ह्याची तुलना होताच पैगंबरला 'सम्राट' आणि गांधीना 'टरबूजविक्या' ठरवू शकतो व हे गांधी जन्मशताब्दिपर्वात सुसह्य मानले जाते–तर मग गोळवलकरांना भिण्याचे काहीच कारण नव्हते ...करायचा असेल तर या घटनेविषयी आनंद व्यक्त केला पाहिजे; त्याबद्दल कुणाचे पोट दुखण्याचे कारण नाही! (पान ३). □

पुणे वार्ता

## प्रेक्षणीय 'वाडा'

शनिवारी ३ एप्रिलला प्रभात टॉकीज जाणकार निमंत्रितांनी आणि चित्रपट-रसिकानी फुलून गेलं होतं. 'प्रभात'चा त्या दिवशीचा थाट आणि एकूण उत्साही वातावरण पाहिल्यावर नवीन चित्रपटाचा प्रकाशनसमारंभ आहे हे सहज जाणवत होतं. अर्थात सेट आणि अत्तराच्या सुवासात आणि सनई-ताशाच्या आवाजात हे न पाहतासुद्धा जाणवलं असतंच !

दमामीची कथा-पटकथा आणि संवाद असलेल्या 'एक डाव भुताचा' या 'मनोरंजन' चित्रपटाचा हा प्रकाशनसमारंभ होता. मिरासदारांची कथा, सुधीर मोघ्याची गीतं, भास्कर चंदावरकराचं संगीत आणि परत सिनेमा सप्तरंगात, त्यामुळे सिनेमाबद्दल आधीच अपेक्षा होत्या. प्रत्यक्ष सिनेमा पाहिल्यावर अपेक्षांना तडा वगैरे गेला नाही. मराठी चित्रपटांच्या ठराविक पाटील-तमाशाखून साऱ्यातून हे भूत आपल्याला अलगद बाहेर घेऊन जातं!

टगेवाडी गावातील टगे लोकांना वठणीवर आणणाऱ्या प्रेमळ भुताची ही कथा आहे. हे टगेवाडीतले टगे म्हणजे छबुराव आणि त्याची गँग. गावात नव्याने दाखल झालेल्या गरीब बिचाऱ्या बावळट इ. देशमुख मास्तरला (दिलीप प्रभावळकर), त्रास द्यायला सुरुवात करतात. आगीत तेल म्हणजे टगेवाडीची 'ब्यूटीक्वीन' दुर्गा (मराठीतली नर्गिस-रंजना) या बावळट मास्तरच्या प्रेमात पडते. छबुराव अर्थातच तापतो. कारण दुर्गावर त्याचा डोळा असतो. सरपंचाच्या उनाड मुलाला मास्तरने भर वर्गात तोंडात दिलेली असते. त्यामुळे सरपंचही मास्तरचा काटा काढण्याच्या बेतात असतो. सर्व गुंड आणि सरपंच एकमताने मास्तरला हाकलून देतात आणि ती जागा तमाशापार्टीला देतात. (याआधी 'राया मला रंगमहाली ठेवा' ही एक सुसह्य, बघणीय लावणी आहे.) मास्तर गावाबाहेरच्या पडक्या वाड्यात रहायला जातात आणि तिथेच त्यांची साडेतीनशे वर्षांच्या प्रेमळ भुताची भेट होते. पड्यावर भूत आल्यानंतर खरी धमाल सुरू होते. कारण भूत फक्त आपल्याला आणि दिलीप प्रभावळकरलाच दिसत असतं. टगेवाडीतल्या टग्यानाच काय, पण प्रेमळ माणसांनासुद्धा (उदा. दुर्गाची आई सुलोचना) भूत दिसत नाही. या अदृश्य भुताच्या अनेक गमती सिनेमात आपल्याला हसवतात. त्यासाठी प्रत्यक्ष सिनेमा पहायला पाहिजे ! सर्व टग्यांचा समाचार घेत भूत शेवटी मास्तर आणि दुर्गाच्या मार्गातील सर्व काटे बाजूला काढून दोघाचे दोनाचे चार करून, त्या दोघांचा आणि आपला प्रेमळ आणि भावपूर्ण निरोप घेऊन, पिशाच्चयोनीतून मुक्त होतं आणि सिनेमा संपतो.

चित्रपटाची ही साधी सरळ गोष्ट मिरासदाराच्या खुमासदार लेखणीनं खुलवली आहे. उदा. 'चिमणराव' फेम बावळट मास्तर रंजनाचा हात हातात घेऊन म्हणतो, 'तू किती छान...... स्वयंपाक करतेस- भात, भाजी, पोळी वगैरे वगैरे !' किंवा प्रेमात पडल्यावर दुर्गा मास्तराना जेवायला बोलावून गोडधोड जेवायला वाढते तेव्हा मास्तर अडखळत विचारतात, 'आज कुठला सण आहे का ?' तेव्हा दुर्गा चिडून म्हणते, 'हो, सणच आहे. पोळा !' यासारखे सहज फुलणारे, कित्येक चटपटीत विनोदी संवाद यात आहेत. पटकथा-संवादांना कलाकारांनी सुरेख साथ दिली आहे. लाचार मुख्याध्यापक (स्वतः द. मा. मि.) वेडी शांता, उर्मट छबुराव, बावळट मास्तर, तिखट दुर्गा यासारख्या व्यक्तिरेखा जिवंत वाटतात; पण बाजी मारली आहे अशोक सराफनी ! (भूत). संपूर्ण सिनेमा पाहिल्यावर देखण्या, तिखट दुर्गाऐवजी आपण चक्क भुताच्या प्रेमात पडतो. या प्रेमळ भुताच्या भूमिकेत अशोक सराफचे डोळे इतके निष्पाप आणि बोलके दिसले आहेत की, बस्स ! या भुताने हा चित्रपट खाऊन टाकला आहे !

मुद्दाम उल्लेखण्यासारखी गोष्ट म्हणजे या चित्रपटाचं छायालेखन ! इतर मराठी चित्रपटांच्या तुलनेत हा चित्रपट बघणे हा प्रसन्न अनुभव आहे. मास्तरच्या खोलीच्या खिडकीतून दिसणारी वेलीची फांदी, गावाबाहेरच्या ओढ्याची निळाई आणि शेतातल्या अनेक हिरव्या रंगछटा अनंत वाडदेकरांनी जिवंत केल्या आहेत. चित्रपटातल्या एकमेव लावणीदृश्याची रंगसंगत आणि छाया लक्षात येण्याइतकी चागली जमली आहे. सुधीर मोघ्याची गाणी आणि भास्कर चंदावरकराचं संगीत सहज वाटतं.

करपरतीच्या लाटेवर आरूढ झालेल्या मराठी चित्रपटांच्या लाटेत हे भूत वधून जाणार नाही असं वाटतं. मराठी चित्रपट-रसिकांनी हा चित्रपट एकदा बघायलाच हवा !

—प्रतिनिधी


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

# एल साल्व्हाडोर
## प्रभावक्षेत्रासाठी संघर्ष

वा. दा. रानडे

मध्य अमेरिकेतील एल साल्व्हाडोरमधील घटनासमितीच्या निवडणुकात उजव्या पक्षानी बहुमत मिळविले. मध्यममार्गी ख्रिश्चन डेमोक्रॅट पक्षास पहिल्या क्रमांकाची मते मिळाली; पण तो निर्णायक बहुमत मिळवू शकला नाही, सध्याचे अध्यक्ष जोसेफ नेपोलियन ड्वार्टे याच पक्षाचे आहेत. त्याना अमेरिकेचा पाठिंबा होता. उजव्या पक्षांनी ख्रिश्चन डेमोक्रॅट पक्षाबरोबर संयुक्त मंत्रिमंडळ स्थापण्याची तयारी दर्शविली आहे. डाव्या पक्षानी तर निवडणुकीवर बहिष्कारच घातला होता.

साल्व्हाडोरमधील यादवी युद्ध मिटण्यास या निवडणुकानी मदत होण्याची शक्यता दिसत नाही. डाव्यांच्या गनिमी फौजा लढा चालूच ठेवणार आहेत. साल्व्हाडोर म्हणजे अमेरिकेचे दुसरे व्हिएटनाम बनणार आणि व्हिएटनामप्रमाणेच अमेरिका तेथे अधिकाअधिक गुंतत जाणार असे अंदाज केले जात आहेत. अमेरिका तेथे आपले लष्कर पाठवील असेही अंदाज काही निरीक्षकानी केले आहेत. पण सर्वसामान्य अमेरिकन जनतेचा अशा हस्तक्षेपास विरोध आहे. हस्तक्षेपाला विरोध दर्शविणारी आणि अध्यक्ष रेगन याच्या सध्याच्या धोरणाचा निषेध करणारी मोठी निदर्शने अमेरिकेत झाली आणि त्यानी व्हिएटनाम युद्धविरोधी निदर्शनांची आठवण करून दिली. या लोकमताची दखल अध्यक्ष रेगन यानाही घ्यावी लागली. साल्व्हाडोरमध्ये अमेरिका आपले सैनिक पाठविणार नाही असे त्याच्या निवेदकानी जाहीर केले. वाटाघाटीनी प्रश्न सोडवावा यासाठी दडपण वाढत आहे. आज दोन्ही बाजू सम बळ दिसत असल्या तरी यादवी युद्ध दीर्घकाळ चालल्यास त्यात डाव्याचा विजय होईल अशी भीती अमेरिकेलाही वाटते. त्यामुळे वाटाघाटीचा मार्ग चोखाळला जाण्याची शक्यता आहे.

अफगाणिस्तान व पोलंडप्रमाणेच साल्व्हाडोर बड्या शक्तीचे सघर्षक्षेत्र झालेले आहे. क्यूबानतर मध्य अमेरिकेतील निकाराग्वामध्ये कम्युनिस्टाचा प्रभाव असलेली राजवट आली. कम्युनिस्ट गनिमी चळवळीचे लोण निकाराग्वास लागून असलेल्या होंडुरास, ग्वाटेमाला व एल साल्व्हाडोर या देशातही पसरत आहे. एल साल्व्हाडोरमध्ये गनिमी लढ्याचा जोर बराच आहे निकाराग्वानंतर एल साल्व्हाडोर कम्युनिस्ट प्रभावाखाली जाऊ नये यासाठी तेथील सरकारला अमेरिका मोठ्या प्रमाणावर लष्करी मदत करीत आहे आणि तेथील राजवट अमेरिकेच्या मदतीमुळे टिकून आहे. अमेरिकेने या वर्षासाठी साडेबारा कोटी डॉलर मदत मंजूर केली आहे. याशिवाय आणखी साडेपाच कोटी डॉलर मदतीस कॉंग्रेसकडून अजून मंजुरी मिळावयाची आहे. एवढी मदत करून तरी बंडखोरी विरुद्ध निर्णायक विजय मिळेल का अशी शंका अमेरिकन कॉंग्रेसमधील चर्चेत अनेक सभासदानी व्यक्त केली आणि तेथील राजवट मानवी हक्क पायदळी तुडवीत असता तिला कशासाठी मदत करावयाची असाही प्रश्न विचारला जात आहे. मानवी हक्काबाबत तेथे आता परिस्थिती सुधारत आहे असे रेगन भासवीत आहेत. गेल्या वर्षी जानेवारीत दर महिन्यास ८०० राजकीय खून होत होते ते प्रमाण वर्षअखेर ३०० पर्यंत खाली आले असे अमेरिकन गोटातून सांगण्यात येत आहे. तर आपण गेल्या वर्षी जूनपर्यंत पाच ते सहा हजार लोक ठार केल्याचा बडखोरांचा दावा आहे. निकाराग्वामध्ये १९७८ साली यादवी युद्ध सुरू झाल्यापासून तेथे ४५ हजार, एल साल्व्हाडोरमध्ये ३२ हजार आणि ग्वाटेमाला मध्ये तर हजार असे जवळजवळ ९० हजार लोक ठार झाले. दर दीडशे माणसामागे एक ठार असे हे प्रमाण पडते. बळी पडलेल्यांमध्ये बहुसख्य बिनलढाऊ नागरिक आहेत. काम्पूकियाचे खालोखाल जीवितहानी मध्य अमेरिकेतील या युद्धात होत आहे.

युद्धात दोन्ही बड्या राष्ट्रानी प्रत्यक्ष हस्तक्षेप केला नसला तरी प्रस्थापित सरकारला अमेरिकेची आणि डाव्या गनिमी फौजांना रशिया व क्यूबाची शस्त्रमदत होत आहे. क्यूबाला रशियाने गेल्या वर्षी साठ हजार टन लष्करी सामग्री पाठविली. तसेच मिग–२३ फ्लॉगर विमाने पाठविली. क्यूबाजवळ आता दोनशेपेक्षा अधिक लढाऊ विमाने आहेत. क्यूबातून निकाराग्वामध्ये शस्त्रे येतात व तेथून ती एल साल्व्हाडोरला पाठविली जात. निकाराग्वाच्या पूर्वकिनाऱ्यावर शस्त्रआयातीसाठी विमानउतारपट्ट्या बांधण्यात किंवा सुधारण्यात येत आहेत, असे रेगन यांनी सांगितले.

घातपाताने अर्थव्यवस्था खिळखिळी करण्यावर गनिमी फौजाचा भर आहे. तेवीस हजार सरकारी सैनिक काही प्रत्येक शहरात रस्त्यावर व खेड्यांत पहारा ठेवू शकत नाहीत. पाच हजार गनिमी सैनिक आपल्या तळांवरून देशाच्या दोनतृतियांश भागात कोठेही संचार करू शकतात. गेल्या ऑक्टोबरात त्यांनी प्युन्टे द ओरो येथील लेम्पा नदीवरचा महत्त्वाचा पूल उडविला. निवडणुकीच्या दिवशी सान्ता ॲना आणि सान साल्व्हाडोरकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर त्यांनी वाहतूक अडविली, बसेस जाळल्या. बडखोरांना शहरे आपल्या हाती टिकविणे शक्य झालेले नाही. उत्तरेकडचे परक्विन हे छोटे शहर त्यानी गेल्या वर्षी जिंकले होते; पण सरकारी लष्कराचे मदतीस कुमक येताच ते त्याना सोडणे भाग पडले. सान साल्व्हाडोरच्या उत्तरेस साठ किलोमीटर अतरावर असलेला ग्वाझाचा ज्वालामुखी हे त्याचे सर्वांत सुरक्षित ठाणे. सरकारी फौजांनी गेल्या फेब्रुवारीत हल्ला करून त्याचा वरचा भाग जिंकलाही होता; पण पायथ्याशी गनिमी सैनिकानी बोगदे खणलेले आहेत. तेथून त्यांना हुसकणे सरकारी फौजाना शक्य झाले नाही. गनिमी सेनेजवळ विमानविरोधी अस्त्रे नाहीत. हेलिकॉप्टरच्या हल्ल्यापासून बचावाचे त्याच्याजवळचे साधन म्हणजे फक्त रायफली, सरकारचे एकही विमान त्याना आतापर्यंत पाडता आलेले नाही, पण गेल्या जानेवारीत त्यांनी इलोपँगो हवाईतळावर हल्ला करून सहा हेलिकॉप्टर्स व काही इतर विमाने उडवून दिली. आता या विमानाच्या बदली दुसरी विमाने देण्यासाठी अमेरिकन मदतीचे अडीच कोटी डॉलर खर्च झाले !

फॅराबुन्डो मार्टी हे साल्व्हाडोरमधील क्रांतिकारी चळवळीचे पहिले नेते. निकाराग्वामध्ये जनरल सॅंकिनो याच्या अमेरिकाविरोधी लढ्यास त्यानी मदत केली. मार्क्सवाद-लेनिनवादावर त्याची अढळ निष्ठा. १९३२च्या शेतकरी उठावाचे नेतृत्व त्यानी केले होते. या उठावात तीस हजार लोक ठार झाले आणि स्वत. मार्टी यांना मृत्यूची सजा देण्यात आली. त्यानी स्थापन केलेला कम्युनिस्ट पक्ष स्टालिनवादी गटाचे स्वरूपात चालू राहिला. १९७० मध्ये साल्व्हाडोर कायेटॅनो कार्पिओ याच्या नेतृत्वाखाली एक क्यूबावादी गट या पक्षातून फुटला व त्याने गनिमी लढा सुरू केला. गनिमाच्या याच गटामध्ये हा गट सर्वांत प्रबळ आहे. रेव्होल्यूशनरी को ऑर्डिनेटर ऑफ दि मोसेस ही संघटना या पाच गटात समन्वय घडवून आणण्याचे काम करते. आर्थिक सुधारणा, सरकारमध्ये प्रतिनिधित्व आणि लष्करात सुधारणा, या गनिमी नेत्यांच्या मुख्य मागण्या आहेत. बाह्य हस्तक्षेप थांबवून साल्व्हाडोर जनतेला आपले भवितव्य ठरवू देणे हाच तेथील सघर्ष मिटवण्याचा योग्य मार्ग आहे. ❑

# गिरणी-कामगारांचा शांततापूर्ण लढा

मोहन शं. कुलकर्णी, घाटकोपर

आज पुन्हा एकदा मी गिरणी-कामगारांच्या विषयाला हात घालत आहे. कारण इतकेच की, या अडीच लाख गिरणी–कामगारांचा संप मिटवण्याच्या दृष्टिकोनातून तीन महिने उलटून गेले तरी अद्यापही कोणी कसलीच पावले टाकत नाही !

सात गिरण्यातील पंचवीस हजार कामगारानी बोनसच्या प्रश्नावरून दिवाळीपासून या गिरण्यात बेमुदत संप सुरू केला. गिरण्यात डॉ. दत्ता सामंताचे आगमन होताच त्यांच्या लढाऊ नेतृत्वाखाली कामगारानी संघर्षाला सुरुवात केली. सात गिरण्यात संप पुकारल्यानंतर डॉ. सामंतानी गिरणीकामगाराचे न्याय्य प्रश्न तात्काळ सोडवावेत या दृष्टिकोनातून त्याच्याकडून होतील तेवढे प्रयत्न केले.

डॉ. सामंतांचे सर्व प्रयत्न जेव्हा फोल ठरले तेव्हा त्यांनी आपले हुकमी 'सामंततंत्र' बाहेर काढून अठरा जानेवारीपासून मुंबईतील सर्व गिरण्यांत बेमुदत संप सुरू केला. तेव्हापासून मुबईतील अडीच लाख गिरणी–कामगार हा लढा शांततेने लढत आहेत. डॉ. सामंतासारखे लढाऊ नेतृत्व मिळाल्याने कामगारात एक भली मोठी जिद्द निर्माण झाली आहे. 'मोडू, पण जराही वाकणार नाही !' या तत्त्वावर हे कामगार आजपर्यंत तरी लढत आहेत, म्हणूनच लहानापासून थोरापर्यंत सर्वजण या लढयाला 'एक अभूतपूर्व लढा' असे म्हणतात.

असे म्हणण्याला इतिहासच साक्षी आहे. इंटकची 'राष्ट्रीय मिल मजदूर संघ' ही प्रातिनिधिक संघटना येथे कित्येक वर्षांपासून मक्तेदारी करून आहे. राष्ट्रीय मिल मजदूर संघाला खतम करण्यासाठी आजपर्यंत दोनतीन वेळा प्रयत्न झाले; पण हे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. कॉ. डांगे यांच्यासारखे शक्तिशाली नेते येथे या कामी राबले; परंतु त्यानाही म्हणावं तसं यश प्राप्त झालं नाही. डॉ. सामंतानी येथे आपले नेतृत्व सिद्ध करून दाखवले. गिरणीव्यवसायात अनेक लहानमोठया कामगारसंघटना पूर्वीपासून आपापल्या शक्तीनुसार येथे काम करीत होत्या; पण या सर्व संघटनांतील कामगार आज डॉ. सामंतांपाठीमागे उभा आहे.

केवळ अडीच लाख कामगार आपल्या पाठीशी आहेत, एवढयावरच डॉ. सामंताचं महत्त्व संपत नाही; तर हा लढा ते शांततेने लढताहेत, यातच त्याचं मोठेपण आहे. संप सुरू होऊन आज तीन महिने होत आले; परंतु कामगारांनी अद्यापही आपला तोल सोडला नाही ! हा सर्व लढा यशस्वी करण्यासाठी कामगारांनी हवं ते केलं आहे. घरादारात जे काही साठवलं होतं ते विकून, पठाणांकडून शंभर रुपयांवर महिन्याला बारा रुपये व्याज, याप्रमाणे कर्ज काढून कामगार हा लढा लढतो आहे, यावरूनच राष्ट्रीय मिल मजदूर संघावर कामगाराचा किती रोष आहे हे सिद्ध होते ! परवा काही गिरणीकामगारांच्या मी मुलाखती घेतल्या. त्यात हे कामगार म्हणाले की, 'आम्हाला एक नवा पैसा नाही मिळाला तरी चालेल; पण रा. मि. म. संघाला खतम केल्याखेरीज आम्ही कामावर परतणार नाही !'

कामगारात ही एवढी जिद्द डॉ. सामंतांनी निर्माण केली असं नाही, तर परिस्थितीने ती निर्माण केली आहे. एके काळी मुबईतील गिरणी–कामगार 'चागला पगार घेणारा' म्हणून गणला जात होता; पण स्वातंत्र्योत्तर काळात हा कामगार मागे पडला आणि इतर फुटकळ धंद्यातील कामगार मात्र चांगले वेतन घेते झाले ! भरमसाठ महागाईने जीर्ण झालेल्या या कामगाराला जीवन जगणे जेव्हा अगदी कठीण झाले तेव्हाच त्याची ही जिद्द निर्माण झाली. डॉ. सामंत हा केवळ कामगाराना संघटित ठेवून लढयास प्रवृत्त करणारा एकमेव आधार ठरला !

कामगारांची ही विलक्षण जिद्द पाहूनदेखील, कबूल करूनदेखील सरकार अजून जराही ढळायला तयार नाही. आधी कामावर परता, मग तुमच्या मागण्यांचा विचार करू, प्रातिनिधिक संघटनेशिवाय आम्ही कोणाशीही वाटाघाटी करणार नाही, हे सरकारने प्रथमपासून स्वीकारलेले धोरण आजही कायम आहे.

म्हणजे हा संप मोडून काढण्याच्याच दृष्टिकोनातून सरकारने पावले उचलली आहेत. प्रथम म्हणजे टी. व्ही. आणि रेडिओ याद्वारे सरकारने 'गिरण्या चालू झाल्या, कामावरती परता' हे सांगण्यासाठी जे जे करता येणे शक्य होते ते सर्व केले. सरकारने, गिरणीमालकानी आणि राष्ट्रीय मिल मजदूर संघाने प्रारंभीपासून असा प्रचार केला की, दहशतीमुळे कामगार कामावर येत नाही. यासाठी मात्र सरकारने पोलीस मदत देऊ केली. पण तरीदेखील एक टक्कादेखील कामगार कामावरती परतला नाही. मग डॉ. सामंतानी जाहीर आव्हान दिले की, एक टक्का जरी कामगार कामावर परतले तरी मी माझा संप मागे घेतो ! परंतु तेही झाले नाही.

पोलिसी मदत देऊनही कामगार कामावर परतत नाहीत, हे पाहून पोलिसांनी मग कामगारांची छळवणूक सुरू केली. कित्येक कामगारांना विनाकारण पकडले. त्यांना तुरुंगामध्ये डांबले. त्यांच्याकडून भरमसाठ जामीन मागितला. तरीही काही उपयोग होत नव्हता. यातही आपण अयशस्वी होतो आहे, हे पाहिल्यावर सरकारने जाहीर केले की, होळीनंतर कामगार कामावर परततील. वृत्तपत्रात बातम्या–जाहिराती देऊन व रेडिओ, टी. व्ही. वर बातम्या सांगून सरकारने जाहीर केले की, कामगाराची उपस्थिती वाढते आहे, पण हेही विधान खोटे ठरले. कारण काही आमदारांनी नुकतीच गिरण्यांची पाहणी केली असता त्यांना आढळून आले की, सरकारच्या आकडेवारीप्रमाणे गिरण्यात कामगारच नाहीत आणि जे आहेत तेही बाहेरील !

म्हणजे गिरण्यात कामगारांची उपस्थिती कमी असणे, हे सरकारला स्वतःच्या कमीपणाचे लक्षण वाटते. तर गिरण्यांत काहीच उपस्थिती नसणे हे डॉ. सामंतांना स्वतःच्या मोठेपणाचे लक्षण वाटते. मी मोठा की तू मोठा, या गोष्टीने गिरणी संपाला आता राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. दोघेही

स्वत.चे मोठेपण सिद्ध करण्यासाठी सर्व तऱ्हेचे प्रयत्न करत आहेत!

परवा डॉ. सामंतांनी स्वतःची शक्ती दाखवण्यासाठी विधानसभेवर जो विराट लॉंग मार्च काढला त्यात त्यानी स्पष्टच केले की, कामगाराला आता हे सरकारच ठेवावयाचे की नाही, याचा विचार करावा लागेल. या संघाच्या आधारावरच डॉ. सामंत पुढील वर्षी होणारी मुंबई महानगरपालिकेची निवडणूक कामगारआघाडीद्वारे लढवणार आहेत. महाराष्ट्रातही काही ठिकाणी निवडणुकी लढवण्याचा निर्धार त्यांनी जाहीर केला आहे. लवकरच ते मुंबई बंद, महाराष्ट्र बंदची घोषणा करणार आहेत.

गिरणी-कामगारांचा हा संप. डॉ. सामंताच्या पथ्यावर पडणारा आहे की नाही, या प्रश्नाचं उत्तर आताच देणे कठीण आहे. पण एक गोष्ट निश्चित की, या संपामुळे डॉ. सामंत अवघ्या महाराष्ट्राला परिचित होत आहेत. गिरण्यात काम करणारा बहुसंख्य कामगार हा कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात राहणारा असल्याने या ठिकाणी डॉ. सामंताचे नेतृत्व आता पोहचले आहे. संपामुळे पुष्कळसे कामगार गावीच असल्याने तेथे डॉ. सामंताचे त्यानी उत्तम प्रकारे स्वागत केले व त्याच्याबरोबर मुबईतील कामगाराच्यासाठी धान्यही पाठवले. डॉ. सामंतांनी आतापर्यंत कोणत्याच कारखान्यातील कामगाराला इतकी मोठी मदत केली नव्हती; पण आज ते गिरणी-कामगाराला मुलांच्या फीचे पैसे, धान्य वगैरे मदत करत आहेत!

परंतु संपाच्या यशस्वितेसाठीच ही मदत आहे, का यापाठीमागे डॉ. सामंताचा आणखी काही हेतू आहे, अशी शका आज सर्वांना येऊ लागली आहे. कारण कै. रामभाऊ म्हाळगी यांच्या निधनाने ठाणे लोकसभा मतदार संघाची जागा आता रिकामी झाली आहे. रामभाऊंना जाऊन पुरते पाचही दिवस झाले नसतील इतक्यात डॉ. सामंत ही जागा लढवणार, असं त्याच्या विरोधकांनी जाहीर केलं. डॉ. सामंतांनी त्याचा अद्यापपर्यंत इन्कार केलेला नाही.

अडीच लाख गिरणी-कामगाराच्या संपाचे भाडवल करून, त्याच्या मदतीनेच डॉ. सामंत लोकसभेसाठी उभे राहण्याचा विचार करत असावेत डॉ. सामत ही पोटनिवडणूक जर लढवणार असतील तर या गिरणी-कामगारांचे आणि त्यांच्या मागण्याचे काय? आणि खासदार होऊन एक पद मागे लावण्याव्यतिरिक्त डॉ. सामंत आणखी काय जास्त करू शकणार आहेत?

ते काहीच करू शकणार नाहीत, पण जे मिळवलेलं आहे तेच गमावण्याची अधिक शक्यता आहे! म्हणूनच कामगाराच्या आणि स्वत.च्या भल्यासाठी तरी डॉ. सामंतानी ठाण्याची निवडणूक लढवू नये. कारण इथं त्यांना दुहेरी झुंज खेळावी लागणार आहे. एक इंदिरा कॉंग्रेसबरोबर, तर दुसरी भारतीय जनता पक्षाबरोबर. इंदिरा कॉंग्रेसची काही मते डॉ. सामंत खाऊ शकतील, पण भाजच्पया बाबतीत ते शक्य नाही.

दुसरी गोष्ट अशी की, निवडणुकीत गुतलेल्या डॉ. सामंतांना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना स्वतःच्या कामगार-चळवळीकडे लक्ष देण्यास बिलकुल वेळ मिळणार नाही. डॉ. सामंतांचे हे राजकारण पाहून सहा-सहा महिने रखडलेले कामगार आपण होऊनच डॉ. सामंताना रामराम ठोकतील. डॉ. सामंताची सर्व मेहनत निकामी ठरेल. म्हणूनच राजकीय रंगमंचावर ऱ्हास होण्यापेक्षा स्वतःची संघटना मजबूत होईतोपर्यंत डॉ. सामंतांनी कामगार-चळवळीतच राहणं अधिक चांगलं.

सरकारनेदेखील आपले धोरण आता बदलावयास हवे. डॉ. सामंत नकोत, या एकाच कारणास्तव सरकार आणि गिरणीमालक हा संप लोंबकळत ठेवू पहात आहेत. पण याने डॉ. सामंतांची प्रतिमा कमी होणार नसून ती वाढणार आहे. डॉ. सामंताबाबत अडीच लाख कामगारांना खूप काही प्रेम आहे म्हणून हे कामगार त्यांच्या पाठीशी नाहीत; तर त्यांच्या काही न्याय्य मागण्यासाठी ते त्यांच्या पाठीशी आहेत! आधी कामावर परता, म्हणजे आम्हाला शरण या, ही भाषा सरकारने बदलावी. गिरणीकामगाराला काही ना काही वाढ लगेच जाहीर करावी. कामगार कामावर नक्की परततील. पण आम्हाला शरण या, ही भाषा सरकारने सोडावी. हा संप जर यशस्वी झाला नाही तर ती गोष्ट डॉ. सामंतांना आणि सरकारलाही भारी पडणार आहे. कारण मुबईतील हा कामगार सर्वात जागृत आहे. आगामी निवडणूकीत तो याबद्दल धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही. म्हणून गिरणीसंपात राजकारण वगैरे न आणता हा सप मिटण्याच्या दृष्टिकोणातून पावले टाकावयास हवीत. डॉ. सामंतांसाठी नाही, तर अडीच लाख कामगारांसाठी! □


**दलित-दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे**
**गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल! दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतरं होते ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बागुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

—रा. ग. जाधव
(केसरी, रविवार, ६-१२-८१)

# आंबेडकर भारत

लेखक बाबुराव बागुल
राजहंस प्रकाशन, पुणे. मूल्य : वीस रुपये

# चंद्रपूर

# नागरिक जेव्हा संतप्त होतात

**Kobad Ghandy reports in 'Sunday Observer.'**

मराठी रूपांतर : मेधा देशपांडे

चंद्रपूरमधलं वातावरण तंग आहे. दोन महिने झाले, पण छोटयाशा ठिणगीने देखील केव्हाही वातावरण पेट घेईल. महाराष्ट्राच्या पूर्व भागातील या छोटया औद्योगिक शहरात पोलिसांची जादा कुमक येऊन दाखल झाली आहे. रस्त्या-रस्त्यावर-दिवसरात्र पोलीसगाडया फिरताना दिसतात. एका बाजूला संतप्त नागरिकांचं नेतृत्व करणारी ' नागरीक कृती समिती ' आणि दुसऱ्या बाजूला पोलीस, भ्रष्ट अधिकारी, राजकारणी आणि सर्व गुन्हेगार जग अशा या युद्धातल्या दोन बाजू स्पष्ट झाल्या आहेत. कोणत्याही सामान्य माणसाचं रक्त पेटून उठावं अशा चार गंभीर घटना चंद्रपूरमध्ये एकापाठोपाठ एक घडल्या. १)२० जानेवारीला उषा कडूकर या १९ वर्षाच्या मुलीवर बलात्कार होऊन तिची निर्घृण हत्या झाली. २) त्यानंतर दुसऱ्याच दिवशी २५ वर्षाच्या नूतन सराफ या विवाहित महिलेचा खून झाला. (३) हरिप्रसाद मित्रा या कामगाराचा मोटरसायकल अपघातात झालेला मृत्यू आणि ४) पोलिसांनी केलेल्या अमानुष मारहाणीमुळे बबलू भुटाचं अकस्मात निधन, या घटना चीड आणणाऱ्या आहेत. या चारही गुन्हयात गुन्हा सिद्ध करणारा भरपूर पुरावा हातात असूनही आजतागायत एकाही व्यक्तीला संशयास्पद गुन्हेगार म्हणूनसुद्धा ताब्यात घेतलेले नाही, अटक करणे तर लांबच !

गुन्हेगार कोण आहेत हे गावातल्या सामान्य लोकांनाही माहीत आहे. या परिस्थितीत तापलेलं वातावरण शांत करण्यासाठी या गुन्हेगारांना तात्काळ अटक करणे ही संबंधित अधिकाऱ्यांची प्रमुख जबाबदारी होती. ते न करता पोलिसांनी सामान्य लोकांना मारहाण केली आणि शेवटी परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी राखीव सुरक्षा दलाची (SRP) मदत मागवली. या घटनांनंतर लोकांचा संताप इतका पराकोटीचा वाढला की, नागरीक कृती समितीचे अध्यक्ष श्री. पोटदुखे यांनी उषा कडुकर आणि नूतन सराफ यांच्या खुनाचा तपास लावला नाही तर आपण आत्मबलिदान करू, अशा अर्थाचं निवेदन प्रसिद्ध केलं याच दिवशी झाडूवाल्यांच्या ' सुदर्शन समाज' संस्थेमधील सभासदांच्या भेटीत बबलू भुटाच्या प्रकरणात हात असलेल्या पोलिसांविरुद्ध निकाल लागला नाही तर चळवळ अधिक तीव्र करण्याचा, नागरिकांनी मशाली घेऊन मोर्चा काढण्याचा, चंद्रपूर पोलीस स्टेशनबाहेर सतत निदर्शनं करण्याचा आणि गुन्हयाचा तपास लागला नाही तर आसपासच्या भागात चळवळ पसरवण्याचा निर्णयही घेण्यात आला.

चंद्रपूरमध्ये सध्या सर्वांच्या मनात खदखदणारे प्रश्न म्हणजे, सर्व खुन्यांची नावे जगजाहीर असताना त्यांना अटक का होत नाही ? गुन्हेगार तपासात अशी बेफिकीर चालढकल करून पोलीस गुन्हेगारांना पाठीशी का घालताहेत ? या घटनांचा अन्वयार्थ लावताना, चंद्रपूरमधल्या सत्तास्पर्धेच सूत्रसंचालन करणाऱ्या प्रस्थापित शक्तींच्य नीच कारवायाही उघडकीला येत आहेत.

चंद्रपूर ही पूर्वी गोंड राजांची राजधानी. इथले प्रमुख उद्योग आहेत जंगलव्यवसाय आणि कोळशाच्या खाणी. शहरातला वाढता भ्रष्टाचार आणि काळ्या पैशाला कारण इथला कोळसा आणि जंगलउत्पादनांचा व्यापारच आहे. चंद्रपूर आता दुसरं धनबादच होऊ घातलं आहे. या पार्श्वभूमीवर भ्रष्ट अधिकारी, राजकारणी, पोलीस आणि कंत्राटदार यांचे दंगे वाढणार, हे उघडच आहे. चंद्रपूरच्या रस्त्यांवरून हिंडताना इथल्या मूळ रहिवाशांपेक्षा कॉंट्रॅक्टर, व्यापारी दलाल यासारखे झटपट पैशाची स्वप्नं पहाणारे उपरेच जास्त दिसतात !

गेल्या दोन वर्षांत चंद्रपूरमध्ये गुन्हयांची एक मालिकाच तयार झाली. गुन्हेगार आणि पोलीस यांची हातमिळवणी असलेल्या बहुतेक गुन्हयांची साधी नोंदही झालेली नाही. परिणामी गुन्हेगार शहरात मोकाट हिंडताना दिसतात. हे सिद्ध करणारी दोन–तीन ठळक उदाहरणे आहेत. १९७८ मध्ये बुद्धा पोचम हा कुप्रसिद्ध गुंड जामिनावर सुटल्यानंतर त्याने त्याच्या केसमधील शेख सालर या विरुद्ध साक्षीदाराचा खून केला. पोलिसांनी जाणूनबुजून डोळेझाक केल्यामुळे पोचम पकडला गेला नाही. त्यानंतर १९८० मध्ये बलारपूरच्या चुन्याच्या खाणीत काम करणाऱ्या अरुण देशमुखला पोलिसांनी मरेपर्यंत मारून विहिरीत टाकून दिल्याचा संशय आहे. या प्रकरणानंतर चंद्रपूर पोलीस स्टेशनप्रमुख श्री. तिवारी यांच्या बदलीची मागणी करण्यासाठी गावातल्या लोकांनी आंदोलन करूनही या वेळीही काही उपाय योजले गेले नाहीत. या नंतर ३१ डिसेंबर १९८० रोजी तलोदी गावात रोजगारावर काम करणाऱ्या दत्ताजी खद्रेला हेडकॉन्स्टेबल धर्मा नेरकरने अमानुषपणे मारले. त्यानंतर तो मेला. यामुळे संतप्त जमावाने पोलीसस्टेशनवर प्रचंड मोर्चा नेला, तरीही परिस्थिती 'जैसे थे'च होती. यापाठोपाठ सिंदेवहीचा यशवंत तुमे, चंद्रपूरमधला अकरा वर्षांचा राजेश सरहरे, आणि अरमोरीच्या पंचायतसमिती कार्यालयातला चौकीदार, यांचे एकापाठोपाठ एक गूढ मृत्यू झाले. गेल्याच महिन्यात शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी हरिप्रसाद मित्रा मोटारसायकलीखाली मारला गेला. मोटरसायकल चालवणाऱ्या व्यक्तीचे राजकारणातल्या एका जेष्ठ व्यक्तीशी घनिष्ट नाते असल्यामुळे याबाबत अजून कोणतीही कारवाई झाली नाही, असे शह-

रांत सर्वत्र बोललं जातं. चंद्रपूरमधली परिस्थिती आता इतकी गंभीर झाली आहे की, प्रत्यक्ष डी. आय. जी. ने देखील या भागात बलात्काराच्या गुन्ह्यांचे प्रमाण सर्वात जास्त असल्याचे कबूल केले आहे.

जुगार, वेश्याव्यवसाय आणि बेकायदा दारूचे प्रमाण शहरात वाढत आहे. अधिकारीवर्गाने आणि गुन्हेगारानी केलेल्या खुनाकडे सोईस्कररित्या दुर्लक्ष होत आहे; इतकेच नाही, तर इथली अधिकारी-यंत्रणा आणि पोलीस या भागातल्या वाढत्या गुंडगिरीबद्दल सतत ओरडत आहेत. दरोडेखोरीला आळा घालण्याच्या नावाखाली सध्या चंद्रपूरमध्ये दाखल झालेली पोलिस कुमक संख्येच्या दृष्टीने मुंबई खालोखाल आहे. १९८१ मध्ये राजुरा आणि सिरोचा या फक्त दोन भागात अत्याधुनिक यांत्रिक यंत्रणा असलेले तीन हजार एसआरपी, दोन डीवायएसपी, तीन सर्कल इन्स्पेक्टर्स आणि दहा सबइन्स्पेक्टर्स होते. जिल्हा अधिकाऱ्यानी याशिवाय दोनशे सशस्त्र पोलिसांची मागणी केली आहे. दरोडेखोरीला आळा घालण्यासाठी एक लाख रुपये मंजूर होऊनही अद्याप एकही दरोडेखोर पोलीसयंत्रणेला पकडता आला नाही !

गुन्हेगारी प्रवृत्ती अशी वाढत असताना गुन्ह्याना बळी पडणाऱ्या सामान्य नागरिकाना मात्र पोलिसाच्या जाचाला तोंड द्यावे लागत आहे. फक्त चंद्रपूर शहरातच नाही, तर आसपासच्या जंगलविभागातील आदिवासीना आणि त्याच्यात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनाही या पोलिसी कारवायाना बळी पडावे लागत आहे. पोलीस कोणत्या थरापर्यंत जाऊन अमानुष हत्या करतील याचं ढळढळीत उदाहरण म्हणजे पेड्डी शंकरचा मृत्यू ! नुकत्याच घडलेल्या खून आणि बलात्काराच्या घटनांत पोलिसांनी उघडउघड गुन्हेगाराची बाजू घेतली आहे.

### उषा कडूकर

जानेवारीच्या दुसऱ्या–तिसऱ्या आठवड्यात चंद्रपूरच्या बाबुपेठ भागात सरकारी शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयात एक आठवड्याचा प्रौढ शिक्षणवर्ग आयोजित केला होता. प्रशिक्षण घेऊन त्या आधारावर महिना ६० रुपये पगार मिळवण्यासाठी आजूबाजूच्या छोट्या खेड्यातील गरीब मुलं–मुली या वर्गासाठी येत होती. २० जानेवारी हा प्रशिक्षण शिबिराचा शेवटचा दिवस होता. या दिवशी रात्री ९ वाजता उषा कडूकर या शिबिरासाठी आलेल्या विद्यार्थिनीचं प्रेत रेल्वेरुळावर एक हात निखळलेल्या अवस्थेत सापडलं. उषा कडूकर ही तोहोगाव गावातली नववी पास झालेली, १९ वर्षांची न्हावी समाजातील गरीब मुलगी ! पोलिसांनी उषाच्या मृत्यूची आत्महत्या म्हणून नोंद केली असली तरी प्रत्यक्ष पुरावा वेगळंच दर्शवतो. नागरिक कृती समितीने गोळा केलेल्या माहितीवरून असं कळलं की, या मुलीला जवळच्या रस्त्यावरून, रेल्वेलाइनच्या जवळच्या झोपडीत ओढून नेऊन, प्रौढ शिक्षण संस्थेतल्या तीन अधिकाऱ्यांनी तिच्यावर बलात्कार केला. नंतर तिचा खून करून, एक हात तोडून, प्रेत आणि निखळलेला हात रेल्वेरुळावर टाकून उषाने आत्महत्या केल्याचा आभास निर्माण केला. उषा कडूकरचा खूनच झाल्याबद्दल भरपूर पुरावा उपलब्ध आहे !

वृत्तपत्रातल्या फोटोवरून सहज लक्षात येतं की, उषा कडूकरवर जबरदस्ती केली गेली. त्यात तिचे कपडे फाटले. तिच्या पायांत चपलाही नव्हत्या. जरी तिचा एक हात पूर्णपणे निखळला असला तरी रत्नमाला बावने या स्थानिक कार्यकर्तीने सांगितलेल्या माहितीनुसार खांद्यातली मुख्य रक्तवाहिनी नंतर बराच वेळ लोंबत होती. संपूर्ण रेल्वे अंगावरून गेल्यावर अशी शक्यताच उद्‌भवत नाही. याशिवाय प्रकाश इंगळे या शाळेच्या चौकीदाराने हा प्रकार प्रत्यक्ष पाहिला होता. चंद्रपूर गावात रहाणाऱ्या उषाच्या आजोबानी सांगितलं की, मृत्यूपूर्वी एकच दिवस आधी उषा घरी भेटायला आली तेव्हा ती खूप रडली आणि शिबिराला परत जाणार नाही, असं म्हणाली. याचं कारण मात्र ती स्पष्टपणे सांगू शकली नाही. एक दिवसाचा तर प्रश्न आहे, सर्टिफिकेट तरी मिळेल, असं सांगून शिबिराचा शेवटचा दिवस संपण्यासाठी घरच्यांनी तिचं मन वळवलं. या बलात्कार आणि खुनात हात असलेल्या तीन अधिकाऱ्यांबद्दल सर्व गावात बोललं जातं; पण अद्याप कोणालाही संशयास्पद गुन्हेगार म्हणून ताब्यात घेतलेलं नाही !

त्याच्या दुसऱ्याच दिवशी, २१ जानेवारीला टिकमचंद सराफ या लक्षाधीश जवाहिऱ्याची सून नूतन सराफ मृतावस्थेत सापडली ! याही वेळेला पोलिसांनी ही केस आत्महत्या म्हणूनच नोंदवली; पण प्रत्यक्षात या प्रकरणात ज्याचा हात असल्याचे बोलले जाते तो माणूस मोकळाच आहे !

या दोन खुनांच्या प्रकरणात पोलिसानी उघडउघड दुर्लक्ष केल्यामुळे लोकांचा क्षोभ वाढला. २३ जानेवारीला गांधी चौक या शहराच्या मध्यवर्ती भागात जाहीर सभा झाली. २९ तारखेला शहरातल्या ८० महत्त्वाच्या कार्यकर्त्यांची बैठक होऊन 'गर्जना' या स्थानिक वृत्तपत्राचे संपादक श्री. बाळकृष्ण पोटदुखे यांच्या अध्यक्षतेखाली नागरिक कृती समितीची स्थापना झाली. यानंतर समितीच्या सभासदांनी कलेक्टरकडे या प्रकरणात तात्काळ कारवाईची मागणी करणार स्मरण-पत्र पाठवलं.

दुसऱ्या आठवड्यात कृती समितीने शहराच्या चौकाचौकात सभा घेतल्या. त्याचंच पर्यवसान ५ फेब्रुवारीच्या प्रचंड जाहीर सभेत झालं. या सभेत ६ फेब्रुवारीच्या 'सर्वत्र बंद'ची घोषणा झाली. त्याच दिवशी सभेनंतर पोलिसानी सर्वत्र जमावबंदी जारी केली. 'बंद'ला गावात सर्वत्र प्रतिसाद मिळाला. सर्व कारखाने, दुकानं आणि संस्था ६ फेब्रुवारीला बंद होत्या ! समितीच्या १८ कार्यकर्त्यांना पोलिसांनी त्या दिवशी अटक केली. या अटकेनंतर मनाईहुकूम जारी असूनदेखील शहरातली सर्व माणसं स्वेच्छेने अचानक गांधी चौकात गोळा होऊ लागली आणि त्याचंच रूपांतर मोठ्या मोर्चात झालं. यानंतर कलेक्टरकचेरीत झालेल्या भेटीत पोलीस-सुपरिंटेंडेंट श्री. नेगी यानी घटना अधिक तपासासाठी सीआयडीकडे सुपूर्द केल्याचं समितीच्या सभासदाना सांगितलं.

यानंतर महिना झाला तरी सीआयडीकडून कोणतीही कारवाई झाली नाही, की गुन्ह्याच्या तपासणीबाबत कोणतीही बातमी बाहेर आली नाही. ७ मार्चला नागरिक कृती समितीने एक जाहीर सभा बोलावली. या सभेत प्रकाश इंगळेने सांगितलेली उषा कडूकर प्रकरणाची टेप केलेली हकीकत जाहीररीत्या लोकांना ऐकवली गेली.

२९ जानेवारीला या प्रकाश इंगळेलाच पोलिसांनी किरकोळ कारणास्तव अटक केली. समितीचे काही लोक इंगळेला भेटायला गेले तेव्हा त्यांनाही पोलिसांनी अटक करून त्याच्याच कोठडीत बंद केले!

तुरुंगातून बाहेर पडल्यावर स्वत:चा जीव वाचवण्यासाठी प्रकाश इंगळे चिंदवडा या त्याच्या गावी निघून गेला. पोलिसाच्या दबावामुळे इंगळे फिरला, हे उघड होते. २१ मार्चला बलात्कार गुन्ह्यातल्या आरोपीपैकी एकाने वर्तमानपत्रात एक बातमी प्रसिद्ध केली. या बातमीत दारूच्या नशेत आपण सर्व बोललो आणि याबद्दल समितीने आपल्याला ७०० रु. दिले, असे इंगळे म्हणत असल्याचं छापण्यात आलं; पण बलात्कार आणि खुनाची प्रत्यक्ष पाहिलेली बारीक-सारीक तपशिलांसकटची माहिती, त्यानंतर पोलिसांनी केलेला अत्याचार आणि अटक याबद्दल इंगळेनं सांगितलेली, टेप केलेली माहिती ज्यांनी ऐकली ते, हे सभाषण दारूच्या नशेतलं आहे, असं म्हणायला तयार नाहीत. प्रथम मराठी आणि नंतर हिंदी अशा दोन भाषांत ही माहिती टेप केली आहे.

या दोन खुनांमुळे चंद्रपूरमधले वातावरण पेटलेलं असतानाच बबलू भुटा या १६ वर्षांच्या मुलाचं पोलीसकोठडीत निधन झालं. ५ फेब्रुवारीला बबलूला अटक केल्यानंतर पोलिसानी त्याला क्रूर पद्धतीनं मारहाण केली, असं प्रत्यक्ष घटना बघणाऱ्यांनी सांगितलं. ९ फेब्रुवारीला बबलू हॉस्पिटलमध्ये मरण पावला. हेडकॉन्स्टेबल कल्लामने केलेल्या मारहाणीमुळेच बबलू मेला, असं त्याच्या वडलांचं आणि वकील साळवी यांचं म्हणणं आहे. पोलीस आणि डॉक्टरी अहवालात बबलू विषबाधेमुळे मेल्याचे नोंदवले आहे. विषबाधेच्या या बातमीवर कोणाचाच विश्वास नाही. ज्यांनी बबलूच्या अंगावरचे माराचे वण आणि जखमा पाहिल्या त्यांनी पोस्टमार्टेममधली माहिती खोटी असल्याचे म्हटले आहे.

बबलूची केस नागरिक कृती समितीने हातात घेतली नाही. कारण समितीच्या मते तो गुन्हेगार होता; पण युवक कृती समितीचे गौतम तोडे आणि सुदर्शन समाज संस्थेचे अध्यक्ष मोहन बिरिआ यांच्या म्हणण्यानुसार पोलिसांनी बबलूला एकूण तीन वेळा अटक केली; पण दरवेळी त्याची निर्दोष सुटका झाली होती. बबलू गुन्हेगार असो वा नसो, पण तो पोलीसकोठडीत मेला हे खरंच आहे.

'बंद'नंतर थोड्याच दिवसात झालेल्या या मृत्यूमुळे लोक पोलिसांवर संतप्त झाले. नागरिक कृती समितीने पाठिंबा दिलेला नसताना आणि मनाई हुकूम जारी असताना शेकडो नागरिक बबलूच्या अंत्ययात्रेत सामील झाले, स्मशानभूमीवर अनेक जळजळीत भाषणं झाली. लोकांच्या सहानुभूतीच्या या आविष्काराने चिडलेले पोलीस बेहोश होऊन मुख्य शहरात धुमाकूळ घालू लागले. पोलिसानी हाताला लागेल त्या प्रत्येक माणसाला झोडपायला सुरुवात केली. दुकानदार, डॉक्टर, साधे पादचारी, कोणीही पोलिसाच्या तावडीतून सुटले नाहीत. पोलिसानी आठ जणांना अटक केली. एका संध्याकाळी केलेल्या लाठीहल्ल्यात शेकडोजण जखमी झाले.

बबलूच्या खुनाबद्दल कोणतीही हालचाल न केल्याच्या निषेधार्थ सुदर्शन समाजतल्या लोकांनी एक मूक मोर्चा काढला. त्यात विदर्भातले झाडूवाला समाजाचे सर्व लोक सामील झाले. याबाबत अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.

यातली महत्त्वाची आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे, चंद्रपूरमधले दोन खासदार (शांताराम पोटदुखे, विलास मुत्तेमवार), चार आमदार (बाबुराव मद्यवी, यशोधरा बजाज, रमेश पुगलिया, माधवराव ताजणे) आणि एक विधानपरिषदसदस्य (अब्दुल शफी) हे सर्वजण नूतन सराफ आणि बबलूच्या मृत्यूबद्दल मूग गिळून आहेत.

इथल्या राजकारण्याचे कित्येक नातेवाईक जंगल आणि खाण कॉंट्रॅक्टर्स आहेत. इतकेच नाही तर आपले गैरव्यवहार सुरळीत चालू ठेवण्यासाठी उच्च अधिकारी पोलीस आणि गुंड यांच्याशी त्यांनी संधान बांधल्याचं बोलल जातं.

याचाच दुसरा भाग म्हणजे, गुन्हेगारीचा सतत वाढणारा, किफायतशीर धंदा करणारे इथले गुन्हेगार-जग. शहरात सर्वत्र गुन्ह्यांचं प्रमाण वाढलं आहे. बलात्काराच्या केसेस या भागात सर्वाधिक आहेत, हे पोलीस डीआयजीनीच कबूल केलं आहे. यात आश्चर्य वाटण्यासारखं काही नाही. जेव्हा सत्तास्पर्धेतल्या शक्तिशाली लोकांचाच गुन्ह्यात हात असतो तेव्हा गुन्हेगार शिक्षेशिवाय मोकाट सुटणार, हे उघडच आहे. याची ठळक उदाहरणं म्हणजे, सध्या चंद्रपूरचा 'मॅम्बलिंग किंग' म्हणून ओळखला जाणारा एके काळचा म्युनिसिपल कौन्सिलर शहरात ठिकठिकाणी आपले 'अड्डे' चालवतो. हिऱ्याचा चोरटा व्यापार करून इथल्या प्रसिद्ध व्यापाऱ्याने लाखो रुपये कमावले आहेत. इथल्या दोन बलाढ्य व्यक्तींनी चालवलेलं 'बाल सुधार केंद्र' कुविख्यात आहे. सुधार केंद्राच्या पूर्वीच्या सचीव रत्नमाला बावने म्हणाल्या की, हे केंद्र म्हणजे उच्च अधिकाऱ्यांना त्यांच्या कामासाठी फुकट मुलं आणि कामगार पुरविणारा अड्डाच आहे. या व्यवसायात पोलिसानाही बराच पैसा मिळतो. भ्रष्टाचार आता या थराला गेला आहे की, खुद्द एका पोलीसअधिकाऱ्याची बायकोसुद्धा या पिळवणुकीत सामील आहे. तिचे पिळवणुकीचे मार्ग इतके क्रूर आहेत की, ती चंद्रपूर भागात 'फूलनदेवी' म्हणूनच प्रसिद्ध आहे.

भ्रष्ट अधिकारी, पोलीस, राजकारणी आणि कंत्राटदार यांच्या भ्रष्ट जाळ्याच्या अमलात सगळेच ओढले जात आहेत. त्यांच्याविरुद्ध जाणाऱ्या कोणाचीही गय केली जात नाही! नागपूरच्या 'हितवाद' दैनिकाचा बातमीदार सुरेश घोपटे याला ९ फेब्रुवारीला पोलिसानी क्रूर मारहाण केली. या भागात घडणाऱ्या कुप्रसिद्ध घटना आणि पोलिसी अत्याचार उघडकीला आणण्यासाठी घोपटे सतत धडपडत होते. पोलीस येवढ्यावरच थांबले नाहीत. त्यांनी घोपटेच्या मित्रांनाही मारहाण केली आणि गाव सोडून जाण्यासाठी धमकावलं आणि सतत दबाव आणला. ही गोष्ट आता 'प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया'च्या अधिकारात दाखल होऊनही सुरेश घोपटेला मृत्यूची टांगती तलवार सतत भेडसावत आहे.

चंद्रपूरमधला सामान्य माणूस अजूनही धुमसतो आहे. गावातल्या या चाडाळचौकडीबद्दल (पोलीस, राजकारणी, कॉंट्रॅक्टर आणि अर्थातच गुन्हेगार) लोकांचा संताप वाढतो आहे. चंद्रपूरचं दुसरं धनबाद तर होणार नाही ना, हा प्रश्न सगळ्यानाच भेडसावतो आहे.

('संडे ऑब्झर्व्हर', दि. २८ मार्च १९८२ च्या अंकावरून साभार.)

□

उत्तरमीमांसा : ४५ :

स. शि. भावे

# वाहतुकीचे नव्हे, वाहनांचेच नियोजन हवे !

उन्हाळा चांगलाच कडाडला आहे. वर्ष-प्रतिपदेनंतर रामनवमीपर्यंतच पुण्याने ४०-४१ सेल्सिअर्सची मर्यादा गाठली आहे. पुणेच काय, मुंबईही चांगलीच तापली आहे ! मुंबईत घामाचा त्रास होतो; पण तापणे त्या मानाने कमी असते. यंदा २८ मार्चला मुंबईने देखील ४० सेल्सिअर्सची मर्यादा ओलांडून विक्रम केला आहे.

उन्हाळयाचे नेहमीचे त्रासही जोरात सुरू झाले आहेत. डांबरी रस्त्यांची धग वाढली आहे. बेगुमानपणे झाडे तोडली गेली आहेत, हे पादचाऱ्यांना तापत्या डोक्यामुळे जास्त तीव्रतेने जाणवू लागले आहे. डबक्यांची संख्या आणि त्यातले पाणी आटू लागले असले तरी हवेच्या अनुकूलतेने डास वाढले आहेत. नागरिकांना मिळणाऱ्या पाण्याचा दाब १५ मार्चपासून अचानक कमी झालेला आहे त्याचा कसलाही खुलासा अपेक्षेप्रमाणे झालेला नाही. हे कमी दाबाचे पाणीदेखील नियमित वेळेत मिळेल, अशी शाश्वती नाही. आठवड्यातून तीन तीन दिवस ते अचानक अदृश्य होते आहे !

असे का व्हावे या शंकेची झळ उन्हाळया-मुळेच वाढली आहे. पर्वती जलशुद्धीकरण केंद्राच्या अधिकाऱ्यांना विचारावे तर ते सांगतात–

'पाणी पाटबंधारे खात्याकडून मिळते. ते सध्या कमी पाणी देतात. त्यानाच विचारा !'

पाटबंधारे खात्यात जावे तर तेही ताप-लेले असतात. अर्थात उन्हाळयामुळे ते सांग-तात. –' जूनअखेर धरणातलं पाणी पुरायला पाहिजे ना ? म्हणून ते थोडथोडंच पुरवलं पाहिजे ! जास्त पुरवलं तर उन्हाळयामुळं जास्त वापरलं जाईल म्हणून आतापासूनच कमी पुरवलेलं बरं !'

'पण हे जाहीर करायला काय हरकत आहे ?' आपण भाबडेपणाने विचारतो. किती वेडेपणाचा हा प्रश्न, अशा आविर्भावात आपल्याला उत्तर मिळते, 'जाहीर काय करायचंय त्यात ? उन्हाळा आला, की हे व्हायचंच. वर्षानुवर्ष हेच चाललंय !'

आपण गप्प बसतो. कारण ही प्रश्नोत्तरे-सुद्धा सहजासहजी झालेली नसतात. तास-दोन तास साहेबाची वाट पाहणे, मग साहे-बानी येऊन तडक केबिनमध्ये जाणे, मग अर्ध्या-पाऊण तासाने बोलावणे, त्रासिक चेहऱ्याने आणि चिडक्या आवाजात 'काऽऽय' असे विचारणे. प्रथम 'विभागीय धोरण' म्हणून उत्तर देण्याचे टाळणे–असा एकूण अनुभव आपण घेतलेलाच असतो.

शिवाय, आपल्याला हेही माहीत असते की, धरणाचे पाणी धरणाबाहेर पळते आहे. फक्त ते आपल्या शहराकडे ते येत नाही. आडसाली उसाकडे, उन्हाळी बटाटयाकडे जरा जास्त पळते आहे. पाटबंधारे खात्यात अधिकारी असलेल्या एखाद्या मित्राला ही गोष्ट सांगावी तर तो गडगडाटी हसून म्हणालेला असतो, 'शेतीला पाणी जाणं म्हणजे आपल्याकडेच येणं. पीक चागलं येणं म्हणजे आपल्याला अन्न मिळणं. आधी खाण्याची सोय करू. मग पिण्याची !'

तर हे वर्षानुवर्ष असेच चालले आहे, हे आपल्याला माहीत असते. तरीही, अधिकृत उत्तर घेण्यासाठी आपण या कचेरीतून त्या कचेरीत जातो अधिकृत उत्तर मिळेल, असा आपल्याला विश्वास वाटतो म्हणून आपण जातो असे नव्हे. आपणही उन्हाळयाने त्रास-लेले असतो म्हणून जातो !

कारण, आपले नेहमीचेच त्रास उन्हाळयात अधिक त्रासदायक होत असतात.

घरापासून बसस्टॉपपर्यंत चालणे अधिक त्रासाचे वाटू लागते. हिवाळयात हवेहवेसे वाटणारे कोवळे ऊन आता कोवळे नसते. सकाळच्या उन्हाचे धारदार, तीक्ष्ण भाले समोरून किंवा बाजूने आपल्यावर हल्ला करीत असतात. बसस्टॉपवर उभे राहणे देखील असह्य होते ! डोक्यावर लाकडी छत असले तरी ऊन पाय भाजून काढीत असते. शिवाय लाकडी छत नावाची सावली देत असले तरी थंडावा देऊ शकत नाही. उन्हा-ळयामुळेच अधिक बसी नादुरुस्त होतात स्टॉपवर कमी बसी येतात, त्या थाबत नाहोत. स्टॉपवरचा उन्हाळा अधिकच कडक होतो.

कचेरी काय, घर काय, आतून–बाहेरून सारे गरम झालेले असते. डांबरामुळे रस्ते आणि सिमिटाच्या छतामुळे घरे अधिक गरम होतात. कौलारू घराची, अंधारलेल्या माज-घराची, मंद झुळकानी सुगंधित झालेल्या देवळाच्या सभामंडपाची, कळवळून आठवण येते. दुपारची वामकुक्षी ! विशेषतः उन्हा-ळयातली. आपोआप अंगात शिरून ताबा घेणारी. या मधुर वामकुक्षीसाठी अशी अर्ध–अंधारी, थंडगार ठिकाणे हवी असतात. अशी ठिकाणे आता नाहीशी होत चाललीत. शह-रात तर ती दुर्मिळच मग डोळे मिटू लाग-ताना मनातल्या मनात आपण अशा ठिका-णात शिरल्याची कल्पना करतो. त्यातल्या त्यात सुख घेण्याची माणसाची सवय. ती कारणी लावतो.

¤

सध्याच्या या उन्हाळी आक्रमणाच्या जोडीने आणखीही सामाजिक आक्रमणे अधिक तीव्रतेने जाणवत आहेत.

प्राध्यापकांच्या संपाचे आक्रमण हे खास उन्हाळी आक्रमण होय. यंदा या आक्रमणाची तीव्रता अद्यापि कायम आहे. याविषयी 'उत्तर-मीमांसे'ने आपली भूमिका यापूर्वी दोन वेळा स्पष्ट केली आहे. आता महाराष्ट्र राज्य पालक शिक्षक संघातर्फे अध्यक्ष सौ. शांता किर्लोस्कर आणि चिटणीस डॉ सौ. श्यामला बनारसे यांनी पालकानी जागरूक व्हावे, असे आवाहन केले आहे. 'उत्तरमीमांसे'ने हे आवा-हन दोन महिन्यांपूर्वी केलेले होते. (उत्तर-मीमांसा ' ३८ : ६२८२.).

सेमेस्टर पद्धतीचे गेल्या तीन-चार वर्षांत झालेले अविचारी आक्रमण आता थोपवा, असे आवाहन प्राचार्य बाळ गाडगीळ यांनी नुकतेच केले आहे. (सकाळ : २८–३–८२). ही खर्चिक, साहेबी चैन आपल्याला परवडत नाही व पेलत नाही, ही त्यांचा तक्रार वास्तव

व रास्त आहे. कोणाच्या तरी व्यक्तिगत प्रतिष्ठेसाठी सारे विद्यापीठ आणि त्यातील हजारो विद्यार्थी या सेमेस्टर पद्धतीने 'बनविले' जात आहेत. प्राध्यापकांच्या संपापेक्षाही विद्यार्थ्यांवरील हे छुपे आक्रमण अधिक भयानक आणि क्रूर आहे. पालकांनी या आक्रमणाबाबतही जागरूक होऊन सेमेस्टर पद्धतीचे हे हुकुमशाही आक्रमण मोडून काढले पाहिजे. 'उत्तरमीमांसे'ने याबाबतही आपली परखड मीमांसा 'माणूस'च्या वाचकाना सादर केली आहे. (उत्तरमीमांसा: ४१ : १३ मार्च ८२).

उन्हाळयाच्या धगीत विशेष तीव्रतेने जाणवणारे आणखी एक आक्रमण म्हणजे, परिसराच्या संतुलनावर आणि शांततेवर चालू असलेले आक्रमण. या आक्रमणाबाबतही आपण आतापावेतो उदासीनच होतो. पर्वतीभोवतीची झाडी तोडली गेली. पर्वतीच्या भोवताली, निम्म्या उतारावर वाटेल तशी वस्ती झाली. जलशुद्धी केंद्राच्याही वरच्या भागात वस्ती झालेली आहे. तिथले सांडपाणी केंद्राच्या तलावात झिरपण्याचा धोका मोठा आहे; पण याविषयी असावयास हवे तेवढे आपण जागरूक नाही आणि जे जागरूक आहेत, ते समर्थ नाहीत. कारण ते संघटित नाहीत !

पर्वतीच्या देवदेवेश्वर संस्थानाच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष म्हणून लागोपाठ सहाव्या वर्षी निवडून आलेले प्रा. भाऊसाहेब पटवर्धन मध्यंतरी भेटले होते. त्यानी ही व्यथा व्यक्त केलीच आणि विश्वस्त मंडळाजवळ अंमलबजावणीचे कसलेही अधिकार नसल्याबद्दलची खंतही सांगितली.

भाऊसाहेबांची ही खंत आज अनेकांच्या मनात जागी झाली आहे या मंडळींनी 'परिसर' या नावाची एक संघटना स्थापन केली आहे. पुणे विद्यापीठाच्या बांधकामात आणि 'मास्टर प्लॅन'मध्ये परिसराच्या संतुलनाकडे कसे दुर्लक्ष झाले आहे, हे या मंडळींनी नुकतेच प्रकट केले आहे आणि विद्यापीठाचा परिसर आक्रमणापासून शक्य तितका वाचवावा, असा या मंडळींचा मनसुबा आहे. 'सकाळ'ने या कामी मदतीची आणि जागल्याची भूमिका घेतली आहे, हे विशेष नमूद करावयास हवे. 'गड गेले, आता टेकडया वाचवा!' आणि 'परिसराच्या शोधात विद्यापीठ' हे लागोपाठ आलेले अग्रलेख नवी जागरूकता निर्माण करण्यासाठी लिहिले आहेत. 'आपण किती अस्वच्छता सहन करू शकतो' या मीमांसेची (उत्तरमीमांसा : २४ : २६ सप्टेंबर, ८१) येथे आठवण होणे अपरिहार्य आहे.

आजच्या मीमांसेत विचारात घेण्याजोगे महत्त्वाचे आक्रमण म्हणजे पुण्याच्या — कोणत्याही शहराच्या—रस्त्यावर होत असलेले वाहनांचे आक्रमण. श्री. टी. बी. मोडक या स्थापत्यतज्ञ जागरूक नागरिकांनी विस्तृत लेखात ('सकाळ' : २८ मार्च, ८२) या आक्रमणाचे भयानक रूप शास्त्रीय पद्धतीने मांडले आहे. त्याचे म्हणणे थोडक्यात असे :

'... छाती, कान, नाक यांवर धूळ, आवाज, आणि मोटारीच्या एक्झॉस्टमधून येणारा धूर यानी अत्याचारच आरंभला आहे... चिपळूणकर रोडवरील (कर्वे रस्ता व सेनापती बापट रस्ता यांना जोडणारा लॉ कॉलेज रस्ता) भयानक रहदारीमुळे प्रदूषण वाढले असून बाजूने राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. या रस्त्यांवरून जाणाऱ्या वाहनांनाही धोका उत्पन्न झाला आहे. कारण हा रस्ता अवजड वाहनांसाठी मुळात बांधलेलाच नाही. तरीही, प्रत्येक तासाला ७४ अवजड ट्रक व बसी, ९७ मोटरगाडया, ३७५ स्कूटर आणि मोटरसायकली, ५७५ सायकली या रस्त्यावरून धावत असतात. याचा अर्थ दर मिनिटाला सुमारे १९ वाहने...या बाबतीत अधिकाऱ्यांची अक्षम्य बेपर्वाई असते. याचे एक उदाहरण म्हणजे, रस्तारुंदीचे व दुरुस्तीचे काम या रस्त्यावर अठरा महिने चालू आहे! रस्ता केवढा ? तर एक किलोमीटर. या कामाला वास्तविक चार महिने पुरेसे आहेत. ...येथे कर भरणारे जे नागरिक राहतात, त्याना करापासून सोयी तर लाभत नाहीतच. पण धूळ, आवाज, गलिच्छ धूर आणि सदैव स्वत.ला व मुलांना अपघात होतील, हे भयच ते कर देऊन विकत घेत असतात !'

श्री. मोडक यानी चिपळूणकर रस्त्याचे वर्णन, स्वतः पाहणी करून केले आहे; पण कोणत्याही शहरातल्या कोणत्याही रस्त्याला हे वर्णन जसेच्या तसे लागू पडेल, यात शंका नाही.

लक्ष्मी रस्ता आणि कुमठेकर रस्ता यावर सुरू केलेल्या एकेरी वाहतुकीने काय झाले ? त्या रस्त्यांवर वेगाने वाहने चालविणारांची नाममात्र सोय झाली, असे म्हणतात. खरे म्हणजे तशीही सोय झालेलीच नाही.

रस्ते एकेरी झाल्याने तेथे जास्त वाहने उभी करण्याला परवानगी मिळाली. सध्या दोन्ही बाजूना वाहने उभी असतात. म्हणजे वाहने चालविण्यासाठी रस्ता अरुंद तो अरुंदच राहिला ! त्यामुळे वाहने वेगात जावीयावी, हे उद्दिष्ट साध्य झाले नाही. सुरक्षितता वाढली का ? तर तीही नाही. पदपथांवरील दुकाने कायमच आहेत. लक्ष्मी पथावर एका बाजूने आणि कुमठेकर पथावर दोन्ही बाजूनी पदपथ नाहीत, नागरिकाना पथांवरूनच चालावे लागते. कडेला उभ्या असलेल्या वाहनांमधून उभा खोखो खेळत, कधी पथाच्या मध्यभागातून, त्याना चालावे लागते. उभ्या होणाऱ्या वाहनांतून उतरणाऱ्या आणि कोठेही (रस्त्याला कठडे नाहीत) रस्ता ओलांडणाऱ्या पादचाऱ्यांशी यांचा उभाआडवा संघर्ष होत असतो.

म्हणजे या एकेरी वाहतुकीने ना वाहनचालकांची सोय झाली, ना पादचाऱ्यांची! केळकर पथाकडून वर व त्या पथाकडे खाली जाणारांची तगमग जर आपण पाहिली तर गैरसोयीचा आणखी एक पैलू ध्यानी येईल. वाहने उभी करणारांची सोय झाली म्हणावे, तर तसेही नाही. वाहने इतकी आहेत की, दहा वाजता खरेदीला येणाराला विजय टॉकीजशी वाहन उभे करून, चालतच कापडबाजारात यावे लागते. त्यामुळे लोक आपली वाहने काटकोनात असलेल्या छोटया गल्ल्यात उभी करतात. याने नवी समस्या उभी राहते.

लक्ष्मी रस्ता आणि कुमठेकर रस्ता यांना काटकोनात छेदणाऱ्या गल्ल्या आधी अरुंद. त्यात या वाहनांची दाटी. एकेरी पद्धतीतून निर्माण झालेला हक्क, अशा भूमिकेतून वाहनचालक येथे आपली वाहने आत्मविश्वासाने उभी करत असतात. या गल्ल्याना पदपथ नाहीत. काही अंतरापर्यंत येथेही दोन्ही बाजूंना दुकाने आहेत. शिवाय घरांची प्रवेशद्वारे जवळजवळ आहेत. ट्रक राहू दे, एखादा टेम्पो जरी उभा राहिला तरी दोनदोन घरांची दारे बंद होतात. अंगणातील स्कूटर रस्त्यावर आणणे अशक्य होते. म्हणजे चाल-

णाऱ्यांनाच नव्हे, तर घरातल्या घरात सुखाने राहू इच्छिणाऱ्यानाही त्रास होतो ! अडथळा न येता, लकडी पुलापासून नगरकर तालीम चौकापर्यंत वाहनाना एका वेगात जाता यावे म्हणून अमलात आणलेली ही एकेरी वाहतुकीची योजना ! तिने मूळ हेतू तर साध्य झाला नाहीच उलट नवीन, गभीर समस्या मात्र उभ्या ठाकल्या आहेत !

याला जबाबदार कोण ? श्री. मोडक अधिकाऱ्याच्या बेपर्वाईकडे बोट दाखवतात; पण हे पुरतेपणी. पटू शकत नाही. बहुसंख्य अधिकारी व्यक्तिशः बेपर्वा आहेत, असे म्हणणे रागाचे होईल अन् धाडसाचेही ! मला वाटते, आपली प्रशासकीय पद्धती या दुरवस्थेला जबाबदार आहे.

आपल्याकडे जीवनाची निरनिराळी क्षेत्रे निरनिराळ्या काळी आणि निरनिराळ्या निमित्तांनी प्रशासनाकडे आली,तसेतसे प्रशासनाचे विभाग वाढले. कामाचे छोटे छोटे भाग त्याच्यात वाटले गेले. यामुळे एकसूत्रीकरण उरले नाही आणि साऱ्या कामांची जबाबदारी कोणा एका विभागाची अथवा व्यक्तीची उरली नाही. या परिस्थितीत आजच्या अकार्यक्षमतेचे मूळ आहे.

आज रस्त्यावरील वाहतुकीचे नियंत्रण पोलिसांकडे आहे, तर रस्ता–दुरुस्तीचे काम महापालिकेकडे आहे. पाणीपुरवठा आणि टेलिफोन या दोन खात्यांतील कर्मचारी कसे आळीपाळीने रस्ता खोदीत असतात, ते आपण पाहतोच. या साऱ्या विभागांचे एकसूत्रीकरण व्हावे या दृष्टिकोणातून 'शहर–नियोजन' ( town planning ) खाते सुरू झाले. या खात्याचे नियंत्रण खरे तर अन्य साऱ्या खात्यांवर हवे. कागदोपत्री ते असते; पण फक्त कागदावरच असते ! प्रत्यक्षात बहुतेक वेळा, विशेष बाबी म्हणून या खात्याकडून अपवादात्मक परवानग्या सतत मागितल्या जात असतात आणि दिल्या जात असतात. म्हणजे अपवाद करा म्हणणारे आपणच आणि अपवाद का केले म्हणून तक्रार करणारे आपणच !

या 'आपण' या घटकाचा विचार कोण करणार ? एकसूत्री, कार्यक्षम प्रशासनात हा घटक नेहमी आडवा येत असतो. 'आपण' काय करीत नाही ? कोणते नियम मोडीत नाही ? आपण चुकीच्या बाजूने चालतो, एकेरी रस्त्यात 'बंद' मोडून उलटे जातो, पदपथावर वाहन चालवतो, नको तेथे हमखास रस्ता ओलाडतो ! आपण सारे नियम मोडतो, शिवाय नतर बोटेही मोडतो !

हे कधी काळी थाबेल का ? आज तरी तशी शक्यता दिसत नाही. माणसेच काय, राष्ट्रेही वाहतुकीचे नियम मोडीत आहेत. यामुळे येत्या काही वर्षांत कृत्रिम उपग्रहांची गर्दी होऊन अडचण होणार आणि मग भाडणे सुरू होणार असा दाट संभव निर्माण झाला आहे.

सध्या मोजकी राष्ट्रे अवकाशात उपग्रह सोडीत आहेत शास्त्रीय निरीक्षण, संशोधन, दूरदर्शनासाठी पुन:प्रक्षेपण अशा कामासाठी हे उपग्रह सोडले जातात. यासाठी विशिष्ट लहरीच्या भूस्थिर कक्षेत हे उपग्रह फिरणे आवश्यक असते. भूस्थिरकक्षेचा (G50) पट्टा विषुववृत्तापासून साधारण ३६,००० किलोमीटर दूर आणि सध्या अवकाशात असलेल्या उपग्रहासाठी पुरेसा रुंद आहे. तथापि, येत्या दहा–वीस वर्षांत अधिकाधिक देश आपापले उपग्रह, स्वतः किंवा इतर प्रगत देशांच्या मदतीने, अवकाशात सोडीत राहणार यात शंका नाही. अशा रीतीने अवकाशात उपग्रहाची दाटी होईल व कक्षेच्या पट्ट्यात अवरोध–ट्रॅफिक जॅम तयार होईल.

हे टळावे म्हणून भारताने नुकतीच एक सूचना केली आहे. ज्या ज्या उपग्रहाचे काम सपेल त्या त्या उपग्रहांना अवकाशात फोडून विरवून टाकावे अशी ही सूचना आहे. त्या त्या उपग्रहात अशी कालबद्ध विनाशक-यंत्रणा सहज बसवता येईल असे भारतीय शास्त्रज्ञांचे मत आहे.

मला वाटते, अवकाशातल्याप्रमाणे पृथ्वीवर देखील वाहनाचे नियोजन हाच आजच्या वाहनसमस्येवरील परिणामकारक उपाय आहे. अवकाशात, उपयोग संपल्यावर उपग्रह नाहीसा करावा ही भारताची सूचना आहे. येथे उलटे करावे. आवश्यकता असली तरच रस्त्यावर वाहन येईल असा नियम असावा. घेतले वाहन की सोडले फर्रर्र ! असे आजच्यासारखे अराजक नसावे. वाहनाची अगदी खरी गरज माणसाला फारच कमी वेळा असते. फक्त तेवढ्याच वेळी वाहन चालवायला द्यावे. या नियोजनाने रस्ते, प्रदूषण, अपघात अशा किती तरी प्राणघातक समस्या मोठ्या प्रमाणात कमी होतील.

माणसाचे नियोजन ही आवश्यकता नाही तरी आपण समजून घेतलीच आहे. या पार्श्वभूमीवर वाहनांचे नियोजन पटायला अडचण भासू नये.

□


# टॉलस्टॉय – एक माणूस

**दुसरी आवृत्ती**

**लेखिका : सुमती देवस्थळे**

**किंमत : ५५ रुपये**

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०**

अवती भवती । शरद कृष्णन

## □ १ सफदरजंगमधील वादळ

एखादी गोष्ट आपल्याला आवडली नाही तर आपली नापसंती व्यक्त करण्याचे इंदिराजींचे काही खास तंत्र आहे. ज्याच्या हातून प्रमाद घडला असेल त्याला त्याचे शासन भोगावेच लागते. कै. संजय गांधी यांच्या पत्नी मनेका अगदी काल-परवापर्यंत पंतप्रधानांच्या घरी रहात होत्या. या बाईंनी राजकारणात भाग घेऊ नये, अशी इंदिराजींची इच्छा होती आणि ते मनेकाला समजेल, अशाच पद्धतीने त्या वागल्या होत्या. संजयच्या निधनानंतर मनेकाने राजकारणात यावे, असे संजयच्या अनेक चाहत्यांनी अनेक प्रकारे सुचवून पाहिले. संजयची खुशामत करण्यात खासियत दाखवणारे खुशवंतसिंग यांनी तर मनेकाचा साक्षात दुर्गा असा उल्लेख केला होता ! मनेकाने सार्वजनिक कार्यक्रमातून भाग घ्यावा यासाठी संजयच्या विशेष जवळ असणारांनी प्रारंभी प्रयत्न केले; परंतु पंतप्रधान याबाबत उदासीन आहेत, ही गोष्ट लक्षात आल्यावर मनेकाचा अनुनय करणारांची संख्या कमी झाली. 'सूर्य' नावाचे मासिक मनेकाची आई चालवत होती. आणीबाणीच्या काळापासून या मासिकाची सूत्रे मनेकाकडेच होती. आणि आपल्या या मासिकातून इंदिराजींच्या पडत्या काळातही तिने त्यांचे जोरदार समर्थन केले होते. कै. संजयच्या राजकीय निर्णयावर मनेकाचा प्रभाव असेलच, असे जरी म्हणता आले नाही तरी तिचा विचार मात्र जरूर घेतला जात असावा. संजयच्या निधनानंतर इंदिराजींच्या मार्गदर्शनाने आणि मान्यतेने आपण अलगद राजकीय मंचावर येऊ, अशी तिची अपेक्षा असावी. तथापी या बाबतीत इंदिराजींचा काही दुसरा विचार होता आणि तो त्यांनी मार्गी लावला. इंदिराजी आपल्या पद्धतीने संजयचा वारसदार निश्चित करत आहेत आणि आपण संजयचे वारसदार नाही, अशी मनेकाची खात्री पटावी, अशा पद्धतीने आणि विलक्षण झपाट्याने इंदिराजींनी राजीवला राजकारणात आणले. इंदिराजींचा होरा लक्षात आल्यावर मनेकाचा उदो–उदो करणारी अनेक मंडळी थंडावली आणि ज्यांना मनेकाने राजकारणात यावे असे वाटत होते; अशांपैकीही अनेक मंडळी राजीवचा उदोउदो करू लागली ! आपल्याला राजकीय रंगमंचावर सहजी प्रवेश मिळणार नाही, हे मनेकाने हेरले असले तरी इंदिराजींची नाराजी तिला नको होती. ती परवडण्यासारखी नव्हती. म्हणून काही प्रमाणात स्वत:च्या इच्छेविरुद्ध ती राजकारणापासून दूर होती. अगदी संजयचा वारसदार म्हणून जरी आपल्याला आणले गेले नाही तरी सुयोग्य सार्वजनिक जीवन आपल्या वाट्याला येईल असा एक तिचा अंदाज होता. हा अंदाज आकाराला येईपर्यंतचा एक उद्योग म्हणून तिने संजयच्या झंझावती आयुष्याचा आलेख लिहिण्याचे काम केले. उदंड छायाचित्रे आणि वेचीव मजकूर असा ह्या प्रकार होता. स्वत: इंदिराजींनी या पुस्तकाबाबत अनुकूल प्रतिक्रिया दिली होती. त्या पुस्तक-प्रकाशनसमारंभासही हजर होत्या. आपण आज ना उद्या इंदिराजींचे मन जिंकू आणि काही मर्यादासह का होईना, पण आपण आपल्याला हवे तसे सार्वजनिक जीवन जगू शकू, असे मनेकाला वाटत होते; परंतु महिन्यामागून महिने सरले तरी कोणतीही हालचाल दिसत नव्हती. दरम्यान राजीवसाठी मात्र योग्य त्या साऱ्या हालचाली होत होत्या आणि आस्ते आस्ते राजीव गांधी पुरेसे शक्तिशाली होऊन बसले ! वरुणचे संगोपन करण्यापलीकडे मनेकाला उद्योग नव्हता. आपण उपेक्षिले जात आहोत, ममी आपल्याकडे पुरेसे लक्ष देत नाहीत, असे मनेकाला वाटू लागले. तिने मग मित्रपरिवार वाढवण्यास प्रारंभ केला. मनेका राजकारणामध्ये किंवा सार्वजनिक जीवनामध्ये नसली तरी तिच्या प्रत्येक हालचालीवर इंदिराजींचे लक्ष होते. तिला काही तरी उद्योग हवा, म्हणून एक वाहतूक कंपनी काढून देण्यात आली. या कंपनीच्या कचेरीत ती रोज जात असे. खेरीज आपल्या माहेरच्या माणसांशी तिचे जवळचे संबंध होते. तिच्या मैत्रिणींमध्ये विजयाराजे शिंदे यांची कन्या वसुंधरा हिचा समावेश होता. आपल्याला न कळत सूनबाई काही हालचाली करत आहेत, असा संशय इंदिराजींना येऊ लागला. मनेका आपल्या काही मित्रांच्या सल्ल्याप्रमाणे वागत आहे, आपल्या विरोधात उभ्या ठाकलेल्या काही पक्षांशी तिची जवळीक वाढत आहे आणि तिच्या मित्रपरिवारामध्ये संघ व भाजपशी संबंध असणारी काही मंडळी आहेत, हे लक्षात आल्यावर इंदिराजीकडून मनेकाला समज देण्यात आली होती; परंतु काही तरी थातुरमातुर उत्तरे देऊन तिने वेळ साजरी केली.

दरम्यान जे 'सूर्य' इंदिराजींचा हिरीरीने पुरस्कार करत असे ते 'सूर्य' मासिक संघ व भाजप यांच्याशी संबंध असणाऱ्या मंडळींना विकले गेले. मनेकाच्या आई अमृतेश्वर आनंद या 'सूर्य'च्या मालक होत्या आणि त्यांच्या विक्री-व्यवहाराशी आपला संबंध नाही, असे मनेका आज जरी सांगत असली तरी त्याचा सारा व्यवहार मनेकाच्या संमतीनेच झाला. तिने जर विरोध दर्शवला असता तर तिच्या आईला हा व्यवहार रेटण्याची हिंमत झाली नसती. 'सूर्य' परत मिळविण्याचे काही प्रयत्न करण्यात आले; परंतु त्याला यश आले नाही. आपली सून केवळ घरात बसून नाही, ती काही उद्योग करत आहे – आणि हे सारे उद्योग आपल्याला अंधारात ठेवून केले जात आहेत, अशी इंदिराजींची भावना असतानाच, लखनौ मेळाव्याची कल्पना पुढे आली. इंदिराजी या मेळाव्याबाबत अनुकूल नाहीत, याची जाणीव मनेकाला नव्हती असे म्हणता येणार नाही. तथापी या मेळाव्याशी संजयचे नाव जोडले गेले असल्याने इंदिराजी ताठर भूमिका घेतील, असे तिला वाटले नव्हते. अकबर अहमद आणि त्यांचा मित्रपरिवार यांनी आयोजित केलेल्या या मेळाव्याला भाजप छुपा पाठिंबा देत आहे, हे समजल्यामुळे इंदिराजी पुरत्या बिथरल्या. पत्रकार परिषद घेऊन त्यांनी सुनेवरील आपला राग व्यक्त केला. मेळाव्यालाही विरोध दर्शविला. इंदिराजींनी जर या प्रकरणी मौन राखले असते तर जी मंडळी या मेळाव्यास हजर राहिली असती, अशी मंडळीही इंदिराजींनी विरोध दाखवताच या मेळाव्या-

पासून दूर राहिली. इतकेच नव्हे तर, ज्यांना शक्य होते त्यांनी मनेका गांधीवर ताशेरेही मारून घेतले. गृहमंत्री सरदार झैलसिंग यानी तर मनेकाजी पक्षाच्या प्राथमिक सदस्या तरी आहेत की नाही, याबाबत शंका व्यक्त केली. भीष्म नारायण सिंग यांना काही कोणी या प्रकरणी प्रतिक्रिया विचारली नव्हती; परंतु इंदिराजीचा लखनौ मेळाव्यास विरोध आहे, एवढे निमित्त पकडून त्यानी, संजयच्या चलतीच्या काळातही मनेकाचे त्याला सहाय्य होते असे दिसत नाही, अशी काही तरी प्रतिक्रिया व्यक्त केली.

### पुढे काय ?

या मेळाव्यास इंदिराजीचा विरोध असणार, याची मनेकाला कल्पना असावी. तथापी मेळाव्याच्या आदल्याच दिवशी इंदिराजीनी पत्रकार परिषदेमध्ये जी विलक्षण ताठर भूमिका घेतली, ती मनेकाला अभिप्रेत नसावी. फार तर आपल्याकडे विचारणा होईल आणि कदाचित तडजोड म्हणून एखादे सोयिस्कर पद आपल्याकडे दिले जाईल, असा तिचा अंदाज असावा; पण इंदिराजींनी ताठर भूमिका घेतल्यामुळे लखनौमधील आपल्या भाषणात तिने एकदम नरमाईचा सूर लावला. त्यामध्ये इंदिराजीचा पाठपुरावा करण्याचे आवाहन असले तरी जागा मिळेल तिथे टीकेची पडघम वाजवण्यात आली होती. लखनौ मेळाव्याला हजर राहण्याबाबत मनेकाचा जो आक्रमक पवित्रा होता त्याचे प्रतिबिंब तिने केलेल्या भाषणात खचितच नव्हते. लखनौ मेळावा संपवून घरी आल्यावर आपण काही तडजोड काढू, अशी तिची अपेक्षा असावी; पण १ सफदरजंग रोडमधील परिस्थिती अत्यंत प्रतिकूल होती. तिला घर सोडण्याबाबत सुचवण्यात आले. तिने मुलाला नेऊ नये यासाठीही प्रयत्न झाले; ते यशस्वी झाले नाहीत. थोरामोठ्यांच्या घरामधील तणावाची कारणे वेगळी असली तरी प्रकरण सासू-सून संघर्षाच्या पातळीवर उतरले की मामला सर्वसाधारण चार घरामध्ये असतो तसाच असल्याचे दिसून येते. लखनौ मेळावा झाला, सासरचे घरही सुटले. घर सोडल्यानंतरची मनेकाची भूमिकाही सौम्य व समजूतदारपणाची आहे. तिला थोडी-फार सहानुभूती जरूर मिळेल; परंतु इंदिराजीच्या विरोधात टिकून राहण्याची ताकद तिच्यामध्ये नाही; ती तिला प्राप्त होईल असेही वाटत नाही. पण जवळजवळ सक्तीने घरात बसवून आपला पाला-पाचोळा करण्यात येत आहे, अशी भावना तिच्या मनात रुजली गेली होती. लखनौ मेळाव्यामधील तिची उपस्थिती हा भावनात्मक उद्रेक होता. आता ती म्हणे, पजाबमध्ये वगैरे मेळावे घेणार आहे. तसे ती घेईलही आणि दिवस जसे सरतील तसतशी ती इंदिराजीबाबत जास्त तिखट होत जाईल, तिच्या वर्तनामध्ये विचार व विवेकापेक्षा चीड असेल. भल्या-भल्यांना माती चारणाऱ्या इंदिराजीना मनेकाची फिकीर करण्याचे कारण नसले तरी तिला उपद्रवमूल्य जरूर आहे. राजकीय लढतीमध्ये ती टिकू शकली नाही तरी स्वकुटुंबामधील एखादी व्यक्ती प्रखर विरोधात उभी ठाकली तर भरपूर मनस्ताप होतो. विजया लक्ष्मी पंडित यांच्या बाबतीत इंदिराजीनी हे अनुभवले. आता आत्याच्याऐवजी सून ते काम बजावण्यास सिद्ध झाली आहे. फरक असेल तर तो इतकाच की, विजयाबाई काही विचारांचा पुरस्कार करीत होत्या. मनेका मात्र अंधारातच चाचपडत आहे.

## ☐ उभी हयात गजाआड !

अपराध केला, तो सिद्ध झाला आणि कायद्याप्रमाणे शासन होऊन उभी हयात गजाआड घालवावी लागली, तर त्याबाबत तक्रार करण्यास वाव नाही; पण न्यायालयासमोर उभेही न करता कोणताही गुन्हा केला नसताना उभी हयात जर एखाद्याला तुरुंगात घालवावी लागली असेल तर लोकशाहीचा आणि न्यायालयांच्या निःपक्षपातीपणाचा गौरव कशासाठी करायचा ? ज्याच्या वाट्याला हे भोग आले त्याला न्याय कसा मिळणार ? आणि तो कोण मिळवून देणार ? यासारखे प्रश्न उपस्थित व्हावेत आणि कोणीही संवेदनाक्षम माणूस हतबळ तरी व्हावा किंवा विलक्षण संतप्त तरी व्हावा असा एक विलक्षण प्रकार बिहारमध्ये घडला आहे. कोणताही गुन्हा केला नसताना आणि कोणत्याही न्यायालयाने शिक्षा फर्मावली नसताना ज्याला आपल्या उमेदीची पंचवीस–तीस वर्षे बिहारमधील विविध तुरुंगामध्ये खितपत काढावी लागली त्या दुर्दैवी इसमाचे नाव आहे रामचंद्र बिहारी ! हा रामचंद्र इतकी वर्षे तुरुंगात असूनही तो नेमका कशा-साठी तुरुंगामध्ये आहे, हे पाहण्याची इच्छा काही कोणाला झाली नाही. वयाच्या साठाव्या वर्षापर्यंत वाट पाहिल्यावर अखेरीस हा योग जुळून आला. रामचंद्र हा किशनगंज येथील तुरुंगात असताना, अगदी अलीकडे म्हणजे, मार्चच्या तिसऱ्या सप्ताहामध्ये त्या तुरुंगाचे तुरुंगाधिकारी श्री. एच. सी. ठाकूर यांनी दीर्घकाळ तुरुंगात खितपत पडलेल्या कैद्याचे कागदपत्र पहाण्याचे ठरवले. ते पहात असतानाच हा रामचंद्र बिहारी पंचवीस वर्षांहून जास्त काळ तुरुंगात असल्याचे दिसून आले. त्याच्यावर कोणताही खटला भरला नव्हता. त्याला पंचवीस वर्षांपूर्वी जेव्हा पकडण्यात आले तेव्हा त्याच्यावर भारतीय दंडविधानाचे ३०७ कलम लादण्यात आले होते. या कलमाखाली खुनाचा प्रयत्न केल्याचा आरोप ठेवता येतो; परंतु तसा आरोप असलेले आरोपपत्र कोणत्याही न्यायालयात दाखल करण्यात आले नव्हते. सर्व कागदपत्र पाहिल्यावर या माणसाला सारी हयात उगा-चच तुरुंगात डांबून ठेवण्यात आले आहे अशी श्री. ठाकूर यांची खात्री झाली. त्याला सोडण्याची अनुज्ञा मिळावी यासाठी त्यांनी आपल्या वरिष्ठांकडे भरपूर प्रयत्न केले; परंतु सरकारी कामकाजामधील उदासीनता त्यांच्या वाट्याला आली. रामचंद्रची अवस्था पाहून ठाकूर हवालदिल झाले ! आपल्यापरीने काही करता आले तर पहावे म्हणून त्यानी आपल्या परिचयाचे दोन वकील नरेंद्रसिंग व रंजन संन्याल यांच्या कानी हे सारे प्रकरण घातले. रामचंद्रच्या सुदैवाने या दोन वकिलांनी या प्रकरणी लक्ष घातले. हे सारे प्रकरण न्याया-लयासमोर नेले. व्यक्तिगत जामिनावर रामचंद्रची सुटका झाली; परंतु केवळ त्याची सुटका करून संन्याल– सिंग जोडी स्वस्थ बसली नाही. कोणतेही कारण नसताना, कोणत्याही न्यायालयाने कोणत्याही गुन्ह्या-बद्दल कसलीही शिक्षा दिली नसताना या रामचंद्रला सारी हयात गजाआड काढावी लागली याला जबाबदार कोण ? त्याच्या जीव-नाची जी वाताहत झाली ती काही दुरुस्त होऊ शकत नाही. तथापि या संदर्भात अंतिम जबाबदारी त्याला तुरुंगामध्ये दावणाऱ्या शासना-वर येते आणि त्याचे नुकसान भरून देता येण्यासारखे नसले तरी

त्याला शासनाने नुकसानभरपाई म्हणून एक लाख रुपये द्यावेत, असा दावा या वकिलांनी दाखल केला आहे. दरम्यान रामचंद्रची तुरुंगातून सुटका झाली असून रामचंद्र मोहनबहादूर नावाच्या सरकारच्या सेवेत असलेल्या एका वॉचमनकडे रहात आहे. या मोहन बहादूरशी त्याचे रक्ताचे नाते नसले तरी त्याला त्याने आपला मुलगा मानला आहे. रामचंद्रबरोबर झालेली काही महत्त्वाची प्रश्नोत्तरे खाली नोदवत आहे.

**प्रश्न :** तू तुरुंगात केव्हा व का आलास ?

**उत्तर :** सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी मी माझ्या दोन मेव्हण्या व एक परिचित बाई यांच्यासह काम शोधण्यासाठी पाटण्याला चाललो होतो रेल्वेप्रवासात आम्हाला काही रेल्वे-पोलीस भेटले. माझ्याबरोबर असलेल्या स्त्रियांची त्यांनी छेड काढली म्हणून मी विचारणा केली तर त्यांनी मारपीट करून मला पुढील स्टेशनवर उतरवून लावले. माझ्याबरोबर एक रेल्वेपोलीस होता. त्याने मला पोलिसाकडे सुपूर्त केले. पुढे माझी रवानगी तुरुंगात झाली. मला कोणत्याही न्यायासनासमोर उभे करण्यात आले नाही. मला का पकडले, हेही सांगण्यात आले नाही. माझ्याबरोबर ज्या स्त्रिया होत्या त्यांचे काय झाले ते माहित नाही.

**प्रश्न :** तुला जर लाख रुपयाची नुकसानभरपाई मिळाली तर काय करशील ?

**उत्तर :** मला रुपये नकोत. दोनदा रोटी पाहिजे. आता मला काम होत नाही. मी मोहन बहादूरवर अवलंबून आहे. तेव्हा समजा जर पैसे मिळाले तर ते मी त्याला देईन.

**प्रश्न** तुझ्याप्रमाणे अन्य कोणी तुरुंगात आहेत का ?

**उत्तर :** मला त्याची फारशी माहिती नाही; पण खुदी भट्टाचार्य म्हणून एक वेडसर गुन्हेगार आहे. गेली २७ वर्षे तो शिक्षा न होता तुरुंगात आहे. सकळ चमार नावाच्या हरिजनाला आपण ३४ वर्षे तुरुंगात का डांबले गेलो आहोत हे समजू शकलेले नाही.

**प्रश्न :** तुझ्या घरी जाणे तुला आवडेल ?

**उत्तर :** आवडण्याचा प्रश्नच कुठे येतो ? दोन वेळची रोटी मिळत नाही आणि त्यातून रेल्वेने जायचे म्हणजे काय होईल या भीतीने मी इतका धास्तावतो की जाणे नको वाटते. त्यातून जायचे यायचे भाडे मिळाले, व बरोबर कोणी विश्वासाचे असेल तर जाईन. धाकटा भाऊ आणि आई जर हयात असतील तर त्यांना भेटायला आवडेल. आई बहुधा नसेलच. भाऊ तरी आहे की नाही कुणास ठाऊक !

**प्रश्न :** तुरुंगातून सुटका झाली त्या वेळी काय मिळाले ?

**उत्तर :** दोन रुपयाची एक नोट, एक फाटका रग, पायजमा व गंजी !

**प्रश्न :** आता पुढे काय करणार ?

**उत्तर :** काय करणार ? काहीसा उदासपणे हसून रामचंद्र म्हणतो : 'जिवंत आहे तोपर्यंत जगत राहणार !'

## □ रणजी सामना नव्हे, धावांचा डोंगर !

**७०५** धावांचे प्रचंड ओझे उरावर घेऊन दिल्ली संघ ज्या वेळी मैदानात उतरला त्या वेळी कितीही चिवटपणे प्रयत्न केला तरी हा सामना दिल्ली संघ जिंकू शकेल, असे काही वाटले नव्हते, क्रिकेटवर जिंदगीभर लिहिणारांनाही या धावाचे दिल्ली संघावर पडलेले ओझे जाणवले होते. पण हे प्रचंड ओझे पेलून दिल्ली संघाने रणजी करंडक अक्षरशः खेचून नेला आहे. पाचव्या दिवशी १८१ धावा करणारा मोहिंदर केवळ चार धावांची भर घालून परतल्यावर परिस्थिती अशी होती की कर्नाटक सामना पुन्हा खेचून घेणार, असे वाटू लागले. मदनलाल बाद झाल्यावर तर ८ बाद ५८९ अशी धावसंख्या होती. म्हणजे विजय संपादन करण्यासाठी ११७ धावा हव्या होत्या. दिल्लीचे सारे मानाचे मानकरी आपआपली कामगिरी चोख बजावून परतले होते. फार तर पन्नास-पाऊणशे धावात दिल्लीचे शेपूट चेचले की रणजी करंडकाचे मानाचे मानकरी आपणच, असे जर कर्नाटक संघास वाटले असेल तर त्यात काही गैर नव्हते. परंतु दिल्लीचे शेपूट चांगलेच तेज निघाले. बघता बघता धावा फुगू लागल्या. शुक्ला व पीटर यांच्यावर दडपण नव्हते असे कसे म्हणता येईल ? आणखी एखादा गडी बाद झाला असता तर दिल्ली संघाभोवती फास आवळून विश्वनाथने दबाव आणून अखेरची विकेट खाल्ली असती. पण शुक्ला-पीटर जोडीने वाद दिली नाही. पीटर जबाबदारीने परंतु दडपण न घेता खेळत होता. त्याने उजव्या यष्टीबाहेरील चेंडूवर फटकावलेले काही चौकार प्रेक्षणीय होते. जोडीदाराचा दमदार खेळ पाहून शुक्लानेही जोरदार साथ दिली. या दोघानी नवव्या विकेटसाठी १२५ मिनिटात ११८ धावांची भागीदारी करून कर्नाटकच्या प्रचंड धावसंख्येमधील उरलेले अंतर तोडून काढले. राजेश पीटरने रणजित खानविलकरला चौकार ठोकून दिल्लीचा विजय नोंदल्यावर दिल्ली संघाचे खेळाडू मोहरून आले असतील तर नवल नाही. अशक्यप्राय वाटणारी गोष्ट त्यांनी शक्य करून दाखवली होती. रणजी करंडक सामन्यामध्ये चमत्कार म्हणून नोंदला जाईल अशा पद्धतीचा हा विजय मानावा लागेल ! पहिला डाव पूर्ण होण्यासाठी सहा दिवस घेणारा हा सामना विकेट दगडासारखी असली तरी दोन्ही संघाच्या फलंदाजांनी चांगला रंगवला. विश्वनाथसारखा फलंदाज अपयशी ठरला तरी बिन्नी-पटेल यांनी धावा जमवण्यात कसूर केली नाही. त्यांच्या श्रमाची आणि शतकांची माती झाली खरी; पण म्हणून काही ७०५ धावा उभारणाऱ्या या फलंदाजांच्या वैयक्तिक कामगिरीचे मोल कमी होत नाही. दिल्ली संघाच्या फलंदाजानी 'तेरी उप्पर मेरी' चा मामला चिकाटीने फलंदाजी करून सिद्ध करून दाखवला. फार पूर्वी म्हणजे १९४४–४५ मध्ये रणजी करंडक स्पर्धेचा अंतिम सामना मुंबई व होळकर संघामध्ये सहा दिवस खेळला गेला. अर्थात तेव्हा सामना पूर्ण झाला पाहिजे, असा नियम असल्याने सहाव्या दिवशी खेळ करावा लागला तर आता सामन्याचा पहिला डाव पूर्ण होण्यासाठी सहाव्या दिवशी खेळ चालू ठेवावा लागला. रणजी करंडक सामन्याच्या इतिहासामध्ये फलंदाजांनी असाधारण प्रभुत्व गाजवलेला सामना, म्हणून या सामन्याची नोंद होईल ! □

श्यामचा संसार (कथा एकोणतिसावी)

फिरोझ रानडे

# कसा मी दिसे मी?

श्याम लहानपणी कसा दिसत असे हे त्याला त्या वेळी तो फार लहान असल्यामुळे आता आठवत नाही. त्या वेळी आजच्यासारखे मुलांचे अहो येता-जाता, उठत-बसता फोटो काढण्याची पद्धत नव्हती. कधी कोणा प्रसंगी आई-वडील खुर्चीवर बसलेले व भाऊ-बहिणी आजूबाजूला उभी वा स्टुलावर बसलेली अशा नकाशाचे फोटो असत. लग्नप्रसंगी बायको खुर्चीवर बसलेली व नवरा मागे उभा अशी सात-आठ जोडपी व दर जोडपी गुणिले पाच किंवा सहा मुले पुढे जाजमावर बसलेली अशा तऱ्हेचे फोटो असत. अशा दोन्ही तऱ्हेच्या मौजूद असलेल्या फोटोत श्याम बाकी मुलांपेक्षा फार काही वेगळा दिसत नसे. त्या वेळची फोटो-कला आजच्याइतकी प्रगत झाली नव्हती, हे त्याचे मुख्य कारण होते. त्यामुळे श्याम लहानपणी कसा दिसत असे ह्याविषयी काही चांगला पुरावा उपलब्ध नाही.

मात्र त्याची आई तो मोठा झाल्यावर 'श्याम लहानपणी मोठा गोड व गोरापान दिसायचा,' असे म्हणायची. त्या माउलीचे चार बुके शिक्षण झाले होते. त्या चार बुकात व्याकरणाचे बुक होते की नाही माहीत नाही. त्यामुळे एखादे क्रियापद भूतकाळात वापरले की, ते 'होते' म्हणजे 'आता' नाही असा त्याचा अर्थ होतो, हे त्या बिचारीला कळत नसे. त्यातून ती पडली 'श्यामची आई!' तिला सगळीच मुले गोड व गोरीपान दिसत! देव का लहान छबकड्याना काळं व निगोड बनवेल? त्याला का लहान मुले आवडत नाहीत? असे तिचे प्रश्न व विचार, ह्यामुळेही तिला श्याम गोड व गोरापान वाटत असेल!

लग्न झाल्यावर श्यामच्या आईने राधाला 'श्याम लहानपणी अतिशय गोड व गोरापान दिसायचा,' असे म्हटल्यावर राधा त्या वेळचे लोक आचार्य अत्र्यांच्या विनोदाला जितक्या मोठ्याने व जितका वेळ हसत तेवढी हसली होती. अर्थात श्यामच्या आईने तिचे हसणे सवयीमुळे मनावर घेतले नव्हते; पण श्यामच्या मनाला मात्र ते फार लागले होते. 'निंदकाचे घर असावे शेजारी...' वगैरे तुकारामबुवा म्हणत; श्यामबुवा म्हणायचे, आम्ही तर निंदकाशी मुळी लग्नच केले आहे!

श्याम ज्या वेळी सात-आठ वर्षांचा होता त्या वेळी मास्टर विनायकांचे व मीनाक्षीबाईंचे नाव फार गाजत होते. त्यांचे 'ब्रह्मचारी', 'अर्धांगी', 'ब्रँडीची बाटली' वगैरे चित्रपट श्यामने वडिलधाऱ्या माणसांबरोबर पाहिले होते. का व कसे कोणास ठाऊक, पण आपण मास्टर विनायकांसारखे दिसतो, असे त्याच्या मनाने घेतले. आपण पण सिनेमात जावे व विनायकांसारखे सिनेमात काम करून नाव व वाहावा मिळवावी, असे त्याच्या मनात यायचे. मास्टर विनायक होण्यात नावाबरोबर व वाहावेबरोबर आणखीही काही मिळते, याची त्याला तो तेव्हा अज्ञान वयाचा असल्यामुळे कल्पना नव्हती.

सिनेमात जाणे ताबडतोब जमले नाही व नाव मिळवणे जमले नाही तरी पण विनायकांच्या नावाप्रमाणे नाव लिहिण्याचे जमणे अवघड नाही, असे त्याच्या मनाने घेऊन, तो आपले नाव 'मास्टर श्याम' असे लिहू लागला. अर्थात असे लिहिणे पुस्तकांवर व वह्यांवर लिहिण्याइतपतच मर्यादित होते.

आता माणूस आहे, त्याच्या हातून चुका होणारच; किंबहुना माणूस, माणूस असतो म्हणूनच त्याच्या हातून चुका होतात. श्याम एक तर माणूस व त्यातून लहान असलेला माणूस! त्याने नेमके गणिताच्या वहीवर 'मास्टर' ऐवजी 'माटर' लिहिले. श्यामचे अंकगणिताचे मास्तर बाकीचे अंकगणिताचे मास्तर असतात तसलेच होते. श्यामने नावापुढे 'माटर' लिहिण्यात हातचे काय धरले आहे हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी श्यामला सगळ्या वर्गात उभा करून त्याची अशी काही बजाबाकी केली की श्याम शिल्लक म्हणून राहिलाच नव्हता! एवढे करून ह्या सगळ्या गणिताचे 'विनायकांसारखे दिसणे व असणे ह्यात फार फरक आहे. नाव लिहिणे वेगळे व नाव कमाविणे वेगळे.' हे आणखी वर उत्तरही काढून दिले. त्यानंतर त्याला कोणी मास्टर श्याम म्हटले की, ज्या यमुनेत मीनाक्षीबाईंनी 'यमुना जळि खेळू' खेळले होते त्या यमुनेत जीव द्यावा असे वाटत असे. अशा तऱ्हेने श्यामची हायस्कुलातली वर्षे यमुनेच्या काठी गेली होती.

यथोचित वेळी श्याम मॅट्रिक झाला व कॉलेजमध्ये गेला. कॉलेजजीवनाचे एक बरे असते. ते म्हणजे एक-दोन अतिशय सुंदर मुलींचे अतिशय कौतुक होते व ते त्या मनमोकळेपणाने करून घेतात. बाकी मुलांना कोणी पुसत नाहीत वा बाकीच्या मुलींना कोणी धूप घालत नाही व घातला तरी धूप फार चांगल्या ब्रँडचा नसल्यामुळे त्याचा काही विशेष घमघमाट सुटत नाही.

श्याम उच्च शिक्षणाकरता म्हणजे मॅट्रिकनंतरच्या शिक्षणाकरता मुंबईला आपल्या मोठ्या बहिणीकडे रहात असे. त्याच्या भाच्या अशाच दहा ते बारा वर्षे वयाच्या होत्या. त्या वेळी सुरैय्याच्या बळावर देवआनंद व स्वतःच्या कर्तृत्वावर दिलीपकुमार व राजकपूर मोठ्या प्रमाणात कौतुकास पात्र होत होते. त्यांना, आपला मामा अगदी राजकपूर जरी नाही. तरी थोडासा दिलीपकुमार व थोडासा देवआनंदसारखा वाटत असे. भाबड्याच त्या. एखादा माणूस एकाच वेळी देवआनंदसारखा दिसतो व दिलीपकुमारसारखा दिसतो म्हणजे खरोखरीचा कसा दिसत असेल ह्याची कल्पना, कल्पनाशक्ती अगदी कमी असणाऱ्यांनाही येऊ शकेल.

कॉलेजात असतानाचा श्यामच्या दिसण्याबाबत निगडित असलेला एक प्रसंग नमूद करण्यासारखा आहे. श्यामचा कोणी प्रभावळकर नावाचा मित्र गवालिया टँकच्या आसपास रहात असे. त्या प्रभावळकराचा भाऊ विलायतेहून म्हणजे इंग्लंडहून बॅरिस्टर का काय से होऊन आला होता. तो विलायत-

पॅलट भाऊ येऊन पाच–सहा दिवस झाले होते. काही तरी कारणाने श्याम त्या प्रभावळकराच्या घरी गेला होता. खरं म्हणजे ओळख वगैरे करून देण्याचे प्रकार आपल्या संस्कृतीत नाहीत; पण तो बॅरिस्टर नुकताच विलायतेहून आला असल्याकारणाने विलायती रिवाज पाळावयाची आपली जबाबदारी आहे, असे प्रभावळकरमंडळीना वाटत असे.

तदनुसार धाकटया प्रभावळकरने मोठया प्रभावळकरची श्यामशी ओळख करून दिली. मोठयाने श्यामचा हात धरून हालवताहलवता म्हणाला, ' You look so much like sabu. I wonder what sabu will feel when he knows about this. त्याला उत्तर म्हणून श्याम कसनुसे हसला होता. येथे साबू म्हणजे सर्व सिनेतारकाचा अत्यंत आवडता लक्स वा काटकसरीचा आहे म्हणून मध्यमवर्गात अत्यंत आवडता असलेला हमाम हे साबू नसून त्या वेळी अमेरिकेच्या चित्रपटसृष्टीत Elephant-Boy म्हणून नाव कमावलेला सुप्रसिद्ध हिंदी वा आशियाई नट साबू होता ! पुढे हा साबू कोणी वापरून संपवला कोणास ठाऊक !

जीवनाच्या दोन मोठया महत्त्वाच्या दालनात प्रवेश करताना माणूस कसा दिसतो ह्याची बिलकूल पर्वा केली जात नाही, हे श्यामच्या अनुभवावरून लक्षात आले. त्यातले पहिले दालन म्हणजे नोकरी–व्यवसायाचे होय. मध्यवर्ती सरकारच्या ' पाहिजेत 'च्या जाहिराती वर्तमानपत्रातून दर शनिवारी येतात. तशा एका घातवारी आलेली जाहिरात बघून श्यामने अर्ज केला. त्याला बोलावणे आले व तो दिल्लीला गेला. मुलाखत होण्याआधी त्या सर्व उमेदवाराना एका कक्षात थांबायला सांगितले होते. त्या कक्षात श्यामसारखी दहा–बारा तरुण मंडळी होती. कोणी दिल्लीच्या उकाडयातही वेगवेगळया रंगांचे सुटस् घातले होते. कोणी खादीचे पांढरेशुभ्र बुश–कोट व पॅन्ट घातलले होते. मुलाखत घेणारे मोठे अनुभवी व मोठया हुद्द्यावरचे अधिकारी होते. त्यामुळे ह्या बगळया व मोरांसमोर आपला काय निभाव लागणार, असा विचार श्यामच्या मनाला चाटून गेला. त्या मनाने व धडधडत्या अंत:करणाने तो मुलाखत–कक्षात गेला. तो खोलीत गेल्यावर व त्या सर्व मुलाखत घेणाऱ्या सभासदांकडे बघून श्यामला प्रखरतेने काही जाणवले असेल तर हे की, नोकरीत दिसण्याला काही महत्त्व नसते. श्यामला ती नोकरी मिळाली, हे वेगळे सांगणे नकोच !

जेथे पुरुषाचे दिसणे कमी महत्त्वाचे वा न महत्त्वाचे असते असे दुसरे दालन म्हणजे संसाराचे होय. मुलगी कशी पाहिजे ह्या चर्चेच्या वेळी मुलगी सुदर पाहिजे, निदान स्मार्ट पाहिजे असे कोणी म्हणतसुद्धा नाही. फारच फार झाले तर फार काळा नको, तरुण वयात टक्कल पडलेला नको, अशी अपेक्षा असते. मुलीकडल्यांची एवढीच माफक अपेक्षा असल्यामुळे श्यामसारख्या मुलांचे फावत असे. तशा फावण्यामुळेच श्यामच्या लग्नाचे पण फावले होते.

श्याम नोकरीकरता दिल्लीला आला व काही वर्षे राहिला. मराठी समाज लहान; त्यात विनोदी लोक असून असून किती असणार ? त्यातल्या त्यात श्याम हजरजबाबी व जुजबी विनोद करणारा. त्या वेळी पुलंचे विलायतीच्या सफरीवरचे व इतर लेख व पुस्तके साऱ्या महाराष्ट्रातच नव्हे तर दिल्लीपर्यंत दुमदुमत होते ! श्याममध्ये थोडा पुलपणा आहे हे पाहून त्याची मित्र–मंडळी त्याला मिनी पुल किंवा लोकल पुल म्हणू लागले होते. एकदा मुंबईहून आलेल्या एका चाणाक्ष पाहुण्याने त्याला ' तुमचे विनोदच पुलंसारखे असतात असे नव्हे, तर तुम्ही दिसता पण पुष्कळसे पुलंसारखे ! ' असे म्हणून श्यामची प्रशंसा केली होती.

मग एका सुट्टीत मुंबईला आल्यावर श्यामने राधाबरोबर पुलंची अत्यंत गाजलेली 'वाऱ्यावरची वरात' अत्यन्त थंडपणे पाहिली. आधीच ते गृह वातानुकुल म्हणून थंडपणा व आपण थोडे पुलंसारखे दिसतो ह्याचा मोठा अभिमान वाटण्यासारखे काही नाही,हे लक्षात आल्यामुळे आलेला थंडपणा, असे दोन थंडपणे एकत्र झाले होते.

श्यामची कलकत्त्याला बदली होऊन सात-आठ दिवसच झाले होते. एक दिवस तो कचेरीचा जिना चढता चढता त्याची त्याच्याच कचेरीतल्या पण दुसऱ्या विभागाच्या एका मोठया पंजाबी अधिकाऱ्याची भेट झाली. त्याची व श्यामची पूर्वी दिल्लीला एक-दोनदा मुलाखत झाली होती. श्यामला पहाताच त्याने चेहऱ्यावर मोठा पंजाबी आनंद आणून श्यामचा हात हलवत विचारले, ' काय कधी आलात ? श्यामने अर्थातच, सात-आठ दिवस झाले, म्हणून सांगितले. दिल्लीला फक्त दोन चारदाच मुलाखती होऊन ह्या एवढया मोठया माणसाने आपल्याला लक्षात ठेवले, आपल्याशी बोलण्याचे अगत्य दाखवले, ह्या त्याच्या पंजाबी वृत्तीचे श्यामला खूप कौतुक वाटले. त्या पंजाबी वृत्तीची मराठी वृत्तीशी तुलना करण्यात तो चुकला नाही.

परत काही दिवसांनी तो अगत्यशील पंजाबी श्यामला परत जिन्यावरच भेटला. आता तो पंजाबी चेहरा आनंदरसाबरोबर आश्चर्यरसाने पण ओथंबला होता. तो श्यामचा हात हलवत म्हणाला, ' काय अजुन येथेच ?' श्याम म्हणाला, ' म्हणजे काय ?मी श्याम फलाणे नाही का ? आपल्याच खात्यात क विभागात दुय्यम–सहकारी म्हणून ? येथे बदलून आलो आहे.' श्याम आपल्या खात्यातला कनिष्ठ अधिकारी आहे, हे बघून त्या पंजाब्याने श्यामचा हात सोडला व गंभीर होत श्यामला म्हणाला, ' असं होय ? मी समजत होतो, तू तो प्रसिद्ध टेनिसपटू सुलतान अहमद आहेस म्हणून. तू इतका त्याच्या सारखा दिसतोस म्हणून सांगू! ' श्याम ' काही सागू नका' असे मनाशी म्हणाला व जिना चढू लागला.

कलकत्त्याला काही वर्षं राहून श्याम व राधा इंफाळ-मणिपूरला गेले. तेथे त्यांना छोटासा बंगला मिळाला होता. बंगल्याच्या मागील बाजूस खूप मोकळी जागा व त्यात एका टोकाला पाण्याचा नळ होता. हिंदुस्थानात सर्वत्र असतो तसा मणिपूर येथे पण पाण्याचा खूप तुटवडा होता. श्याम सरकारी अधिकारी असल्याकारणाने त्याला स्वतंत्र नळ दिला गेला होता. दिवसातून सकाळ व संध्याकाळ असे पाणी यावयाचे. राधा मृदू स्वभावाची असल्यामुळे ती मणिपुरी बायकांना व मुलीना पाणी भरू द्यावयाची. मणिपुरी मुली दिसायला अटकर बांध्याच्या गोऱ्यापान म्हणजे सुरेखच असत. श्याम खिडकीतून बघत त्याचे कौतुक करत असे व एखाद दिवस घरगडी आला नाही तर नळावरून पाणी आणून राधाला घरकामात मदत करत असे.

मणिपुरी लोकांना हिंदी येत नसले तरी हिंदी सिनेमा बघण्याची फार मोठी प्रथा

तेथे पद्धत चालली होती. हिंदी नट-नट्या फार लोकप्रिय होत्या. त्या वेळी हिंदी सिने-गगनात राजेन्द्रकुमार, ज्याला ज्यूबिली कुमार पण म्हणत, हा तारा मोठ्या तेजाने चमकत होता. श्याम पाणी भरायला गेला की, त्या मणिपुरी मुली आपसात राजेंद्रकुमार; राजेंद्र-कुमार असे पुटपुटत.

एका दृष्टीने श्यामला त्या पुटपुटण्याचा अभिमान वाटला तरी हिंदुस्थानातला एक भाग मागासलेला म्हणजे इतका मागासलेला आहे, ह्याचा दुसऱ्या दृष्टीने त्याला खूप वाईटही वाटत असे.

असाच एकदा तो सुट्टीत मुबईला आला असता कोणा नातेवाईकाच्या लग्नाला गेला. महाराष्ट्राबाहेर जाऊन आता त्याला चांगली १५-१६ वर्षं झाली होती. तिथे कित्येक नातेवाईक आले होते की, ज्याची व श्यामची १०-१२ वर्षांत भेट गाठ झाली नव्हती. तेथे अशी काही तरूण मंडळी होती की, श्यामने त्यांना १०-१२ वर्षांचा असताना पाहिले होते. आता त्यांच्याबरोबर त्यांच्या बायका असून, लग्नाला यावयाचे म्हणून मुद्दाम बूट-मोजे घातलेली अवघड व अमराठी नावे असलेली मुले पण होती.

श्यामने कोणालाही जाऊन नमस्कार वगैरे करताच 'अय्या, श्याम का? किती बदललास? अगदी ओळखू येत नाही, बाई', किंवा 'काय म्हणता श्यामराव?' अरे, अगदी जमीन-अस्मानाचा फरक पडला आहे बुवा तुमच्यात!', असे उद्गार निघत, ते ऐकून श्यामला आपण पूर्वी जमीन होतो व आता अस्मान आहोत की पूर्वी अस्मान होतो व आता जमीन आहोत, असा प्रश्न पडे.

असे होता होता श्यामचे एक वयस्क काका श्यामला दोन-अडीच वर्षांच्या एका मुलीला संभाळत असलेल्या एका पंचवीस सव्वीस वर्षांच्या स्मार्ट तरुणाकडे घेऊन गेले व त्याला विचारू लागले, 'प्रकाश, ह्याला ओळखलेस काय?' प्रकाश स्मार्टच. तो स्मार्ट-पणे म्हणाला, 'हो, हो? श्यामकाका ना?' ह्या उत्तराने त्या वयस्क काकांचा चेहरा पडला. त्यांची कल्पना अशी की, प्रकाशने श्यामला गेल्या दहा-बारा वर्षांत पाहिला नाही. त्यामुळे तो त्याला ओळखणार नाही. मग आपण श्याम कोण ते सांगू व ह्या प्रकरणात अशी मजा येईल, अशी त्यांची अपेक्षा. त्या अपेक्षाभंगातच त्याने प्रकाशला विचारले, 'अरे, पण तू इतक्या झटक्यात ओळखलेस कसे?' प्रकाश म्हणाला, 'त्यात काय अवघड आहे? मी लहानपणापासून मनाशी धरुन चाललो होतो की, श्यामकाका अगदी किशोरकुमारसारखा दिसतो म्हणून.' श्यामला आता मात्र किशोरकुमारसारखे किंचाळावेसे वाटू लागले.

श्यामला सरकारने मस्कत-ओमानला पाठवेपर्यंत श्याममध्ये दिसण्याच्या दृष्टीने खूपच फरक पडला होता. माया नावाच्या कोणा नवविचाराच्या मैत्रिणीमुळे सगळे (Creative artist) दाढी वाढवतात ह्याची राधाला कल्पना आली होती. राधाने श्यामच्या मागे लागून त्याला दाढी ठेवायला भाग पाडले होते. प्रत्येक माणूस हा एका अर्थी creative artist असतो हे श्यामचे विचार असल्यामुळे श्यामनेही दाढी ठेवण्यास खळ-खळ केली नाही. थोडक्यात म्हणजे, श्याम मस्कतला गेला त्या वेळी त्याला दाढी होती.

मस्कतला गेल्यावर त्याने एक गंमत पाहिली. तेथे त्याला पाकिस्तानी पाक समजत, इराकी इराकी समजत, सूदानचे सुदानी समजत. एवढेच नव्हे तर हिंदी लोक एक पाऊल पुढे जाऊन, पंजाबी त्याला पंजाबी समजत, बिहारचे बिहारी समजत, मल्याळी मल्याळी समजत एवढेच नव्हे, तर सरदारजी लोक त्याला दाढी कातरलेला सरदारजी समजत.

एवढेच नव्हे, तर सर्व मुसलमानबंधू त्याला हाझी वा काझी म्हणत. हा काझी म्हणजे 'मिया बिवी राजी, तो क्या करेगा काझी' मधला काझी म्हणजे न्यायाधीश. हाजी म्हणजे जो हाजची यात्रा करून आला आहे असा धार्मिक वृत्तीचा माणूस. त्यामुळे सर्व-साधारणपणे जे अत्यन्त उर्मटपणे वागतात ते चपरासी बांधव व टॅक्सीवालेही श्यामशी मोठ्या आदराने वागत.

श्यामने राधाला लिहिलेल्या एका पत्रात ही हाजी व काझीची मजा लिहीली होती. खरे म्हणजे बायकोला लिहिलेल्या पत्रात आणखी किती तरी चागले विषय येऊ शक-तात. पण आता मुले मोठी झाली होती. दुसऱ्याची पत्रं वाचू नयेत ही विलायती पद्धत असल्यामुळे ती भारतीयांनी पाळावयाची गरज नाही, अशी त्याची कल्पना व त्या कल्पनेला अनुसरून श्यामची राधाला आलेली पत्रे ते सर्रास वाचत असत, हे श्यामला माहीत होते. त्यामुळे आताची पत्रे अशा मजकूरांनी भरा-वयाची वेळ आली होती. म. टा. मध्ये नाही का, ग्वालेरच्या वा बडोद्याच्या मराठी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या बातम्या, तेथे झालेली नाटके, त्यात काम करणाऱ्यांची नावे वा तेथल्या मंडळाच्या वेगवेगळ्या पदांवर कोण निवडून आले आहेत ह्याची यादी येत? आता ग्वालेरचे वा बडोद्याचे पदाधिकारी सोडून हे कोण वाचत असेल बरे? पण वर्तमानपत्र भरगच्च व्हायला मदत होते, तद्वतच श्यामचे हे हाजी व काझी-प्रकरण.

राधाला श्याम लहानपणी गोड व गोरा होता, हे माहीत होते. मोठेपणी तो दिकु, देवा, साबु, पुल, राकु, किकुसारखा दिसत असे, हेही तिला माहीत होते. आता त्यात काझी-व हाजीची भर पडली. राधाने उत्तराच्या पत्रात लिहिले, 'एवढे सगळ्यांसारखे दिसण्या-ऐवजी थोडे जरी आपल्या महात्मा गांधी-सारखे दिसला असतात तर त्या साहेबाने तुम्हाला गांधीचे काम नसते का दिले, 'गांधी सिनेमात?' ☐

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

# एक होता कार्व्हर

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

मूल्य : रुपये पंधरा

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

# अल्ट्रा–मॉडर्न बुवाबाजी....
# ....दुनिया झुकती है....!

डॉ. शरद अभ्यंकर, वाई

परीकथा कुणाला आवडत नाहीत ? लहानांनाच काय, पण मोठ्यांनाही त्या अंतर्मनातून आवडतातच. अतिशय सोज्ज्वळ, सुस्वभावी असा नायक वा नायिका, त्याचा उगाचच द्वेष करणारी खाष्ट चेटकी राक्षसी, सावत्र आई, मग एकापाठोपाठ एक संकटे, कोण्या परीने वा शंकर-पार्वतीने दिलेला जादूचा मंत्र आणि त्याच्या आधारावर सर्व संकटांशी मुकाबला करून चित्तथरारक विजय मिळवून शेवट गोडच गोड ! अशा कथेत प्रौढ लोकही मनापासून रस घेत असतात, नव्हे प्रत्यक्ष त्यात सहभागी होत असतात, हे तुम्हाला खरे वाटणार नाही. यात नायक अथवा नायिकेची भूमिका स्वतःकडे असते, दुष्ट खलनायक हा सदैव सासू, परीक्षक बॉस, धंद्यातला स्पर्धक भांडकुदळ शेजारी, घरमालक, आयकरवाला, सरकार, गल्लीतला गुंड, राखीव जागावाला असा कोणी ना कोणी असतोच. कमी जास्त संकटे आपल्या मजदुरानुसार आपल्यावर कोसळतच असतात – कमतरता असते ती फक्त कोण्या परीने दिलेल्या जादूच्या मंत्राची–ज्या मंत्राच्या आधारावर आपल्याला शत्रूच रहाणार नाहीत संकटे येणार नाहीत, किंवा त्याहीपेक्षा आकर्षक म्हणजे आलेल्या महान संकटातून आपण धीरोदात्तपणे पार पडून आणखी उजळून निघू अशा मंत्राची ! असा मंत्रबित्र काही नसतोच. आपले प्रयत्न, अक्कलहुषारी, चिकाटी, मनाचा समतोल या गोष्टी संकटांशी सामना करायला खऱ्या उपयोगी असतात, असे परिपक्व विचाराचे लोक ओळखून असतात. पण परीकथात जे अजूनही रमतात ते मग अशा मंत्राच्या शोधात गुरु, ज्योतिषी, ग्रहपीडा शमन करणारे, बुवा आणि बुविणी यांच्या मागे धावतात. वेळ, पैसा आणि बुद्धी गमावून बसतात.

जादूच्या मंत्राची हाव, हा मनुष्यस्वभावच असल्यामुळे हे प्रकार भारतापुरतेच मर्यादित नसून सर्व जगात आढळतात. मात्र परदेशात अगदीच बुवा किंवा ग्रहशांतिवाल्यांची चलती होणे अवघड असते. त्यामुळे या मंत्र पुरवणाऱ्यानी याहीपेक्षा जास्त परिणामकारक आणि फायदेशीर युक्ती योजली आहे. ती म्हणजे, अशा मंत्रांची पुस्तक लिहिण्याची ! पुस्तकाला तिथे गिऱ्हाईक प्रचंड, शिवाय पुस्तक वाचणे म्हणजे काही अंधश्रद्धा वा बुवाबाजीचा प्रकार नव्हे. त्यामुळे अशा प्रकारच्या मंत्राच्या शोधात असणाऱ्या, कमकुवत मनाच्या, कुठे तरी आसरा वा दिलासा शोधणाऱ्या लक्षावधी वाचकांच्या अशा पुस्तकावर उड्या पडतात. self Improvement Books या नावाखाली असे 'मंत्र' देणारी शेकड्यावारी पुस्तके अमेरिकेत गेल्या काही वर्षांत प्रसिद्ध होत आहेत, आणि खपतही आहेत !

आत्मोन्नती (म्हणजे आत्म्याची उन्नती नव्हे तर स्वतःची प्रगती) कशी घडवून आणावी हे सांगणारे पहिले पुस्तक self Help हे म्हणता येईल, बारीक टाईप, जुन्या वळणाची क्लिष्ट भाषा, निरनिराळ्या यशस्वी पुरुषांची चरित्रे, आणि चिकाटी, दीर्घोद्योग, सचोटी अभ्यास, प्रयत्न, इत्यादी यशाकरता आवश्यक गुणांची भलावणच भलावण, असे या पुस्तकाचे स्वरूप होते. आज-काल मला नाही वाटत, कोणीही हा ग्रंथ अथपासून इतिपर्यंत न कंटाळता वाचू शकेल! आज-काल लोकांना हवी असते झटपट किमया; गप्पा मारल्यासारखी भाषा, गंमतीशीर उदाहरणे, विनोद, आकृत्या, कोष्टके असा हलकाफुलका मालमसाला. अशा स्वरूपाचे पहिले पुस्तक म्हणता येईल डेल कार्नेजीचे How to win friends and Imfluence People हे पुस्तक अल्पावधीतच संबंध जगभर कमालीचे लोकप्रिय झाले. त्या पाठोपाठ डेल कार्नेजीचेच How to stop worrying and start Living हेही यशस्वी ठरले आणि मग अशा 'उद्धारकर्त्या' पुस्तकांची लाटच उसळली !

यातल्या एखाददुसऱ्या पुस्तकाचा अपवाद वगळला तर मला नाही वाटत, ही पुस्तके वाचून खुद्द लेखक, प्रकाशक आणि पुस्तकांचा दुकानदार याव्यतिरिक्त कोणाचा फारसा फायदा झाला असेल ! पण एवढे असूनही अशी नवनवीन पुस्तके दरवर्षी निघत असतात आणि खपत असतात. कारण असे लेखन करण्याचे आणि अत्यंत आकर्षक जाहिरात करून ते खपवण्याचे एक तंत्रच आता विकसित झाले आहे. काही उदाहरणेच पहा ना.

अमेरिकेत उपयुक्त वस्तूचे उत्पादन (consumer products) प्रचंड प्रमाणावर होते. उत्पादनवाढ म्हणजे प्रगती, समृद्धी असे समीकरण तिथे सर्वमान्य आहे. त्यामुळे प्रत्यंक उद्योजक, कारखानदार आपले उत्पादन वाढवण्याच्या मागे असतो. आता हे सर्व उत्पादन खपवायला तर पाहिजे ! त्याकरता सुरू होते High pressure salesmanship. यात टी. व्ही., वृत्तपत्रे, रेडिओ यातील जाहिराती पुऱ्या पडत नाहीत म्हणून घरोघर जाऊन विक्री करणारे विक्रेते नेमुले जातात. असे लक्षावधी विक्रेते आपल्या मालाची विक्री कशी वाढवावी या चिंतेत रात्रंदिवस जिवाचे रान करून धडपडत असतात. हा मोठा गट डोळ्यापुढे ठेवून लिहिलेली शेकडो पुस्तके अमेरिकेत पहायला मिळतात !

### वावटळी विक्रेते

वानगीदाखल हे पहा 'secrets of Hard sell' तुमच्या विक्रीच्या प्रयत्नाना होणाऱ्या सर्व विरोधाला सुरुंगासारखे उडवून लावणारे ... विक्रीच्या जोरदार आणि आक्रमक विचारसरणीचे बायबल...बड्या धनवानांच्या यादीत तुमचे नाव निश्चित करणारे इत्यादी इत्यादी किंवा या घ्या '12 psychie sellıng strategies that multiply your income नुसते नेम लागेल वा न लागेल असे ऑर्डरी घेणारे काय राहिला आहात ? या युक्त्या अभ्यासा आणि तात्काळ आपले उत्पन्न दुप्पट, तिप्पट, फार काय चौपटदेखील सहज वाढवा.' आणखी एक पुस्तक आहे. Take checqe and sell कुठल्याही विक्रेत्याला उपयुक्त–अत्यंत यशस्वी असे ताबा घेणारे व्यक्तिमत्व जोपासा...दणकेबाज विक्रेता आणि साधासुधा विक्रेता

यांच्यातील सूक्ष्म फरकांचा काळजीपूर्वक अभ्यास करून शोधलेली पद्धती...खरेदीदारावर ताबा मिळवण्याची गुरुकिल्ली...कुणालाही सहजसाध्य...तात्काळ विक्रीत वाढ...सिद्ध झालेली तंत्रे...प्रत्यक्ष घडलेली उदाहरणे इत्यादी, इत्यादी आपल्या अतर्मनाची शक्ती सुप्त पण प्रचंड असते, हे सर्वांना माहीत असते. त्यामुळे आणखी एक लेखक घेऊन आले आहेत 'Selling power' तुमच्या अंतर्मनातली सुप्त 'विक्रीशक्ती' जागृत करून त्याचा प्रचंड धबधबा निर्माण करण्याची हे खात्री देतात. लेखकाने स्वतः याचा फायदा घेतला आहे. अनेकांना प्रत्यक्ष शिकवून तयार केले आहे, आता इतर गरजूंच्यासाठी मोठ्या मनाने ही रहस्ये पुस्तकरूपाने उघड केली आहेत.

बरेच लोक अशा वावटळी विक्रेत्याला जोरदार प्रचाराला बळी पडत असले तरी पुष्कळांना यात आपल्यावर सक्ती होत आहे,आपण 'ट्रॅप' केले जात आहोत, असे नंतर तरी वाटत रहाते. त्यामुळे कोणाही विक्रेत्याला दारातही उभे न करू देण्याचा निश्चय अनेकांना करावा लागतो. सुपरसेल्समनशिपचे हे बूमरँग असे उलटू लागल्यावर अनेक उत्पादकांनी असे विक्रेते नेमणे बंद केले. फार काय जाहिरातीतही 'कृपया आमच्या मालाची माहिती मागवा–तुमच्या घरी विक्रेता पाठवला जाणार नाही', असे उल्लेख येऊ लागले. त्याबरोबर लेखकांनीही आपले तंत्र बदलले. हे पुस्तक पहा–Hand book of sales Humour for All situations. यात विक्री वा प्रचार करतेवेळी वापरता येण्यासारखे विनोद, चुटके, हास्यकथा असा संग्रह आहे अगदी नाठाळ गिऱ्हाकालादेखील मवाळ बनवून सोडण्याची खात्री देणारे...!

हे झाले विक्रेत्यांना उपलब्ध असणारे काही मंत्र. आता सर्वसामान्यांकरता कोणकोणत्या किमया उपलब्ध आहेत ते पाहू आता मंत्र म्हटला की तो चमत्कार घडवून आणणारच. तेव्हा Miracle हा या लेखकाचा परवलीचा शब्द बनावाच लागतो. हे पहा काही चमत्कार – 'The Miracle power of Transcendal Meditation'. महाऋषी महेश योगी याच्यामुळे आपल्याला याची ओळख आहेच. या पुस्तकाचा लेखक चार सोप्या टप्प्यात समाधीअवस्थेपर्यंत कसे जावे, त्यातून प्राप्त होणाऱ्या उच्च मानसिक शक्तीचा उपयोग कसा करावा आणि त्यातून आरोग्य, सुख आणि समृद्धी कशी प्राप्त करावी, हे गॅरंटीपूर्वक शिकवतो.

दुसरे आहे Miracle People Power – यात संपूर्ण मानसशास्त्रीय नियंत्रणाची विश्वास न वाटण्यासारखी रहस्ये आहेत. ज्याच्यायोगे एखादी गोष्ट पटवून देण्याची तुमची शक्ती तुम्ही हजारपटीने वाढवू शकाल ! ... प्रत्येक माणसामध्ये असणारे बारा नियंत्रणबिंदू लेखक तुम्हाला टप्प्याटप्प्याने शिकवणार....एका क्षणात हे बिंदू कार्यान्वित करण्याची युक्ती सांगणार...आणि मग काय तुम्ही इच्छा कराल तसा दुसरा माणूस वाकणारच ! आहे की नाही परीकथेतला मंत्र ?

आणखी एक चमत्कार आहे miracle of universal psychic Power वैश्विक मानसशक्ती हा म्हणे या लेखकमहाशयांनी स्वतः लावलेला शोध आहे. या शोधाच्या आधारे तुमचे आयुष्य तात्काळ समृद्धी, प्रेम आणि सुख यांनी भरलेल्या सोन्याच्या खाणीत रूपांतरित करण्याची ग्वाही त्यानी दिली आहे. याचे नाव वैश्विकशक्ती असले तरी ती तुमच्या शरीरातच असते. ही सुप्त शक्ती कशी उपयोगात आणायची, त्यायोगे तात्काळ नवी आंतरिक शक्ती कशी वाढवायची आणि कधी स्वप्नातही वाटले नसेल अशा विलासी जीवनाची मौज कशी लुटायची–हे सर्व लेखक तुम्हाला सोप्या पायऱ्या-पायऱ्यानी शिकवण्याची खात्री देत आहे.

Power आणि Miracle याचे आकर्षक मिश्रण असणारी आणखी एक कलाकृती–'The Powcr of Miracle metaphysics.'– यातही तुमच्यातीलच सुप्त अशी तत्त्वमीमासक शक्ती 'प्रत्यक्ष-क्रिया' पद्धतीने कशी उपयोगात आणायची आणि त्यायोगे सपत्ती, इतरांचेवर नियंत्रण, पुनरुज्जीवित आरोग्य, प्रेम, सामाजिक यश, अतींद्रियशक्ती आणि इतर अनेक तुम्हाला नेहमीच हव्याशा वाटणाऱ्या गोष्टी कशा प्राप्त करायच्या याची रहस्ये शिकवली जाणार आहेत. (हे कसं आपल्याकडच्या स्तोत्राच्या शेवटी हे स्तोत्र पठण करणाराला आरोग्य, धनसंपदा, पुत्र, प्रपौत्र, गाई, शत्रूवर विजय इत्यादी गोष्टी मिळतील असे सांगणारा एक श्लोक असतो तसे वाटते की नाही ? Human nature is the same evrywhere ! )

## मनाची शक्ती

आणखी एका लेखकाने उगाच शोध-बोध लावायच्या भानगडीत न पडता जुनीपुराणी श्रद्धाच कशी चमत्कार घडवू शकते यावर एक ग्रंथ लिहिला आहे. 'Miracle Power of Beliving' हे त्याचे नाव. मानवाला ज्ञात असणारा सर्वांत बलवान शक्ती-स्रोत जो श्रद्धा, त्यावर आपण संशोधन केले असून या प्रचंड शक्तीला चालना देणारी 'किमयाकारी कृत्ये' कशी आचरावीत आणि मग नेहमीप्रमाणे–सुख, समाधान, समृद्धी, सुयश यांचा अखंड झरा कसा प्राप्त करून घ्यावा, याचे यात वर्णन आहे.

शरीराची शक्ती वरवर पहाताही दिसून येते आणि मोजताही येते. मनाच्या शक्तीचे तसे नाही. त्यामुळेच की काय ही शक्ती वाढवण्याचे खात्रीशीर मार्ग दाखवणारी अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. नुसती नावे वाचलीत तरी मन चक्रावून जाईल. 'Some Psychic Power–using its miracle forces for a fatulous new life', 'The secrts of Personal Psychic Power', 'Delta mind Dynamics', 'The Magic Power of Prama Psychics', 'ultra Psychavics', 'The Magic of Psychograms' अर्थात या प्रत्येक पुस्तकात तुमच्याच अंतर्मनात सुप्तावस्थेत असणाऱ्या प्रचंड शक्तीचा उपयोग करून घेऊन तुमच्या वाटेल त्या मनोकामना पूर्ण करण्याची अद्भुत रहस्ये अत्यंत सोप्या पद्धतीने खात्रीपूर्वक सांगितलेली असतात.

आता एवढे सगळे अद्भुत आणि सोपे मार्ग उपलब्ध असताना मानसशास्त्रज्ञ वा शिक्षणतज्ज्ञ वा इतर डॉक्टरमंडळींना या विषयाची अजिबात माहिती कशी नसते, असा कोणाला प्रश्न पडेल. म्हणूनच ही लेखकमंडळी आणखी एक युक्ती वापरतात. ती म्हणजे, आपल्या उपपत्तीला कुठले तरी शास्त्रीय परिभाषेत शोभेल असे नाव द्यायचे. म्हणजे सामान्यजनाना हे काही तरी शास्त्रीय सिद्धांतावर आधारित नवीन तत्त्वज्ञान आहे असे वाटते. 'Helping yourself with Psychic Symbology', 'People Empathy'

'Hypno cyberaneics', 'The new Talkamatics', 'miracle spiritology', 'Kinesics' ही या प्रकारची काही पुस्तके. आता तुम्हीसुद्धा नुसत्या नावांवरून यात काय रहस्ये दडलेली असतील आणि पायरी-पायरीने ती तुम्ही आत्मसात करताच तुम्ही कसे सर्व-गुणसपन्न 'सुपरमॅन' व्हाल ते ओळखू शकाल.

खुद्द डॉक्टरमंडळीच्या क्षेत्रावरसुद्धा या मंडळीचे आक्रमण चालते. 'Healing with water' या पुस्तकाच्या लेखिका केवळ पाण्याचा विविध प्रकारे उपयोग करून कुठलाही विकार बरा करण्याची ग्वाही देतात; तर Natural and folk Remedies या ग्रंथात जडीबुटीच्या औषधाचे उपयोग शिकवले आहेत. 'Amazing secrets of psychic Healing' या ग्रंथकर्त्यांच्या मते, पाणी किंवा जडीबुटी तरी काय करायची आहे? केवळ अंतश्चक्षूपुढे निरनिराळ्या प्रतिमा उभ्या करून, त्याद्वारे उपचार 'पाहून', अगदी चिवटातली चिवट दुखणी बरी करता येतात. 'ॲक्यूपंक्चर' हा प्रकार आजकाल पुन्हा प्रकाशात आल्यामुळे सर्वांना ठाऊक आहे; पण त्यात सुई टोचावी लागते आणि शरीरातील स्रोतांचा आणि मर्मांचा अभ्यास करावा लागतो. आता अभ्यासाने साध्य होईल तो चमत्कार कसा म्हणता येईल? त्याकरता एका गृहस्थाने 'Helping yourself with printed pressure theoy' हा ग्रंथ लिहिला आहे. यात सुई नसतेच. आपल्याच बोटाच्या टेक्याने आपल्या शरीराच्या विशिष्ट भागावर दाबायचे! आता अशा दाबण्याने रोग का बरे व्हावेत, याचे तर्कशुद्ध उत्तर आपल्याजवळ नाही, हे लेखक स्वत:च मान्य करतो.

साधे संभाषण ते काय? त्यात शिकवण्यासारखे काय आहे, असे तुम्हाला वाटेल; पण यातही तुम्हाला 'शब्दप्रभू' करून त्याद्वारे 'शुभं करोति कल्याणं आरोग्यं धनसंपदा' याची खात्री देणारे अनेक ग्रंथ आहेत. 'How to put yourself across with they and words and phrases' या ग्रंथातील रहस्ये तुम्ही आत्मसात केल्यावर कधीही 'अवाक' होण्याची पाळी तुमच्यावर येणार नाही! फडक्यांच्या नायकांसारखी नर्मविनोदी, हजरजबाबी प्रत्युत्तरे तुम्हाला साध्य होतील. 'Word-power makes the Difference' या ग्रंथाच्या लेखकाने तर Power steering आणि Power Brakes या अमेरिकेतील लोकप्रिय मोटारीच्या तंत्राप्रमाणे Power writing हा प्रकार शोधून काढला आहे. ही पद्धती म्हणे 'कागदावरून उडी मारून परिस्थितीचा ताबा घेते.' तुमच्या शब्दाला 'विजयी' धार आणून देते. असेच आणखी एक पुस्तक आहे 'Power speaking that Gets Results.' यात तर कुठलाही विषय आणि कोणीही श्रोते असोत, यातले 'जादूचे सूत्र' वापरून त्यांना कब्जात कसे घ्यायचे, याचे रहस्य सांगितले आहे. मग तुम्ही हजारोंच्या समोर व्यासपीठावर बोलत असा, काही थोड्यासमोर 'विक्रीवक्तव्य' करत असा अथवा आपल्या साहेबाशी बोलत असा! संभाषणाचे वाहक तुम्हीच असाल!!


सामाजिक चळवळींच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.

–डॉ. य. दि फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर

प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०,


## प्रेमाचेही तंत्र-मंत्र

आता संभाषणाप्रमाणेच उत्तम व्यक्तिमत्त्व जोपासणारे जादूचे नियम मिळाले तर काय बहार होईल? थांबा, तेही आहेत. 'Personal Development Course' या पुस्तकात कपडे कसे घालावेत, चालावे कसे, बोलावे कसे इथपासून ते लोकांना चुंबका-प्रमाणे आपल्याकडे आकृष्ट कसे करून घ्यावे याचे १६ सहजसाध्य धडे आहेत. १६ धडे फार वाटत असले तर '13 steps to more Dynamic Personality' या पुस्तकात तुम्हाला 'जोषपूर्ण जीवन-पद्धती', 'सर्जनशीलता', 'उदंड उत्साह' हे प्राप्त करून त्याद्वारे स्वप्नांचे रूपांतर समृद्धीत कसे करायचे, आत्मविकास, लोकप्रियता आणि अशाच अनेक गोष्टी कशा साध्य करायच्या याचे रहस्यभेद केले आहेत.

आता हे सगळं वाचल्यावर तुम्ही म्हणाल की, आता फक्त प्रेमात कसं पडावं आणि पोरी कशा गटवाव्यात या विषयावर पुस्तक निघा-यचं बाकी आहे! आहे! त्याही विषयावर पुस्तक आहे! इतर पुस्तकांची दहा दिवसांत पुस्तक न आवडल्यामुळे परत पाठवल्यास पैसे परत करायची गॅरंटी असते. या पुस्तकाची चांगली तीन महिन्यांची गॅरंटी आहे! म्हणजे मन:पूर्वक अभ्यास करून, प्रयत्न करून प्रेम यशस्वी होतेय याची खात्री पटवायला भरपूर वाव आहे. या पुस्त-काचं उप-शीर्षक आहे – 'प्रेमाच्या खेळात हरणे सोडून जिंकणे कसे सुरू करायचे.' पहिल्याच भेटीत वापरावयाची काही हमखास गुण-कारी मर्दनतंत्रेही या पुस्तकात शिकवली आहेत (म्हणजे भारतात याचा उपयोग करता येण्याची शक्यता कमीच!) या तंत्राचे नाव आहे 'कामोत्तेजक स्पर्श'! शिवाय दत्ता बाळ सांगतात तशा प्रेम-लहरी, द्वेषलहरी वगैरे बराच मालमसाला आहे. या पुस्तकातल्या मंत्राचे सामर्थ्य इतके जबर सांगितले आहे की, काहीही कर्तबगारी न दाखवता, अमाप पैसा खर्च न करता, तगडी शरीरप्रकृती न कमा-वता, एकच काय पण एकाच वेळेस दोन, तीन, चार प्रियकर वा प्रेयसी जिंकणे कोणालाही सहज साध्य होईल! अगदी ढेरपोट्या, टकल्या, बुवा असो किंवा बुटकी, दात पुढे आलेली बाई असो! एवढेच काय सध्याच्या तुमच्या जोडीदारात तुम्हाला फारसा रस वाटत नसेल तर त्याला कसा 'स्मूथली' कटवायचा किंवा काकूबाई प्रेयसीचे रुपांतर हेमामालिनीत कसे करायचे ... सारे काही इथे तयार पाठात उपलब्ध आहे!

याशिवाय वजन कमी कसे करावे, उंची कशी वाढवावी, चष्मा कसा सोडावा, भरदार वक्षस्थळे कशी प्राप्त करावीत, या व अशा अनेक विषयांवर असंख्य बोगस पुस्तके आहेत!

दुनिया झुकती, है, झुकानेवाला चाहिए! दुसरे काय? □

पुस्तके

# ' स्त्री-आरोग्य '

लोकविज्ञान प्रकाशनाचे ' स्त्री-आरोग्य ' हे प्रकाशन नुकतेच वाचण्यात आले. कै. रघुनाथ कर्वे यांच्या जन्मशताब्दीच्या पार्श्वभूमीवर ही पुस्तिका वाचताना प्रकर्षाने एकच गोष्ट जाणवली की, जागृत भारतीय स्त्री आता आपल्या प्रकर्षासाठी, उद्धारासाठी कोणा प्रभु रामचन्द्राच्या पदस्पर्शासाठी तिष्ठत राहिलेले नाही !

आरोग्य म्हटल्यावर प्रत्येकालाच स्वत:-बद्दल उगीचच काळजी वाटायला लागते ! विशेषत: शालेय क्रमिक पुस्तकातून [ तेही आपल्या मुलाच्या. आमच्या वेळी 'असल' काही शिकवत नसत ! ] मिळालेल्या तुटपुंज्या ज्ञानावर आणि बहुताशी अवती-भवती घडलेल्या दुर्घटनांच्या ऐकीव चर्चांवरून अशी भीतीची पाल सरसरून मनावर चढते. अशा वेळी जरूर असते ती जबाबदार दिलासा मिळाला तर त्याची. त्यातल्या त्यात स्त्रीचे आरोग्य म्हटले की, त्यात प्रजोत्पादनातील स्त्रीला उचलावा लागत असलेला वाटा मोठा असल्याने या विषयाला अधिक महत्त्व प्राप्त होते.

'स्त्री-आरोग्य' ह्या प्रकाशनात बव्हंशी स्त्रियांनी स्त्रियांसाठी असे ज्ञानभांडार एकत्र केले आहे. जननसंस्था, मासिक-पाळी, गरोदरपण, वंध्यत्व यासारख्या जिव्हाळ्याच्या विषयांवर सर्व आवश्यक माहिती आटोपशीर पण अचूकपणे यात दिली आहे. प्रजोत्पादनाची जबाबदारी पार पाडताना येणाऱ्या अडचणी आणि त्यावरील उपाय यांचीही समर्पक चर्चा [ उदा.-टाके पडणे, चिमटा लावणे, सिझेरिअन करावे लागणे इ. वरील चर्चा ] इथे केलेली आढळते. लिहिण्याच्या भरात बऱ्याच वेळा भंपक सामाजिक रूढीवर, पुरुषी वर्चस्वावर, स्त्रीच्या होणाऱ्या कुचंबणेवर खेळकर, चोरट्या चिमट्यापासून, समाजवादी अभिनिवेशात केलेल्या प्रहारांपर्यंत आक्रमक भूमिकाही वेळोवेळी दिसून येते. वैद्यकीय व्यवसायातील भ्रष्ट व्यवहाराकडे पण अचूक अंगुलिनिर्देश केलेला आढळतो.

बारा ते बावन्न वयाच्या कालखंडातून जाताना विविध शारीरिक स्थित्यंतराची चर्चा या प्रकाशनात जरूर आहे; पण त्याबरोबरच होणाऱ्या मानसिक आंदोलनाचे काही झोके अशा पुस्तिकेत दिसायला हवेत. विशेषत: 'घराबाहेर' पडलेल्या, काबाडकष्ट करणाऱ्या कामकरी स्त्रिया, नोकरी, व्यवसाय करून स्वतंत्र व्यक्तित्व फुलवणाऱ्या मध्यमवर्गीय स्त्रिया आणि खरोखर महत्त्वाचे काहीच काम नसल्याने सतत 'फिगर' 'डाएट' आणि 'हेल्थ'च्या चिंतेत पडलेल्या उच्चभ्रू स्त्रिया, या सर्वांच्या बदलत्या परिस्थितीनुरूप होणाऱ्या मानसिक ओढाताणीचे, ओझरते का असेना, दर्शन व्हावयास हवे असे मला वाटते.

एकूण ही पुस्तिका माझ्या षोडशवर्षीय मुलीच्या हातात पडायची व्यवस्था मी मुद्दाम करावी इतकी सुरेख झाली आहे !

**डॉ. सुहास दाणी**

' स्त्री-आरोग्य, '
लोकविज्ञान प्रकाशन,
१२५९/२, जगलीमहाराज रस्ता, पुणे-४
पृष्ठे : ४५, किंमत : ३ रु.

# परिचय

श्री. ग. वा. बेहेरे यांनी लिहिलेली ' कापुरुष ' आणि श्री. ज. जोशी लिखित ' स्थावर ' या दोन कादंबऱ्या अनुक्रमे रविराज आणि ' मॅजेस्टिक ' प्रकाशनने नुकत्याच प्रसिद्ध केल्या. दोन्ही कादंबऱ्यांचा विषय मूलत: एकच आहे. तो म्हणजे स्त्री-पुरुषामधील न उलगडणारं गुतागुतीचं नातं. हा विषय जितका गंभीर तितकाच तो नाजूकही आहे. या नाजूक विषयाची हाताळणी दोन्ही कादंबऱ्यात अतिशय सरधोपट पद्धतीने केली आहे.

' कापुरुष ' ही काशिनाथ, आशा आणि ज्युली याची गोष्ट आहे. स्त्रीत्व काय किंवा पुरुषत्व काय, दोन्हीही सापेक्ष आहेत ही या कादंबरीची मूळ कल्पना आहे. या सापेक्षतेचं मूळ अर्थातच मानसिक, भावनिक गुंतवणुकीत आहे. या गुंतवणुकीमुळेच आशा तिच्या नवऱ्याच्या मित्राच्या म्हणजेच काशिनाथाच्या प्रेमात पडते. आशाचा ससार सुरळीत चालावा म्हणून काशिनाथ परदेशात जातो. तिथे ज्युलीला काशीनाथमुळे तिच्या स्त्रीत्वाची ओळख पटते. काशीनाथ ज्युलीत समरस होऊ शकत नाही. कारण आशाशिवाय तो जगूच शकत नाही. कादंबरीचा क्लायमॅक्स म्हणजे शेवटी ज्युली काशिनाथची आणि आशाची भारतात भेट घडवून आणते आणि स्वत: मात्र नि:स्वार्थ बुद्धीने परदेशात निघून जाते !

'कापुरुष'ची ही साधी सरळ कथा. कादंबरी वाचताना आणि वाचून झाल्यावर कोणताही ठसा मनावर उमटू शकत नाही. स्त्री-पुरुष नात्याचं मनोवैज्ञानिक विश्लेषण करण्याचा लेखकाचा प्रयत्न असावा पण तो प्रयत्न संपूर्ण कादंबरीवाचनात कुठेही जाणवत नाही. बाजारातल्या इतर चार कादंबऱ्यांप्रमाणेच ही एक कादंबरी आहे. फावल्या वेळची करमणूक म्हणूनच जे बहुसंख्य लोक कादंबऱ्या वाचतात, त्यांनी ही कादंबरी वाचायला हरकत नाही.

श्री. ज. जोशी यांची ' स्थावर ' ही कादंबरीही अशीच स्त्री-पुरुष नात्यांमधले बारकावे वरवर टिपणारी आहे. पद्मा तिचा नवरा शिवदे आणि गावातले जुने कार्यकर्ते उत्तमराव यांचा पुंड मुलगा चद्रभान या तीन व्यक्तिरेखातून कादंबरी आकाराला येते. शिवदेच्या संसारात रमू न शकणारी महत्त्वाकांक्षी पद्मा, त्यामुळे शिवदेच्या मनात निर्माण झालेला न्यूनगंड आणि या न्यूनगंडामुळेच पद्मा-चन्द्रभानची वाढती मैत्री आणि त्याबाबत शिवदेची असमर्थता असा हा गुंतागुतीचा विषय आहे. मूळ कथानकाशी समांतर असणारा उत्तमराव आणि पुतळाबाईचा सघर्षही जाणवणारा आहे.

कादंबरी वाचल्यानंतर लक्षात रहातो तो पद्माचा महत्त्वाकांक्षी, निग्रही, बेडर स्वभाव. पद्माचं चित्रण प्रभावी करण्यात लेखक यशस्वी ठरला आहे. कादंबरीतल्या व्यक्तीचं मानसिक विश्लेषण करण्याची जबाबदारी लेखकाने वाचकांवर टाकली आहे. कादंबरीवाचल्यानंतर तसा थोडा विचार केलाही जातो. गुतागुतीच्या विषयाची नीट माडणी करणारी ही कादंबरी एकदा वाचायला हरकत नाही. दोन्ही कादंबऱ्यांची मुखपृष्ठं सुभाष अवचटांची आहेत. ◻

(१) ' कालपुरुष '
लेखक-श्री. ग. वा. बेहेरे
रविराज प्रकाशन
पृष्ठे-७० मूल्य-९ रु.

(२) स्थावर
लेखक-श्री. ज. जोशी
मॅजेस्टिक प्रकाशन
पृष्ठे-१३८ मूल्य-१६ रु.

रंगभूमी

# संगीत सुकामेवा

## तीन-चार आठवड्यांचा संकलित 'गजरा'

तुम्हाला नाटक आवडतं ?
यात नाटक आहे.
तुम्हाला गाणं आवडतं ?
यात (शास्त्रीय संगीतापासून डिस्कोपर्यंत सर्व तऱ्हेच) गाणं आहे.
तुम्हाला नाच आवडतो ?
यात नृत्य आहे.
तुम्हाला विनोद आवडतो ?
यात तो आहे.
तुम्हाला लोकनाट्य आवडतं ?
यात तमाशासुद्धा आहे !

तर अशा सगळ्या प्रकाराची भेळ करून ती नाटकाच्या डिशमध्ये भरून लेखक अशोक जी. पराजपे आणि दिग्दर्शक विहंग नायक यानी हा संगीत 'सुका ऽ मे ऽ वा ऽऽ' प्रेक्षकांना चारला आहे. नाटकाची 'एक दूजे के लिए' मधील 'सत्यं शिवं सुन्दरम्'ला स्पर्श करून जाणारी नादी संपल्यानंतर लगेचच नाटकाचे हे भेळस्वरूप स्पष्ट होते.

प्रत्येक अंकामध्ये टी. व्ही. च्या 'गजरा'-छाप दोन किंवा तीन किस्से आणि त्या किस्स्यांना जोडण्यासाठी त्याचा उपोद्घात व उपसंहार ठरणारे दोन-तीन चुटके आणि असे तीन अंक हे या नाटकाचे स्वरूप. या सगळ्याच्या द्वारे आलेल्या प्रेक्षकांची उत्तम करमणूक करणे, हा या नाटकाचा एकमेव हेतू असल्याचे सुरुवातीलाच सांगून टाकले आहे. साहजिकच करमणुकीपलिकडे अधिक गंभीरपणे या नाटकाकडे पाहण्याची आवश्यकता नाटककर्त्यांनीच ठेवली नाही. तेव्हा प्रश्न उरतो तो इतकाच की, हे करमणुकीचे काम तरी नाटकाने योग्य प्रकारे केले आहे का ?

नाटकाला एकसूत्री कथानक नसल्याचा उल्लेख मी यापूर्वीच केला; त्यामुळे त्या कथानकामुळे उत्कंठा वगैरे वाटण्याचा प्रश्नच येत नाही. नाटकात जी सात स्किट्स् घेतली आहेत तीच प्रेक्षकाना कितपत आकर्षक वाटतील, यावरच नाटक त्यांना सपूर्ण वेळ खुर्चीत बसवून ठेवणार की नाही, ते ठरणार होते. एका खेड्यातील नाट्यरूप 'रामायण', 'हुंडीबाग' (एका मुलीला दाखवायला नेले असता तिचा नियोजित पती 'तो' नसून 'ते' आहे, असा एक किस्सा), 'डोळ्यात वाच माझ्या' (दोन दारुड्या शेजाऱ्यांच्या संशयी बायकांनी केलेल्या घोळामुळे दोन्ही जोडप्यांची झालेली अदलाबदल), एका खेड्यातील निवडणुकीनंतर आमदारीणबाईंचा झालेला सत्कार-'निवडणूक', 'वरपरीक्षा' (तीसशेदोन साली जर मुलाला बघायला जाण्याची प्रथा आली तर- एकांकिका-स्वरूपात टी. व्ही. वर हा प्रकार पाहिल्याचे बऱ्याच जणांना आठवत असेल), 'कीचक-वध' आणि 'पतिव्रतेचा वग' (खेड्यात आलेल्या एका शहरी पाहुण्याला खेड्यातील एका बारा गावचे पाणी प्यायलेल्या बाईने फसवले तो किस्सा) अशी ही स्किट्स. या साऱ्या वर्णनामधून या प्रत्येक वेगवेगळ्या किस्स्याचे 'वस्त्रहरण', 'वाऱ्यावरची वरात' इत्यादींशी असलेले साम्य वाचकांच्या सहज ध्यानात येईल. त्यामुळे एकदा ऐकलेला विनोदच परत ऐकणाऱ्यासारखी प्रेक्षकाची अवस्था होते. हाताच्या बोटांवर मोजण्याइतके काही ताजे विनोद प्रेक्षकांची दाद घेऊन जातातच.

हे सगळे दृक्-श्राव्य माध्यमातून प्रक्षेपित करण्याचे काम दिग्दर्शक विहंग नायक यांनी अत्यंत सराईतपणे केले. रंगमंचावर पांढऱ्या चौकटी उभ्या करून त्याला फक्त वेगवेगळ्या चित्राचे वा वाक्यांचे फलक लावून प्रत्येक प्रसंगासाठी वेगवेगळे नेपथ्य सूचित करण्याची त्यांची कल्पना चांगली होती; पण हा बदल स्टेजवर अंधारात व अत्यंत अंधुक प्रकाशात धडपड धडपड आणि खुडबुड खुडबुड करीत करण्यापेक्षा स्पष्ट प्रकाशात अन्य चुटका वा गीत चालू असताना केलेला अधिक बरा !

या सर्व चोपट प्रसंगांमध्ये बराच रस भरण्याचा प्रयत्न केला आहे तो अभिनेत्यांनी बहुतेक सगळ्याच अभिनेत्यांना अनेक भूमिका करायच्या होत्या. लक्ष्मीकांत बेर्डे, विजय कदम, शाम पोंक्षे, सुरेश टाकळे आणि विजय साळवी यानी आपापसात नाटक खाऊन टाकले. यांच्याशिवाय विशेषत्वाने उल्लेख करावा लागतो तो वि. र. गोडे यांचा. नामवंत गायकांच्या हुबेहूब नकलानी गोडे यापूर्वीच रसिकाना परिचित आहेत. 'सुका मेवा' मध्येही मुख्यतः गायकीची बाजू साभाळण्याचे काम त्यांच्यावरच होते आणि काही गीतांमध्ये न कळणारे अस्पष्ट शब्दोच्चारण वगळता त्यांनी आपले काम समर्थपणे पेलले. मध्येच फर्माइशी तौरपर त्यांनी केलेल्या छोटा गंधर्व, कुमारगंधर्वांच्या नकलाही टाळ्या घेऊन जातात.

नाटकाचे संगीत चंद्रचूड विश्वनाथ यांचे होते. स्वतः केलेल्या स्वतंत्र रचनेबरोबरच जुन्या गाजलेल्या गीतांचाही पार्श्वसंगीतासाठी त्यांनी समर्पक वापर केला होता.

नाटकातील नृत्ये-विशेषतः समूहनृत्ये-मात्र त्यातील संरचना आणि प्रकाशयोजना दोन्ही दृष्टीनी डोळ्याला अत्यंत त्रासदायक होती.

थोडक्यात हे नाटक म्हणजे, टी. व्ही. वरील तीन-चार आठवड्याचा संकलित 'गजरा!'

—सदानंद बोरसे


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

मॅक्झिम गॉर्की

सुमती देवस्थळे

मूल्य बहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

## गिरणी कामगार संप पुरवणी

मुलाखती व शब्दांकन : ज्ञानदा नाईक

# गेल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्र सरकार किंवा केंद्र सरकारने केले नाहीत एवढे आर्थिक बदल आम्ही केले आहेत!

# —डॉ. दत्ता सामंत

आम्हा मुंबईबाहेरच्या सर्वसामान्यांना गेले दोन-तीन महिने मुंबईत चाललेल्या गिरणीकामगार-संपाबद्दल खूप कुतूहल आहे. शिवाय या संपामुळे भोवतालचे बदलते वातावरण, किंमत-वाढीबद्दल मनात येणाऱ्या शंका-कुशंका, संपाचे परिणाम ह्याबद्दल चिंता आहे. संप का होतात? त्याला जबाबदार कोण? गिरणी-कामगारांचा हा लढा नेमका कशासाठी आहे? त्याने काय साध्य होणार आहे? ह्या संपाबाबत सरकारची, गिरणीमालकांची प्रति-क्रिया काय? संपकाळात त्याच्याशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध असलेल्यांचे मानसशास्त्र काय असेल बरे? अशा अनेक प्रश्नांची गाठोडी पाठीशी बांधून मी २० मार्चला मुंबई गाठली. अर्थकारण, राजकारण, समाजकारण ह्यातल्या कुणा तज्ज्ञाला गाठावे आणि त्यांच्या चष्म्याची मदत घेऊन आपल्या प्रश्नांची उत्तरे धुंडाळावीत, असे ठरवले. अनेकांना फोन केले. त्या महानगरात कुणाच्या आधा-राची काठी न घेता हा शोध एकटीनेच घ्यायला हवा, हे दिवस-भराच्या फोनाफोनीनंतर लक्षात आले. गिरणीच्या धुराड्यातून जन्म घेतलेल्या ह्या अनेक प्रश्नांची उत्तरे धुंडायला मी बाहेर पडले.

जास्त उत्सुकता होती डॉ. सामंतांबद्दल! ते रहातात कुठे, त्यांना कुठे गाठायचे, केव्हा आणि कुठे फोन करायचा काहीच कल्पना नव्हती. दादर स्टेशनजवळ असलेल्या 'श्रमिक'मध्ये थोडी-फार तरी माहिती मिळेल म्हणून दुसऱ्या दिवशी टळटळीत उन्हात मी पत्ता शोधत तिथे पोहोचले. श्री. यशवंत चव्हाण ह्यांच्याकडून गिरणी-मालकांपैकी कुणाला भेटायचे (अर्थात ते कोणीही भेटायला तयार झाले नाहीत. हे अ-महाराष्ट्रीय मालक कदाचित भेट टाळत अस-तील; पण मराठी गिरणीमालक तरी नक्कीच निदान ५।१० मिनिटे वेळ देईल, ही आशाही फोल ठरली!) डॉ. सामंतांना केव्हा, कुठे फोन करायचा वगैरे माहिती मिळाली. दर तासाने एक, असे बरेच फोन केल्यानंतर रात्री साडेनऊला मला डॉ. सामंतांच्या बंधूंनी, फोनवर मी कोण, कुठून आले, कुठल्या वृत्तपत्रासाठी मुलाखत हवी, वगैरे अनेक प्रश्नांनंतर सांगितले, 'उद्या सकाळी ७॥ ला घाटकोपरला पंतनगरला या. मात्र उशीर करू नका!' मी थोडा सविस्तर पत्ता विचारल्यावर उत्तर मिळाले, 'घाटकोपरस्टेशनला या. तिथे कुणीही सांगेल!'

नुकतेच घडलेले 'इंडियन एक्सप्रेस'चे संपप्रकरण डोक्यात होते. डॉ. सामंतांचे नेतृत्व अनेक ठिकाणी (इंडियन एक्सप्रेस, बेस्ट, भारत-फोर्ज, पटेल अॅल्युमिनियम, पॉलीकेम) अयशस्वी होऊनसुद्धा आज अडीच लाख गिरणीकामगार कुठल्या खात्रीवर गेले अडीच महिने सामंतांच्या नेतृत्वाखाली संपावर आहेत? अनेक कारखान्यांत अजूनही मालक कामगाराला सांगतात की, 'कुठलीही युनियन चालेल; पण त्या दत्ता सामंतांना आणू नका!' असे का?

मी आणि श्रीमती देवयानी सावंत सकाळी सातला घाटकोपरच्या पंतनगरात डॉ. सामंतांचे घर विचारत पोहोचलो. महाराष्ट्र हाउसिंग बोर्डाच्या कॉलनीतल्या इमारतींच्या गराड्यातला तो छोटेखानी बंगला होता. आम्ही ऑफिसमध्ये गेलो. दाराशी पाण्याचा कुलर होता. भोवताली पोस्टर्स – बॅनर्स लटकत होते. बाकी सामसूम होती! दाढी वाढलेला एक नोकर आला. आमच्याकडे पाहिले न पाहिलेसे करून निघून गेला. समोर मोठं टेबल-खुर्ची होती, बाजूला कोच होता. दोन-चार बाकडी होती. लांब-रुंद जागा होती. आम्ही बसलो.

हळूहळू बरेच कामगार त्या ऑफिसमध्ये जमले. कुणी एक कर्कश आवाजाचा माणूस त्यांची नावं लिहून वगैरे घेत होता. आठ वाजून गेले होते. मला बसून कंटाळा आला होता, वैतागही आला होता.

साडेआठला आम्हाला आत प्रवेश मिळाला. भल्याथोरल्या अर्धगोल टेबलामागे डॉ. सामंत बसले होते. भरघोस हसून ते म्हणाले, 'माफ करा, फार थांबावं लागले का ?'

¤

रत्नागिरीच्या किनाऱ्यावरील शेतकऱ्याचा हा मुलगा शिक्षणासाठी मुंबईत आला. '४ आणे रोज' ह्या भावाने सेंट्रल मुंबईच्या एका हॉटेलमध्ये राहिला. एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये एक वर्ष आणि ५ वर्षं सेठ जी. एस्. मेडिकल कॉलेजमध्ये काढून पदवीधर डॉक्टर बनला !

¤

एक सेक्रेटरी (श्री. बोराडे–डॉक्टरांचा उजवा हात), १५ कारकून, पाच–सहा स्टेनोग्राफर्स आणि चार वकील एवढ्या ऑफिसच्या साहाय्याने, बड्या–बड्या युनियन्स बाजूला सारून पुढे आलेले डॉ. सामंत मोठ्या प्रमाणावर सुसंघटितपणे कामकाज कसे पहाणार, असे त्यांचे ऑफिस पाहून वाटले. त्यांच्या दिनक्रमाची चौकशी करताना कळले की, रोज साधारणत. हजार लोकांना ते भेटतात. सकाळी सात वाजता त्यांची कामाला सुरुवात होते. साधारणपणे रोज दहा ते पंधरा वाटाघाटी करतात. वाटाघाटी करण्यातली त्यांची सफाई, बुद्धिमत्ता आणि कसब वाखाणणारा एक माणूस म्हणाला, 'ते कामगारांचे 'अनभिषिक्त राजे' आहेत !

¤

आमची मुलाखत ४० मिनिटे झाली.

या मुलाखतीमागची माझी भूमिका प्रचारकाची नाही अथवा विरोधकाचीही नाही. फक्त जिज्ञासूची आहे.

**मी :** हा गिरणीकामगार संप नेमका कशासाठी आहे ?

**सामंत :** मुंबई शहरात टेक्सटाईल कामगार अडीच लाख आहेत. मुंबईच्या बाहेर १०।१५ लाख आहेत. ह्या कामगाराचे पगारं फार कमी आहेत. जो नवीन कामगार कायम होतो त्याला डिसेंबरचा पगार ६६० रुपये आहे. चार–सहा साचे जे काम करतात त्यांना ७०० ते ८०० रु. मिळतात. महत्त्वाचा प्रश्न, एक लाख कामगार बदली कामगार म्हणून आहेत. तरुण मॅट्रिक, नॉनमॅट्रिक, अंडरग्रॅजुएट मुलाना २०० ते २५० रु. मिळतात. त्यामुळे ह्या लोकात फार नाराजी आहे. शिवाय डाइंग, ब्लीचिंग किंवा सिरनिंग डिपार्टमेंटमध्ये काम करण्यात केवढे हॅझार्ड्स आहेत ! त्या कापसात, रंगात, वायूत काम करून बऱ्याच लोकांना दीर्घकालीन आजार झालेत. म्हणूनच हा कामगार फार कंटाळलेला आहे. मुंबई शहरात एवढ्या पैशात रहाणे, सहा-सातशे रुपयांत जीवन काढणे आता त्याला शक्य नाही. आमच्याकडे दुसऱ्या बऱ्याचशा इंजिनिअरिंग, केमिकल कंपन्या आहेत. गोदरेज, प्रिमिअर, एफ.पी.आय. वगैरे. त्या सगळ्याच ठिकाणी पगार आता हजार-बाराशेच्या पुढे गेलेत. गिरणीकामगार मात्र त्यामानाने फार मागे राहिला म्हणून हा लढा आहे.

**मी :** एक विचारू, आपण सांगत असलेल्या ह्या क्षेत्रात काम करणाऱ्या बऱ्याच जुन्या आणि मातब्बर कामगार युनियन्स आहेत, कामगार-नेते आहेत, आपण फार थोड्या अवधीत बरेच यश कसे मिळवलेत ?

**सामंत :** मातब्बर पुढारी असे नाहीत. इंटक युनियन आहे. ह्या धंद्यामध्ये 'एका धंद्यात एक युनियन' असा जो कायदा आहे, त्यामुळे ते युनियन तेवढे बॉदर करत नाही.त्यांनी कधी मागण्या केल्या नाहीत, काही मिळवून दिले नाही. त्यामुळे वर्किंग क्लास आता फार कॉशस झालेला आहे.

**मी :** तुमच्या म्हणण्याचा अर्थ ह्यापूर्वी कधी कुठे संपच झाले नाहीत, कामगारांच्या मागण्या पूर्ण झालेल्या नाहीत, असाच नाही का ?

**सामंत :** भरघोस असं काय पदरात पडलंय ?

**मी :** वर्किंग क्लास आताच कॉशस व्हायला लागला आणि त्याच वेळी तुमचे नेतृत्व पुढे आले, योग्य वेळी, असे वाटते का तुम्हाला?

**सामंत :** असं काही मी एक्झॅक्ट म्हणत नाही; पण जुन्या तऱ्हेने, एकंदर जो साचा आपल्या देशात आहे–कामगारानी मागण्याकरता मालकाशी बोलायचे, इंडस्ट्रिअल कोर्टात जायचे, आता बॅलन्सशीटच जर खोटे असतात तर कोर्टातून त्याना कसा न्याय मिळणार ? आणि आज महागाई तर वाढते आहे !

**मी :** म्हणजे सामोपचाराने कामगाराने आपले प्रश्न सोडवणे चूक आहे. म्हणूनच सध्या बरीच चर्चिली जाणारी 'सामंत मेथड' अमलात आणायला तुम्ही सुरुवात केली...

**सामंत :** (थोडे त्रासिकपणे) नाही, नाही 'सामंत मेथड' असे ह्यात काही नाही. शेवटी ही चीज पैसा ही आहे आणि आपल्या देशातले सगळे मालक हे ट्रेडर आहेत, व्यापारी आहेत ! माझा धंदा वाढला, फायदा वाढला तर कामगाराना मी काही तरी दिले पाहिजे, हे मॉरल किंवा अंडरस्टॅंडिंग आपल्या देशात नाही ! जेवढ्या कमीत-कमी पैशात कामगाराना राबवता येईल तेवढे बरे दुर्दैवाने आपल्या देशात बेकारी एवढी आहे की, एकाला काम, तर २॥ बेकार आहेत. कॅज्युअल बदली कॉन्ट्रॅक्टमध्ये राबवायची आमच्या मालकलोकांची टेन्डन्सी आहे.

**मी :** म्हणूनच मालकलोकाशी बोलणी करून कामगाराने आपले प्रश्न सोडवण्याच्या फंदात न पडता आपण त्यांना डायरेक्ट मेथड सांगितलीत.

**सामंत :** डायरेक्ट मेथड म्हणजे कुठली ?

**मी :** म्हणजे सरळ संप करणे, एकदम अटीतटीला येणे !

**सामंत :** मला वाटते, तुमचे ऑब्झर्व्हेशन थोडेसे चुकीचे आहे. आमच्याकडे जवळजवळ ५-६ हजार कंपन्या आहेत. एका वेळी फक्त ३०-३५ कंपन्यांत संप चालू असतो. म्हणजे हे संपाचे प्रमाण एक टक्कासुद्धा नाही. (थोडा वेळ विचार करून) आता आज सकाळपासून ॲजबेसटॉस सिमेंटची आम्ही निगोसिएशन्स केली. बिर्लांच्या झेनिथ पाइपला ४०० रु. वाढवण्याचे आमचे प्रयत्न चालू आहेत.

**मी :** एकदम ३००-४०० रुपये पगारवाढीची मागणी अवास्तव वाटते.

**सामंत :** ही काही फार मोठी वाढ नव्हे–फायदा लक्षात घेता.

**मी :** नाही. मी सामान्यांच्या दृष्टिकोनातून म्हणते; पण आपली ही धोरणे कितपत यशस्वी होतील असे वाटते तुम्हाला ?

**सामंत** झालीच आहेत ना. होतील म्हणजे काय ? म्हणून तर वर्कर आमच्याकडे येतोय.

**मी :** यशस्वी म्हणजे, जिथे ज्या मिलमध्ये सध्या संप आहेत त्या-

पैकी कोहीनूरसारख्या सिक मिल्स् आहेत, तिथे तुमची ही धोरणे कितपत यशस्वी होतील ?

**सामंत :** जरा विषय तुम्ही कन्फ्यूज केलात. आम्ही ट्रेड युनियनमध्ये गेल्या ४–५ वर्षांत ही सेटलमेंट करतो आहोत. ३० ते ४० कंपन्यांत महिन्याला ३०० ते ४०० रु. वाढवून मिळतात; पण मुकुद आयर्नसारख्या प्रायव्हेट सेक्टरमध्ये ११० कोटी रुपयांचा धंदा आहे. तिथे एक कोटी कामगारांना दिले तर काय होतंय त्याना ? अशा तऱ्हेने आम्ही जे काम करतोय ते काम कायदा, सरकार किंवा इतर युनियन करत नाहीत. असे इकॉनॉमिक गेन्स् आम्ही दर २–३ वर्षांनी १०–१२ लाख लोकांना मिळवून देतो. आमच्याकडे १५ लाख कामगार आहेत. त्यापैकी ५ लाख कामगार असे आहेत की, ज्याचे-अगदी झाडूवाल्यांचेसुद्धा–पगार १२००शेच्या पुढे आहेत. गिरणीकामगार मात्र ५०० ते ६०० रुपये मिळवतो.

**मी :** मी बऱ्याच कामगारचाळीतून फिरले. बराच काळ संप चालल्याने त्यांची उपासमार होतेय.

**सामंत :** २–३ गोष्टी आहेत. आयुष्यभर आम्ही उपाशीच होतो. १२ वर्षे आम्ही बदली आहोत.

**मी :** पण असे वाटले की, त्यांचा धीर आता संपत चाललाय.

**सामंत :** त्याचा धीर संपलेला नाही. हे तुम्ही बोलताय ते साहित्यिकाच्या भाषेत बोलताय. वर्कर फार हुषार झालाय! पोटाला थोडं द्या आणि राबवा, असा घरेलू मामला आता राहिलेला नाही. टेक्सटाइल संप तर बरेच दिवस चालेल!

**मी :** सरकारची भूमिका तुमच्या संपाबाबत तटस्थ का ?

**सामंत :** कारण ६५ मालकाचे असोसिएशन स्ट्रॉंग आहे. सरकारला ते पैसे देत आहेत!

**मी :** सरकारचे धोरण तळागाळातल्याचा विकास. तुमच्या बोलण्यातून जे दिसते त्यावरून तुम्ही तळच्या कामगाराचाच आर्थिक विकास करताय.

**सामंत :** आपल्या देशात स्वातंत्र्यानंतर कारखाने, शेतीउत्पादन वाढले; पण खालच्या लोकाना योग्य वाटा मिळत नाही. त्यामुळे Though not equal distribution, fair distribution of money in the country is a major dispute. सरकारी धोरणे आणि लाचलुचपत ह्यामुळे आमचे कायदे फोल झाले.

**मी :** तुम्ही मान्यताप्राप्त युनियन नाही म्हणून वाटाघाटी होऊ शकत नाहीत, असे सरकारचे म्हणणे आहे.

**सामंत :** पोझिशन अशी आहे की, अडीच लाख वर्कर टेक्सटाइलमध्ये आहेत. त्यातले अडीच हजारही इंटकबरोबर नाहीत. तसं व्होटिंग घ्यायची आमची तयारी होती. लोकमत आमच्या बाजूने आहे, तरी असं घडतंय. ह्याचा अर्थ आमची लोकशाही काही तरी चुकतेय. आमचे कायदे चुकताहेत, ते बदलले पाहिजेत!

**मी :** कायदे बदलण्यापेक्षा तुम्ही कायद्यानुसार मान्यताप्राप्तीचे प्रयत्न का केले नाहीत ?

**सामंत :** बी. आय. आर. म्हणजे कोणती चीज आहे ते समजावून घ्या; म्हणजे तुमच्या लक्षात येईल की, गिरणीमालक आणि सरकारची इच्छा असेल तीच युनियन बी. आय. आर. कायद्याखाली प्रातिनिधिक रहाणार! त्या युनियनकडे ५ टक्केसुद्धा कामगार राहिले नाहीत तरी बदल होऊ शकत नाहीत.

१९४६ सालचा हा बी. आय. आर. कायदा आहे. सरकारला हवी असेल तीच युनियन चालू ठेवता येईल किंवा नवी आणता येईल, अशी पक्की तरतूद ह्या कायद्यात आहे. ह्या कायद्यामुळे गुप्त मतदानाने मान्यताप्राप्त युनियनचा फैसलाच होऊ शकत नाही.

प्रातिनिधिक असल्याचा दावा करणाऱ्या युनियनने कामगारांच्या सहा महिन्यांच्या सदस्यत्वाची यादी ठराविक फॉर्ममध्ये सादर केली पाहिजे. ह्या सहा महिन्यांच्या काळात एकही बेकायदा संप होता कामा नये किंवा अशा संपाला सहाय्य झालेले असता कामा नये. समजा, माझी युनियन नकोच आहे, तर तत्काळ ५–१० कामगारांना अन्यायाने काढून टाकायचे आणि चिडून कामगारांनी तासभर जरी काम बंद ठेवले तरी संप बेकायदेशीर ठरवून घ्यायचा आणि माझी युनियन घालवायची. कामगारविरोधी धोरणाचा अर्क असलेल्या शांतिलाल शहांनी हा कायदा घडवला!

**मी :** सरकारचा पहिला मुद्दा मान्यताप्राप्ती, तो झालाच क्लिअर. आणि दुसरा मुद्दा आहे, पुलोद राजवटीत, केंद्रीयमंत्री जॉर्ज फर्नांडिस आणि शरद पवार व कामगार याच्यात ४५ रु. वाढ + दर साल ६ रुपये वाढ, हा झालेला करार १९८४ला संपतोय; पण त्यापूर्वीच तुम्ही हा संप पुकारलात.

**सामंत :** असा करार जॉर्ज फर्नांडिस आणि शरद पवारानी सुचवलाच नव्हता. त्यांनी फक्त तोडगा सांगितला. ४५ रु. वाढ तर लगेच द्यायची होती. उरला भाग दरसाल ६ रु वाढ; पण संघ आणि गिरणीमालक ह्यानी त्याचा सरळ करार करून टाकला की, दर साल ६ रु. पगारवाढ पुढील ५ वर्षे (१९८४ पर्यंत) द्यावी. मला सांगा, असा कामगाराचा गळा कापणारा करार कुठलीही युनियन कुठल्याही कारखान्यात करेल का ? संघ प्रातिनिधिक युनियन असल्याने असा कामगारविरोधी करार त्यांनी केला.

**मी :** तुमच्यावर असा आरोप करण्यात येतो की, कामगारांत एकजूट करण्याऐवजी तुम्ही त्याला लढघालाच जास्त प्रवृत्त करता आहात!

**सामंत :** असं नाही. कामगार एक झाल्यानेच त्याला लढघाला प्रवृत्त करता येते, म्हणून तर एवढी अॅग्रिमेंट्स् होताहेत. ऑफिसमध्ये मालकानी येऊन कामगाराला पैसा देणे, बोलणे — ही ट्रेडमिनिस्ट्री आहे. नाही तर युनियन लीडरने मालकाकडे जाऊन

# डॉ. दत्ता सामंत म्हणतात...

मस्का लावायचा, मग मालकाने ५१ रु. वाढवायचे ! आता तुम्ही बाहेर पहाल तर सहा–सात मोठे मालक थाबलेत. आम्ही प्रत्येकाला सागणार–२५ % बोनस दे, एवढे दे.

**मी** : हा बदल घडतोय तो संघर्ष सुरू केल्याने, लढ्याला उभे राहिल्यानेच का ?

**सामत** : लढ्याने असे नाही. मालकांना माहिती आहे की, हे पैसे दिले नाहीत तर पुढे आदोलन होणार ! हा जो एक दबाव आहे, तो चांगला वर्कआउट होतोय.

**मी** : म्हणजे दबाव आणणे ही 'सामंत' मेथड आहे !

**सामंत** : बरोबर. त्याशिवाय पैसा कोणी काढणार नाही. तुम्ही मालक आहात, लाख रुपये मिळवताय. ते पैसे दुसऱ्याला देणे नको वाटते. ही ह्यूमन सायकॉलॉजी आहे. दबाव कुणी तरी आणावा लागतो. आमचे सरकार आणत नाही, म्हणून आम्ही आणतोय !

माझे दुसरे ऑर्ग्युमेंट असे की, आम्ही एवढे पैसे घेऊनही कारखाने बंद झालेल नाहीत. म्हणजे Capacity to pay is there. प्रेशर-कुकरमध्ये आम्ही ४७० रुपये वाढवून घेतले. आमचा झाडूवाला तिथे कमीत कमी १३०० रु. पगार घेतो; पण त्यामुळे तो कारखाना काही बंद झाला नाही. उलट त्याची आणखी एक शाखा निघतेय. एवढी पगारवाढ केल्याने उद्योग आजारी होतील, हा मालकमंडळीचा प्रचार फसवा आहे !

**मी** : भोवतालच्या परिस्थितीत हे आर्थिक–सामाजिक बदल होताना मध्यमवर्गीयानी तुमच्याकडे कुठल्या अपेक्षेने पहावे ?

**सामत** : तुम्हाला वाटतय की, कामगाराचा पगार आम्ही वाढवून घेतोय म्हणजे सामान्य माणसावरचा बोजा वाढला. तुम्ही हे इंदिरा-गाधीसारखं बोलायला लागलात. तुमचे म्हणणे बरोबर नाही. कारण ह्या देशात Cost price आणि Selling price ह्याचा एकमेकांशी सुतराम सबध नाही. गिरणीमालक शेतकऱ्याकडून ५.८० ने कापूस घेतात. तो गिरणीत येईपर्यंत बोगस कपन्यातून ८ रु. होतो. स्पिनिंग, विव्हिंग, डाइंग, प्रिंटिंग ह्या प्रत्येक ठिकाणी दहा टक्के खोटे दाखवतात. आणि सेलीगच्या वेळी ५ टक्के कमिशन असते. शिवाय एजंट, होलसेलर ह्याचेच नातेवाईक ! आज मराठवाड्यातील जालन्यात ४४ कपन्या बोगस रजिस्टर्ड आहेत. ह्या आकडेमोडीत कामगाराचे पगार वाढल्याने सर्वसामान्यावर महागाईचा बोजा वाढेल, असे म्हणणे अत्यंत चुकीचे आहे. आमच्या राज्यकर्त्यांनी आणि भाडवलदारानी सामान्य माणसाला तसे सतत सागितले आहे. आता बुकबाँडची कॉस्ट डायरेक्टरचे काळे पैसे धरूनसुद्धा १४ रु १० पैसे आहे; पण विकला जातो २४ रुपयांना. व्हिस्कीची Cost price ३.५० रु. लिटर आहे ती विकली जाते १०० रु. लिटर भावाने ! — Small pack वगैरे करून. आज शरद जोशी कांद्यासाठी आदोलन करून ४० पैशाऐवजी ५० पैसे शेतकऱ्याला द्या म्हणतात, तेव्हा तो कांदा बाहेर १.६० रु. भावाने विकला जातोय. या देशात बनणारा माल आणि त्याचा विक्रीदर ह्याचा सुतराम संबंध नाही.

दुसरे म्हणजे पगाराचे प्रमाण. हे प्रमाण केमिकल कारखान्यात १०० रु. धदा झाला तर २ रु. किंवा ३ रु. असते. म्हणजे हे पगार जरी दुप्पट केले तरी विक्रीदर वाढेल किंवा मालकाचा धंदा नुकसानीत जाईल असे मुळीच नाही.

'**मी** : अशी केमिकल कारखान्याची ऐपत असताना पॉलीकेम संपात तुम्हाला एक वर्ष सप करून माघार का घ्यावी लागली ? फक्त १२५ रु. पगारवाढ मिळाली–जी कंपनी संपापूर्वीही द्यायला तयार होती.

**सामंत** : (कपाळाला आठ्या पडल्या) अहो, हे Economic changes कोणी करायचे ? सरकारने करायचे. सरकार करत नाही म्हणून आम्ही भाडतो. आता आम्ही ५० संप केले. त्यातला एखादा कमी पैशात मागे घेतला म्हणून बिघडले कुठे ? पाच हजार कारखान्यात आम्ही जे करार केले त्यात काही स्ट्रॅटेजी म्हणून आम्हाला काही वेळा माघार घ्यावी लागते. आम्ही काही all round सरकार नाही ना !

**मी** : पण ह्या मागे घेतलेल्या संपात ज्या कामगारानी तुमच्या नेतृत्वावर विश्वास टाकून उपासमार सहन केली त्यांचे नुकसान नाही का ?

**सामंत** : आहे ना. पण गेल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्र सरकार किंवा केंद्र सरकारने केले नाहीत एवढे आर्थिक बदल आम्ही केले आहेत.

**मी** : एक थोडा वैयक्तिक प्रश्न. व्यवसायाने आपण डॉक्टर; पण पेशंटवर उपचार करण्याऐवजी कामगारांवर उपचार करण्यास सुरुवात केलीत. How do you feel about it ?

**सामंत** : बरं केलं ना. तुम्ही सगळे आश्वासन देता गरिबी हटावचे पण खरे पाहता तुम्ही आम्हाला ठोकर मारली ! आमचा पंधरा-वीस हजार कामगार दिवसाला तीस-चाळीस रुपये पगार घेतोय. आम्ही केलेले परिवर्तन fantastic आहे. तुमच्या पुण्याला भारत फोर्जमध्ये आम्हाला त्रास झाला; पण किर्लोस्करने, ज्यानी कधी आठ टक्क्यावर बोनस दिला नव्हता, त्यांनी आमची नावे दाखवल्यावर स्वतःहून २० टक्के द्यायला सुरुवात केली. ही आर्थिक प्रक्रिया सुरू झालीय. त्यात एखाद-दुसऱ्या ठिकाणी त्रास होतो. पॉलीकेममध्ये सरकारच स्ट्राइक तोडायला निघाले, त्याला काय करायचे ?

**मी** : कामगाराबद्दल ही सहानुभूती, कळवळा पूर्वीपासून होता का हल्ली......

**सामत** : पहिल्यापासून ! ६५-६४ मध्ये मी मुंबईत झोपडपट्टीची चळवळ फार केली. महाराष्ट्र हाउसिंग बोर्ड फेडरेशनकरता मोर्चे वगैरे काढले.

**मी** : कामगार चळवळीसारख्या ह्या सामाजिक विषयांची जाणीव लहानपणापासूनच म्हणजे वडिलांची किंवा इतर कुणाची पार्श्वभूमी मिळाल्याने निर्माण झाली का ?

**सामत** : नाही. माझे वडील शेतकरी होते. ही जाणीव माझ्या निरीक्षणातून झालीय.

**मी** : सौभाग्यवतीही सामाजिक कार्य करतात. त्यांचा ह्या चळवळीत सहभाग किती ?

**सामंत** : आम्ही मिळून स्लमचे काम केले; पण आता कामगार क्षेत्रात त्यांचा काही सहभाग नाही.

¤

आम्ही नमस्कार करून बाहेर निघालो तोपर्यंत गुळगुळीत चेहेऱ्यांची, हातात ब्रीफकेस घेतलेली काही 'पॉश' मंडळी काचेचे देखणे दार उघडून घाईघाईने डॉ. सामंतांच्या केबिनमध्ये शिरली. त्यांच्यातल्या एका उंच, सोनेरी फ्रेमचा चष्मा घातलेल्या गृहस्थांनी माझ्याकडे अतिशय त्रासिकपणे पाहिले. कदाचित माझ्यामुळे पहिल्यांदाच त्याला इतका वेळ ताटकळावे लागले असेल ! □

# मान्यता नसलेल्या युनियनशी अशा युनियनच्या नेत्याशी आम्ही कधीच बोलणी करणार नाही !

**—विजय नागर**

धूळ, कचरा, कठड्याच्या दोरीवरून फाटकी गोणपाटे, फाटक्या गोधड्या—वाकळा, ठिगळे लावलेली विटकी लुगडी त्या चाळीत जागोजाग दिसत होती. तुटक्या, वेड्यावाकड्या पायऱ्यांवर ओल होती. घाण होती. गटार, कुजलेले अन्न, आणि मलमूत्र ह्यांचा मिश्र घाणेरडा वास सगळ्या वातावरणात भरून राहिला होता. श्वास गुदमरत होता. दुपारचे १२ वाजले होते तरी सगळे थंड होते. खंगलेल्या शरीराचे काळेकुळकुळीत कामगार एका पायरीवर भकास चेहऱ्याने बसले होते. कुणी कुणाशी बोलत नव्हते.बाजूला एका नळाशी बायका कलकलत होत्या. एक नागडे पोर भोकाड पसरून रडत होते. त्याचे अंग खरजेने भरले होते. त्या रडणाऱ्या पोरापाशी बसून दोन पोरी पानात बांधलेले अन्न अधाशासारखे खात होत्या. मी एका बंद घरावर थाप दिली. मोठ्या दातांच्या टक्कल पडलेल्या एका कामगाराने दार उघडले. विचारले, ' काय काम आहे ? ' त्याच्या तोंडाला दारूचा भपकारा येत होता. घरातून मला जवळच टांगलेला जेवणाचा डबा दिसला. त्याच्यावर खूप धूळ साचली होती. मी येण्याचे कारण सांगितल्यावर त्याच्या मागे येऊन उभी राहिलेली घरातली बाई विलक्षण उदास हसून म्हणाली, ' जा बाई तुमच्या रस्त्यानं तुम्ही. कशाला आमच्या भानगडीत पडता ? आमचं आम्ही पाहून घेऊ !'

पोटासाठी, न्यायासाठी ही मंडळी त्रस्त होती. त्यांची मनं पेटलेली होती. तो सारा दिवस अनेक कामगारांना भेटले, त्यांच्याशी बोलले. त्यांनी आपली मने उघडी केली. घरातलं सोने-नाणे, भांडीकुंडी विकून संपली होती. मारवाडी कर्ज देत नव्हता. गिरण्याचा भरवसा नाही तर कुठल्या जोखमीवर पैसे द्यायचे असा त्याचा सवाल ! बहुतेक बायका धुणी-भांडी, मोलमजुरी करून संसार रेटत होत्या; पण संप चालू ठेवण्यासाठी नवऱ्याला धीर देत होत्या. मालकाबद्दल, पुढाऱ्याबद्दल आणि अन्यायाबद्दल त्यांना पोटतिडकीने बोलताना पाहून वाटले, कोण म्हणेल ह्याना अडाणी ? अशा मोठ्या लढ्यात सामील झाल्यानेच ह्या स्त्रियांच्या सामाजिक जाणिवा, स्त्रीपुरुष समानता वाढीला लागत असावी.

इथे स्त्रीपुरुष दोघे खांद्याला खांदा लावून लढायला उभे होते. कोहिनूर मिलच्या एका चाळीत मी विचारले की, " तुमची मिल सिक् मिल आहे, केवळ कामगार बेकार होतील म्हणून सरकारने मध्यस्थी करून ती चालू ठेवलीय. असे असताना तुमची मिल तुम्हाला दुप्पट पगारवाढ कशी देणार ? या संपाचा तुम्हाला काय उपयोग होणार ?"

" आम्हाला झाला नाही तरी इतर चार गिरण्यांतल्या कामगाराना तर होईल !"

त्या दिवशी रात्री कामगारचाळी, कामगाराची स्थिती, तशातही त्यांची जिद्द आठवून मला खूप वेळ झोप आली नाही.

¤

गिरणीमालकसंघ – प्रतिनिधींची मुलाखत घेताना आणखीनच वेगळा अनुभव आला. प्रथम त्यांनी स्पष्ट नकार दिला. ' वृत्तपत्रे सत्याचा विपर्यास करतात म्हणून आम्ही मुलाखत वगैरे देत नाही !' असे सांगितले.

फोन करून कुणी भेटेना. शेवटी सरळ एल्फिन्सटन बिल्डिंगच्या मिल ओनर्स असोसिएशनच्या ऑफिसातच गेले. मुलाखत मिळाली ! पण मला बजावण्यात आले की, आम्ही एवढा वेळ घालवून मुलाखत देतो आणि वृत्तपत्रे पानभर दत्ता सामंताची मुलाखत छापून आमच्या मुलाखतीतला काही भाग फक्त कोपऱ्यात देतात ! वगैरे.

¤

' Dr. Samant is a total failure as a Labour Leader' अशा शीर्षकाखाली डॉ. सामंतांचे संप महाराष्ट्रात कुठे कुठे अयशस्वी झाले, तिथे किती दिवस कामाचे नुकसान झाले, कामगाराना किती रुपयाचा तोटा सहन करावा लागला ह्या रिपोर्ट आणि किती ठिकाणी संप यशस्वी झाले त्याचा तपशिलाचा भलाथोरला वृत्तांत, डॉ. दत्ता सामंतांनी सांगितलेली असत्ये ह्याचा वृत्तांत, डॉ. सामंतानी कामगाराना दाखवलेली मृगजळे अशा शीर्षकाचा १०।१२ पानी वृत्तात ' द बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन ' च्या कार्यालयात बसून मी चाळले. अतिशय तर्कशुद्धपणे लिहिलेले हे वृत्तात वाचताना वाटले, तसं पाहिलं तर तर्कशास्त्राच्या आधारावर बऱ्याच खऱ्या गोष्टी खोट्या ठरवता येतात, खोट्या गोष्टी खऱ्या भासवता येतात. त्यामुळे नेमके खरे – खोटे कळणे कठीणच ! तेव्हा अशा कागदांच्या जंजाळात सत्य शोधायचा प्रयत्न करणे व्यर्थ ! फक्त मालकमंडळीची बाजू काय आहे ते समजावून घेऊन जशीच्या तशी लेखात मांडण्याचा प्रयत्न करावा हे बरे...असा विचार करेपर्यंत मिलओनर्ससंघाचे

एक अधिकारी श्री. आर. जी. शेटेंचे बोलावणे आले. त्याना माझ्या येण्याचा उद्देश स्पष्ट केल्यावर असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी श्री. R. L. N. विजय नागर याच्याकडे ते घेऊन गेले. बोलताना ते फारच संतापले होते. सध्या कापडगिरण्याबाबत जे काही घडतंय तो सगळा प्रकार अगदी बिनबुडाचा आहे असा त्याचा रोख होता. बोलताना स्वामित्वाचा अहंकार शब्दाशब्दातून जाणवत होता.

प्रश्न : ५·४० रु. दराने शेतकऱ्याकडून कापूस खरेदी करून भरमसाठ भावाने तयार कापड गिरण्या विकतात आणि वेगवेगळ्या मार्गाने नफ्याचा खूप मोठा वाटा मालकमंडळी हडप करतात. मग कामगाराना पगारवाढ द्यायला काय हरकत आहे ?

■ नॅशनल कौन्सिल ऑफ अॅप्लाइड इकॉनॉमिक रीसर्च, नवी दिल्लीच्या अभ्यासानुसार कापड गिरण्याचे नफ्याचे प्रमाण अवास्तव नाही. शिवाय कामगारपुढारी जी कापडाची किंमत लक्षात घेताहेत ती विक्रीची ex-factory नव्हे. त्यात मग एजंटाचा, होलसेलरचा, सेमीहोलसेलरचा, रीटेलरचा नफा लावला जातो. त्यांचा एस्टॅब्लिशमेंटखर्च आणि फायदा नको का विचारात घ्यायला ! त्यातूनही ह्या सगळ्या गोष्टीचा पुन्हा अभ्यास व्हावा, त्यातून काय निष्कर्ष निघतो ते पहावे. कामगारांना पगारवाढ देण्यासारखी परिस्थिती असेल तर जरूर द्यावी. त्याला आमचा विरोध नाही; पण प्रथम संप करायचा, मग युनिअन स्थापायची, मग मागणी करायची ह्या पद्धतीला आमचा विरोध आहे. ठरलेला करार खोटा आहे म्हणायचे त्या वेळी ज्या ज्या युनिअनने लवादाला पाठिंबा दिला ते लबाड, लवाद वगैरे सगळे झूट आणि मी सांगतो ते मात्र खरे म्हणायचे, हो जी प्रवृत्ती आहे ना ती घातक आहे ! अस्तित्वात असलेला लवाद खोटा म्हणायचा आणि कायदा स्वत:च्या हातात घ्यायचा ही वृत्ती चूक आहे. त्याला आमचा विरोध आहे. ह्या पद्धतीने औद्योगिक शातता रहाणार आहे का ? ह्या पद्धतीने तुम्ही कामगार – चळवळ चालवणार का ? दत्ता सामंत आज आहे, उद्या सवाई दत्ता सामंत येऊन ८०० रु. पगारवाढ मागेल हे चुकीचे आहे.

प्रश्न : करार आहे हे ठीक; पण अचानक महागाई वाढली तर कामगारानी काय करायचं ? करार संपायची वाट पहात तसंच जगायचं का ? उपाशीपोटी काम करत रहायचं का ? तुम्ही ह्या मागण्यांचा कामगारांसाठी सहानुभूतीने का विचार करत नाही ?

■ करार झालेला आहे तरी B I. R. कायद्यात तरतूद आहे की, करार जरी सहा वर्षांचा केला तरी वर्षानंतर तो संपुष्टात आणता येतो. तशी मागणी करता येते. तो सपुष्टात आणल्यानंतर नव्या बदलत्या परिस्थितीनुसार मागण्या मागता येतात. ह्यानी आज तारखेपर्यंत कधी आपली मागणी कळवली नाही. आमच्याकडे एकही पत्र आले नाही. मागणी आली नाही. धडाधड सपच सुरू झाले ! ह्यामुळे अराजक माजेल. सामंत सांगतात की, मागण्या केल्या होत्या; पण आता ६ मार्च ८२ ला त्याच्या मागण्याचे पत्र सरकारला आले. म्हणजे संप सुरू झाल्यावर. आम्हाला तर अजून काहीच आले नाही. गिरणीमालकसंघ कामगारांच्या मागण्या ऐकायलाच तयार नाही असे मुळीच नाही. आम्ही गप्प आहोत. कारण विरोध आमचा ह्या एकूण 'मेथडला' आहे.

प्रश्न : कामगार ज्या परिस्थितीत आज संपाला तोंड देताहेत त्यावरून वाटतं की, खरोखरच ते फार अटीतटीला आले आहेत. 'वाटेल ते हाल काढू; पण संप चालू ठेवू !' इतकी चीड त्यांना आहे, ती त्याचा फार गैरफायदा घेतला जात होता म्हणूनच नाही का ?

■ नाही, मला तसं वाटत नाही. त्याचे Expiotation व्हावे अशी आजची परिस्थिती नाही.

प्रश्न : असं कसं म्हणता ? ४०० रु. पगारात किंवा बदलीचा माणूस २५० रु. पगारात जगणार कसा ?

■ हे म्हणणे चुकीचे आहे. वस्तुस्थिती वेगळी आहे. सगळ्याना रोज ३० रु. पगार मिळतो. ह्या पगारात कामगार उपाशीपोटी काम करतोय किंवा त्याला वाजवीपेक्षा कमी पैसे मिळतात असे म्हणता येईल का ? पैसा कसा वापरायचा हेही महत्त्वाचे आहे. त्याची खर्च करायची पद्धत कशी आहे, पैसा कसा वापरायचा हे तो लक्षात घेतो का ? आज त्याला १००० रु. रोज दिला तरी तो सुखी होणार आहे का ? आणि तुम्ही म्हणता तसा कमी म्हणजे ६०० रु. पगार मिळवणाऱ्या कामगाराची संख्या फार कमी आहे. २० टक्केसुद्धा नाही. तुम्ही मझगाव डॉकला जा आणि पहा तिथे कामगाराला काय मिळते. त्याना ह्याहीपेक्षा कमी मिळतात. (तसे हमालाला त्याहीपेक्षा कमी मिळतात. ही काय तुलना झाली का ? आणि ह्याला उत्तर म्हणायचे का ?)

प्रश्न : कोहिनूर मिलचा कामगार म्हणतो १९४५ मध्ये लागलो तेव्हा ३० रु. पगार होता. आज ६०० रु. मिळतो. म्हणजे पगारवाढ काय मिळाली इतक्या वर्षात ? आणि त्यात त्याचे भागत नाही

■ हां, म्हणजे वाढीचे प्रमाण कमी आहे हे त्याचे म्हणणे तो माडू शकतो; पण मुळीच पगारवाढ मिळाली नाही म्हणू शकत नाही आणि आपल्याला भागेल एवढे पैसे कोणी देऊ शकत नाही. मिळालेल्या पैशात भागवायचे असते.

प्रश्न : हे तुम्ही आता ज्या खुर्चीत आहात तिथे बसून म्हणणे सोपे आहे. हे पैसे फार कमी आहेत असे तुम्हाला प्रामाणिकपणे नाही का वाटत ?

■ मग ते त्यांच्या युनिअनने दाखवून द्यायला हवे. संप करून, कर्जाचा बोजा वाढवून हा प्रश्न सुटणार आहे का ? स्वतः उपाशी राहून मालकावर दबाव आणून सप करण्याचा हा प्रकार कशासाठी? त्यासाठी युनिअन मान्यता प्राप्त करून घ्या आणि रीतसर मागण्या करा !

प्रश्न : त्यातून काही निष्पन्न होत नाही हा अनुभव आल्यानेच तर हा संप नाही का झाला ?

■ मग पूर्वीच्या संपातून तरी कुठे फार निष्पन्न झाले आहे. हा पुढाऱ्यांचा डाव आहे. 'माझे हाल होताहेत म्हणून मला १० पैसे द्या. मी उपाशी आहे !' हे कामगाराला म्हणायला लावणे हे कामगारपुढाऱ्याचे कर्तव्य आहे का ?

श्री. विजय नागर यांनी सांगितले की, 'कापडधंदा शेतीवर अवलंबून आहे म्हणून तो फार अस्थिर आहे. कापूसउत्पादनावर नफाफायदा अवलंबून आहे. बंपर क्रॉप आले तर जेवढा मोठा फायदा होतो तेवढाच तोटा पिकाची नुकसानी झाली तर होतो. आम्हाला खूप फायदा होतो असे विधान करताना ही वस्तुस्थिती पुढारीमंडळी लक्षात घेतात का ?'

त्यांनी वारंवार ठणकावून सांगितले की, मान्यता नसलेल्या युनिअनशी आम्ही कधीच बोलणी करणार नाही ! ज्या दिवशी सामंत मान्यता मिळवतील त्या दिवशी बोलणी करू !

प्रश्न : डॉ. सामंतांशी युनिअन मान्यताप्राप्त नाही म्हणून बोलणी न करण्याचे धोरण हटवादीपणा म्हणून आहे का स्वार्थ म्हणून ? कारण पूर्वी कॉ. श्रीपाद डांगे यांची युनिअन मान्यताप्राप्त नसतानाही तुम्ही त्यांच्याशी वेळोवेळी बोलणी केलेली आहेत.

■ डांगेंशी आम्ही कधीच बोलणी केलेली नाहीत. रा. मि. म. संघाशी १९७३ ला तो करार झाल्यानंतर त्या करारानुसार कामगाराना वेतन मिळण्यापूर्वीच डांगेंनी संप केला. संपानंतर पूर्वीच्या करारानुसार जेव्हा रक्कम कामगारांच्या हाती पडली तेव्हा त्याना ती डांगे-कमाई वाटली !

प्रश्न : मा. मंत्रीसाहेबांशी मुलाखत घेत असतानाच ते म्हणाले, 'असे ऐकिवात आहे की, मालकमंडळीसुद्धा संपामागे आहेत. मालकाचे स्टॉक वाढल्याने त्यानीच ह्या संपाला प्रोत्साहन दिले आहे.'

■ अगदी चुकीचे आहे. गिरण्या बंद राहिल्या तरी काही खर्च चालू असतातच. आमचा सध्या रोजचा खर्च ७० लाख रुपये — संपकाळातला — आहे. कापडाचा साठा संपून त्याचा आलेला पैसाही संपत आलाय. नवीन माल बनत नसल्याने तारण ठेवायला काही नाही, अशी परिस्थिती असताना मालकच संपामागे आहेत हे म्हणणे फार चुकीचे आहे. गिरणीउद्योग हा रोजगारप्रधान आहे. आधीच नव्या कृत्रिम धाग्याच्या स्पर्धेने अडचणी आहेत. परदेशी कापडनिर्यातीत एके काळी भारताचा दबदबा होता; पण आज अशी केविलवाणी अवस्था आहे की, हॉंगकॉंग-कोरियासारख्या अत्यंत छोट्या राष्ट्रानीही भारताला मागे लोटले आहे. सध्याच्या संपाने ह्या धंद्याची अधिकच पीछेहाट होईल, कामगार आपत्तीत सापडेल. राष्ट्रीय उत्पन्न घटेल. तेव्हा संप मागे घ्यावा. तज्ज्ञांच्या पहाणीला आणि सत्य शोधायला आम्ही नेहमीच तयार आहोत. ¤

एकूण मालकमंडळी संपामागच्या मूलभूत प्रश्नाचा विचार करण्यास तयार दिसली नाहीत. उलट हातावर बसलेली माशी झटकावी इतक्या सहजपणे 'आमचा विरोध method ला आहे, नेतृत्व करण्याच्या पद्धतीला आहे' अशी वरवरची कारणे देऊन स्वतःवरची जबाबदारी झटकून टाकताहेत असे वाटले. □

# "काही तरी तडजोड सरकारकडून अपेक्षित आहे." "कसली तडजोड ? कुणाशी तडजोड करायची ?"

## — मजूरमंत्री श्री. भगवंतराव गायकवाड

संध्याकाळी ५ ची वेळ, मंत्री श्री. भगवंतराव गायकवाड यांच्याकडे मिळाली. तेव्हापासून सचिवालयात बसले होते. बरीच कामगारमंडळी, 'फिट टाइट नट' नामक कुणा कंपनीतील संप मंत्रीमहोदयांच्या मध्यस्थीने मिटवण्यास आली होती. घड्याळाचा काटा पुढे जात होता. P. A. सांगत होते जरा थांबा, आता संपेल ! दरम्यान काही मंडळींनी ही बाई २/२।। तास का बसली आहे म्हणून चौकशी केली असावी. ७।।/७।। ला हातात फुलाचा गुच्छ घेऊन काही मंडळी माझ्यापाशी आली. म्हणाली—

'बाई, इतका वेळ तुम्हाला आम्ही इथे पहातोय—P. A. साहेबानी तुमच्या अंकाबद्दल माहिती दिली. आमच्यासाठी तुम्ही एवढे कष्ट घेताय. आमच्या भावना म्हणून हा गुच्छ घ्या ! काही गैर वाटून घेऊ नका !' मला भरून आले.

आठ वाजता मा. भगवंतराव गायकवाडांची मुलाखत घ्यायला मला आत बोलावले गेले. काल पाहिलेली कामगारांची परिस्थिती, त्यांची दु:खे, त्यांचा संताप, त्यांची दुःखे मंत्रीमहोदयांच्या ठराविक साच्याच्या बोलण्यात आणि आश्वासनाच्या जंजाळात कुठेच जाणवली नाहीत.

शासनाने अमलात आणलेल्या कामगारविषयक कायद्यांमुळे शांततेच्या मार्गाने कामगारांचे प्रश्न सुटू शकतील असे सरकारला वाटत असले तरी न्यायदानात लागणाऱ्या वेळामुळे कामगारांचा, पुढाऱ्यांचा त्यावरचा विश्वासच उडालाय. काही तरी तात्कालिक मार्ग काढून हिंसाचार माजलाय. औद्योगिक अशांती माजलीय, हे सरकार लक्षात घेत नाही, का जाणूनबुजून दुर्लक्ष करण्याचा हा एक प्रकार आहे ?

समाजात होणाऱ्या कुठल्याही सार्वजनिक घडामोडीबद्दल सरकारचे धोरण काय ? हे कुतूहल प्रत्येक सामान्याला असते. ह्याच कुतूहलापोटी मुंबई गिरणीसंपात सरकार काय हस्तक्षेप करणार आहे ? ह्या संपाकडे राज्याचे होणारे आर्थिक नुकसान म्हणून आणि सर्वसामान्य 'भरडला जाणारा कामगार' म्हणून सरकार कुठल्या दृष्टीने पहाते आहे ? हे प्रश्न मनात येतात. संपावर असलेल्या ५९ कापडगिरण्यांमध्ये आज सुमारे सव्वादोन लाख कामगार आहेत. इथे जर आगडोंब उसळला तर मुंबई शिल्लक राहील का ह्याची दखल शासन कितपत गंभीरपणे घेत असावे ? कारण वृत्तपत्रात 'सामंतांच्या युनियनशी बोलण्यास नकार—विधानपरिषदेत गोंधळ' ह्या मथळ्याखाली आलेला मजकूर असा :

'आमदार दत्ता सामंतांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र गिरणी कामगार युनियनशी संप मिटवण्याप्रकरणी वाटाघाटी करण्याची मागणी आज राज्यसरकारने फेटाळली ! गेले दोन महिने हा संप चालू आहे. सरकारची ह्या बाबतची ठोस भूमिका कामगारमंत्री भगवंतराव गायकवाड यांनी आज विधानपरिषदेत जाहीर करताच गोंधळ आणि आरडाओरडा झाला !'

कामगारमंत्री गायकवाड ह्यांच्याशी बोलताना कळले की, त्यांनीही कामगार म्हणून काम केलंय. ते म्हणाले, ‘कामगारांच्या अडचणी मला कळू शकतात.’ मला प्रश्न विचारायला उत्साह आला.

**प्रश्न :** सामंतांशी युनियनमान्यता प्राप्त नाही म्हणून बोलणी करायला तुम्ही नकार दिलात. कारण मान्यताप्राप्त युनियन कॉंग्रेसची आहे. त्यामुळे त्यांच्याशी बोलणी करणे फायद्याचे होईल असे वाटले का ?

**उत्तर :** नाही; पण युनियन म्हटल्यावर त्याला काही नियम आहेत. कोणीही उठून म्हणेल माझी युनियन, मी केलीय. तुम्ही बोलणी करा; तर ते योग्य आहे का ? कामगारांच्या हिताच्या दृष्टीनेसुद्धा संघटनेच्या बाबतीत स्थिरता असली पाहिजे म्हणजे त्या सशक्त होतात. कमजोर रहात नाहीत. उदा. आज तुम्ही नेतृत्व करता आहात एखाद्या क्षेत्रात आणि तुम्ही मालकांशी वाटाघाटी केल्या, ॲग्रिमेंट केले ३ वर्षांचे, ४ वर्षांचे, की आपण ह्या प्रश्नावर पुन्हा बोलायचे नाही एवढा काळ. नंतर आपण परत बसू. उद्या दुसरे कुणी कामगारांसमोर गेले आणि त्याने सांगितले की, हे जे ॲग्रिमेंट आहे ते चुकीचे आहे. ह्यापेक्षा जास्त मी तुम्हाला मिळवून देईन. चला संपावर जा ! तर आज झालेले ॲग्रिमेंट दुसऱ्या दिवशी तुटेल ! कामगारांना काय, जो म्हणेल जास्त मिळवून देतो, तो हवा ! तो किती मिळवून देतो हा मुद्दा महत्त्वाचा नाही. डॉ. सामंतांचे जे म्हणणे आहे की, मी कामगारांना खूप मिळवून दिलंय, ते एकदम चुकीचे आहे ! आज अनेक कारखाने डबघाईला आलेत. ९ महिने–वर्षापासून बंद आहेत. टेक्सटाइलचे नाही मी बोलत. टेक्सटाइल संघ सुरू होऊन थोडे दिवस झालेत. तेव्हा ज्या ठिकाणी ॲग्रिमेंट होते तिथे जाऊन हे सांगतील की, मी पैसे जास्त मिळवून देतो तर कामगार त्यांच्यामागे जातोच; पण त्यामुळे कामगारांत स्थिर नेतृत्व होणार नाही. न्याय्य हक्क त्यांच्या पदरात पडणार नाहीत. ह्या देशाचे आणि सगळ्यांचे नुकसान होईल म्हणून शासनाचे धोरण असे आहे की, कायद्यानुसार ज्यांना मान्यता आहे त्याच संघटनांशी बोलायचे. दत्ता सामंतना जर वाटते की, माझ्यामागे सगळ्यात जास्त कामगार आहेत तर त्यांनी मेंबर्स एनरोल करायला पाहिजेत, Challenge करायला पाहिजे की, मान्यताप्राप्त युनियनपेक्षा माझ्याकडे जास्त मेंबर आहेत. आम्ही पडताळून पाहू असे करायला आम्ही काही बंदी घातली नाही त्यांना. असे पूर्वी झालेय. बेस्टमध्ये आधी कॉंग्रेसची युनियन मान्यताप्राप्त होती. नंतर जॉर्जला मिळाला. त्या पद्धतीने ह्यांना जायला कुणी मनाई केलेली नाही.

**प्रश्न :** पण आता संप दोन महिने चाललाय. अडीच लाख कामगारांचा प्रश्न आहे रोज चार कोटी नुकसानीचा प्रश्न आहे ! युनियनमान्यता प्राप्त करून घ्या, मग सरकार विचार करेल, हे धोरण हटवादीपणाचे आहे. काही तरी तडजोड सरकारकडून अपेक्षित आहे.

■ कसली तडजोड ? कुणाशी तडजोड करायची ? पुलोद सरकारच्या वेळीच गिरणीकामगारांचे एक ॲग्रिमेंट झाले आहे. ॲग्रिमेंट जरी राष्ट्रीय मिलमजदूरसंघाबरोबर झाले असले तरी त्यामध्ये उद्योगमंत्री ह्या नात्याने जॉर्ज फर्नांडिस होते. त्यात गिरणीकामगारांना ४५ रु. वाढ, वार्षिक ६० रुपये इन्क्रिमेंट आणि वार्षिक एक दिवसाची जास्तीची सुट्टी असा करारनामा झाला. त्यातली एक अट अशी की, आर्थिक बोजा पडेल अशी कुठलीही मागणी आम्ही १९८४ पर्यंत करणार नाही. आता हे ॲग्रिमेंट करण्यात सगळेच पक्ष सामील होते–सही संघाची असली तरी. मग हे तोडायचे का त्यांनी ? उद्योगात पगारवाढ हवी म्हटल्यावर त्याचा अभ्यास करावा लागेल. तो अभ्यास करायची शासनाची तयारी आहे.

**प्रश्न :** केंद्रसरकारची त्रिपक्ष कमिटी काय करणार आहे ?

■ त्रिपक्ष कमिशन आम्ही नियुक्त करू. (कमिटया नेमणे म्हणजे राजकारणातली फसवेगिरी असे कामगारांचे मत) अभ्यासमंडळ तयार करू. सबंध देशात कापडगिरणीधंदा कसा चालतो, त्यात नफा किती आहे हे पाहू. कापडाचे भाव काही कमी होत असतील तर ते करायला लावू, कामगारांना जास्त देता आले तर ते द्यायला लावू, हे सर्व करायची आमची तयारी आहे !

**प्रश्न :** ही Time consuming क्रिया आहे, ह्या संपाबद्दल तात्काळ सरकार काय करणार आहे ?

■ अहो, हा प्रश्न टेबलावर बसून अमुक एवढी पगारवाढ देऊ असे सांगण्याजोगा नाही. आम्हाला असे सांगावे लागेल की, पगार अमुक एवढे वाढवा, मग ठीक आहे. कापडाचे दर २५% वाढवून द्या !

**प्रश्न :** आज सर्वसामान्यांना हीच चिंता आहे की, कामगारांचे पगार ३००/४०० रुपयांनी वाढल्यावर कापडाचे दर किती वाढणार?

■ वाढणार ना ! कापडधंद्यात किती फायदा होतो मला माहीत नाही. त्याबद्दल मी साशंकच आहे. शिवाय खरं–खोटं मला माहीत नाही; पण मालकांचे स्टॉक वाढल्याने त्यांनीच संपाला प्रोत्साहन दिले असे म्हणतात. असे जर असेल तर फारच वाईट–म्हणजे अप्रत्यक्षरीत्या कामगारच चळवळीच्या माध्यमातून मालकांना मदत करतोय. तेव्हा कामगारचळवळ कशी असावी हे कामगारांना समजले पाहिजे. एक स्थिर नेतृत्व हवंय. कामगारांना ह्या परिस्थितीतून जावे लागतेय ह्याचे आम्हालाही दुःख आहे. ह्यातून लवकर तोडगा निघावा हीच आमची भूमिका आहे.

**प्रश्न :** पण लवकर तोडगा निघावा म्हणून शासन कुठे काय करतंय ?

■ पगार किती मिळाला पाहिजे, काय मिळाला पाहिजे ह हिशेबाचा प्रश्न आहे. शासन म्हणतंय की, तुम्ही सन्मानाने कामावर जा ! मालकांनी तुमच्यातल्या कुणाला काढून टाकले तर शासन त्याची दखल घेईल. कामगारांनी आपला प्रश्न शासनाकडे सोपवला पाहिजे. त्याच्यावर जो अन्याय होतोय तो दूर करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत !

# यातून निष्पन्न काय होते ?

## कॉ. डांगे यांच्याशी बातचीत

कॉ. श्रीपाद अमृत डांगेंना भेटले. मी त्यांना विचारले, ह्या संपाची परिणती काय ? परिणाम काय ?

–संप नेहमी सहजपणे ३–४ महिने चालतो. त्यानंतर तडजोड झाली नाही तर call off करायचा आणि चालायला लागायचे. त्याचे परिणाम २–४ लोकाना सस्पेंड करतात, २–४ लोकांना बाहेर टाकतात. मग पुन्हा ती गिरणी बंद होते. मग त्याना कामावर घेतात. हे सारखे चालूच असते. मग कधी तरी ६ महिन्यांनी हळूहळू त्या मागण्या पुऱ्या केल्या जातात.

असं असताना संप हा एकच मार्ग आहे का ? ते शेवटचे शस्त्र नाही का ?

– शेवटचे म्हणायला त्याच्या आधीचे precedent शस्त्र कुठले ?

मागण्या रीतसरपणे मागणे.

–मागण्या receive होत नाहीत. कारण तुम्ही मान्यताप्राप्त नाही, मागण्यांचा विचार होत नाही. संपवाल्या पुढाऱ्याना तुम्ही विचारत नाही. कारण मान्यता-प्राप्त युनियन वेगळीआहे.

ह्या संपामुळे खोलवर परिणाम समाजावर होईल का ?

–कदाचित संप फार काळ चालल्याने सगळेच ट्रेड आखडले की अर्थव्यवस्थाच कोलमडायला लागेल आणि मग रोजचे आयुष्य एका ठराविक चाकोरीने घालवणारा, भोवतालच्या परिस्थितीचा, समाजाचा फारसा विचार न करणारा प्रत्येक माणूस विचार करायला लागेल की, 'असे का झाले ?', 'हे संप का हो होतात ?'

–ह्या प्रश्नाची उत्तरे प्रत्येकजण आपापल्यापरीने शोधू लागतो. समाजातला मोठा माणूस आणि लहान माणूस आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींकडे चिकित्सकपणे पाहू लागतो. विचारमंथन समाजातल्या प्रत्येक स्तरावर सुरू होते. भोवतीच्या बदलत्या परिस्थितीला जबाबदार कोण, माझी स्वतःची ह्यात भूमिका कोणती हा मूलभूत प्रश्न प्रत्येकाच्या मनात उभा रहातो. प्रत्येक माणसाच्या मनात जागे झालेले हे प्रश्न कदाचित राज्यक्रांती घडवतील, कामगार-चळवळीला नवी दिशा देतील.

डांगे यांनी संभाषणाच्या ओघात बऱ्याच गोष्टी सांगितल्या होत्या.

" ब्रिटिश राजवटीत ६ दिवसावर संप झालेले आठवत नाहीत. They could not afford to let the things go on.

– मुंबईत टेक्सटाईल वर्करचे सार्वत्रिक संप कधी सुरू झाले, कसे सुरू झाले आणि कसे मिटले हे कामगार–चळवळीतल्या पुढाऱ्यांनासुद्धा माहीत नाही !

– कमिशन नेमणे वगैरेत काही अर्थ नाही. सगळी धूळफेक असते.

– आजपर्यंतचे सगळेच संप आर्थिक कारणासाठी झाले असं म्हणणं चूक आहे. १९३९ ला जेव्हा महायुद्ध सुरू झाले तेव्हा, 'आम्ही महायुद्धाविरुद्ध आहोत, हे भांडवलदाराचे युद्ध आहे' हे जाहीर करण्यासाठी कामगारानी one day strike केला. British government was surprised. यावरून वर्कर पोलिटिकली किती consious आहे ते दिसून येते.

– कामगाराला काही कळत नाही हे चूक. २ लाख कामगार स्वतः संपावर जातो, ते त्याला आपण संपावर का जातोय हे पक्कं ठाऊक आहे म्हणून.

– कामगारनेत्याची जबाबदारी आहे की, संपाच्या वेळी कामगाराला खूप वेळ असतो म्हणून त्याला राजकीय शिक्षण दिले पाहिजे.' "

एकूण आजच्या नेतृत्वाबद्दल कॉ. डांगे नाखूषच दिसले.

मला वाटले जे नेतृत्व 'fight to finish ह्याच तत्त्वावर विश्वास ठेवून लढते, कामगाराना कुठल्याही प्रकारे राजकीय–सामाजिक शिक्षण देण्याचा, त्यांच्या विचारशक्तीला चालना देण्याचा प्रयत्न करीत नाही असे नेतृत्व कामगाराला आणि पर्यायी कामगार–चळवळीला घातक ठरू शकते. नेतृत्वाचेच तत्त्वज्ञान, 'मी कुणाचेही ऐकणार नाही, माझे साऱ्यांनी ऐकावे !' असे असेल तर अशा नेतृत्वाखाली चाललेल्या चळवळीला तरी कुठले तत्त्वज्ञान असणार ?

मग ह्या संपाचा उपयोग काय ? परिणती कोणती ? केवळ संप करणे –ह्यातून काही अर्थलाभ कामगाराला होणे अथवा न होणे–काही काळ गेल्यावर पुन्हा दुसरा संप होणे, ह्यातून काय निष्पन्न होणार ? ☐

# गिरणगावातून हिंडताना..फिरताना

प्रकाश विनायक कामत

'मुंबई चोवीस तास जागी असते !' असे नेहमी म्हटले जाते. कुलाब्यापासून मुलुंड–दहिसरपर्यंत पसरलेल्या मुंबईच्या अनेक भागांपैकी 'गिरणगाव' मात्र चोवीस तास जागा असायचा, जिवंत असायचा.

दोन-अडीच महिने झाले, ज्या रस्त्यावर चोवीस तास पावले वाजायची ते रस्ते रात्री दहा-साडेदहालाच मृतवत पसलेले असतात. उशीरा घरी परतणारी माणसे निर्मनुष्य रस्त्यांना घाबरून धावत घरे गाठतात. असा सन्नाटा, अशी शांतता, अशी निःशब्दता या गिरणगावाने कधीच पाहिली नव्हती. त्या रस्त्याना गिरणीचे धोटे कोणत्या दिशेने हलताहेत हे केवळ आवाजाने ओळखता यायचे. आकाशात उंच गेलेली धुराडी, आधाराने प्रेते उभी करावीत तशी उभी आहेत. धुराने रंगणारे आकाश कित्येक दिवस निरभ्र आहे. आजूबाजूची चाहूल घेऊन एखाद्या भित्र्या मुलाने कारणाशिवाय ओरडावे, तसे गिरणीचे भोंगे वाजताहेत. त्या भोंग्यांच्या आवाजाने पूर्वी माणसांची धावाधाव व्हायची, गिरणीवर वेळेवर पोहोचू इच्छिणाऱ्या कामगाराच्या चालीत वेग यायचा; पण आता हे सगळे बंद

झालेय, दोन-अडीच महिने गिरणगाव शांत आहे. अगदी सगळीकडे स्मशानशांतता पसरलीय !

तरीही माणसे सवयीने नेहमीच्या वेळी उठतात आणि मिलच्या दिशेने चालायला लागतात, अगदी कामावर जाण्याच्या घाईने......

'नाही, आता आमच्या मागण्या मिळाल्याशिवाय आम्ही कामावर जाणार नाही. सरकार म्हणतं 'कामावर या, मग पाहू !' आतापर्यंत सरकारचं ऐकून कामावर गेलेल्या कामगारांचं या सरकारनं कितीसं भलं केलंय? काही खरं नाही हो ! 'आमचं सरकार गरिबासाठी यव करणार–त्यं करणार.' असं म्हणणारे हे मंत्री श्रीमंत गिरणीमालकांची बाजू घेताहेत. अहो, त्यांच्याकडून पैसे मिळतात ना !'

गिरणीकामगार हा आतापर्यंत एक अतिशय सामान्य माणूस समजला जायचा; पण तोही आता विचार करायला लागलाय. डोळसपणाने जगाच्या व्यवहाराकडे पहायला लागलाय. दरवर्षी दिवाळीपूर्वी ह्या गिरणगावात एक वेगळी लाट पसरते. बोनससाठी संप सुरू होतात. ...'कामावर जाऊ नका...' असे ओरडत गाड्या फिरू लागतात! आज असे कुणालाही सांगावे लागत नाही. प्रचारासाठी गाड्या फिरत नाहीत.

'आम्हाला कामावर जाऊ नका म्हणून कुणी सांगण्याची गरज नाही. हा संप आम्ही केलाय. कोणत्याही गोष्टीला मर्यादा असतात. तुम्ही पहाताच, आजूबाजूला महागाई कशी वाढत चाललीय ! दहा रुपये घेऊन सकाळी बाहेर पडलं की संध्याकाळी खिसा रिकामा ! सायेब, माझ्या हातात किती पगार येतो माहीत आहे? सगळं कट करून तीनशेवीस रुपये माझ्या हातात पडतात, घरात सहा माणसं. भागवायचं कसं? त्यात एक पोरगं कायमचं बिस्तऱ्यावर. औषध नाही दिलं तर पोर हातचं जायचं !'

'बाकीच्या कंपन्यातून काम करणारी आमच्याबरोबरची माणसं हजार-दीड हजार पगार मिळवतात. मग आम्ही गिरणी-कामगारांनीच काय घोडं मारलंय? आम्हाला महागाई नाही? 'कामावर या, कामावर या' म्हणून सांगणारे हे मंत्री आम्हाला फुकट धान्य देतात की, आमच्या पोराबाळांना शिकवतात? साहेब, आमचं पोट जळायला लागलं म्हणून आम्ही आमच्या मनाने गिरणीबाहेर पडलोत. कुणी जबरदस्तीने नाही बाहेर काढलं !'

डोळे उघडे ठेवून पहाणाऱ्या कुणाही माणसाला गिरणी-कामगाराबद्दल कळवळा वाटेल. त्यांचे प्रश्न इतके ज्वलंत असतील तर त्यांच्या मान्यताप्राप्त युनियनने काही तरी करायला हवे. वेगवेगळ्या दिशेने खंबीरपणे उभे असलेले तीन तुकडे सांधायला हवेत.

'संघाला काही जमणार नाही. गेल्या तीस-पस्तीस वर्षांत संघाच्या कार्यकर्त्यांनी आपली आपली माणसं कामाला लावली. कामावर असलेल्यांना वर चढवले. त्यांच्याकडून पैसे खाल्ले. मालकाचे पाय चाट, हाजी हाजी कर याशिवाय संघाच्या नेत्यानी काही केलं नाही. तो राष्ट्रीय मिल मजदूर संघ आता काय करणार? असे संप करायला हिम्मत लागते!'

'आम्हाला भरीव वाढ हवीय. कामगारांच्या अडचणींचा विचार झाला पाहिजे. तीस वर्षांपूर्वी ठरलेले पगार आजही मिळतात आणि ते आम्ही काहीही न बोलता घ्यायला हवेत.' असं सगळ्यांचं मत आहे. संघाबद्दल बरेच वर्षं धुमसत असलेला राग प्रत्येकाच्या मनात होता. 'आमच्या अडचणी चव्हाट्यावर आम्हाला मांडायच्या होत्या. म्हणून आम्हाला नवा नेता हवा.... म्हणून दत्ता सामंत!'

नेहमीचे घडवून आणलेले संप आणि हा गिरणीचा संप यात फरक आहे. चौसष्ट गिरण्यांचा संप दोन-अडीच महिने चाललाय; पण कुठेही दंगा-धोपा नाही !

'इतर संपात आणि या संपात फरक आहे, असायलाच हवा ! दत्ता सामंत आमचे पुढारी असले तरी त्यांनी सांगितलं आणि हा संप झालाय असं नाही. प्रत्येक कामगार मनाची तयारी करूनच बाहेर पडलाय. तसं नसतं तर संप केव्हाच फुटला असता !'

संप सुरू झाला की, एक गोष्ट सांगितली जाते, पटवून दिली जाते. 'कोणत्याही संपामुळे उत्पादन घटते. त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. म्हणजेच देशाला–पर्यायाने आपल्याला त्याची कळ सोसावी लागते.'

'हे उपदेश नेहमीच ऐकतो आम्ही. आम्हाला त्याग करा म्हणून सांगितलं जातं; पण त्याग करणाऱ्या माणसाची कितीशी उदाहरणं आहेत? अगदी वरपासून खालपर्यंत सगळेजण स्वार्थाचा विचार करतात. मग मिल-कामगारांनीच त्याग करायचा? पण का? आतापर्यंत आम्ही खूप त्याग केलाय !'

साठ दिवसानंतरही माणसं गिरण्यांच्या प्रवेशदारापर्यंत जात नाहीत. पोलीस आणि एस. आर. पी. च्या गाड्या प्रत्येक गेटवर उभ्या आहेत. माणसे जवळच्याच एखाद्या ठिकाणी जमतात; पण अजूनही भविष्याबद्दल काही सांगता येत नाही. सगळेच बेभरवशाचं. आणखी किती दिवस संप चालेल हे कुणीही सांगू शकत नाही. कधीकधी एक भीतीही मनात दाटून येते, 'संप आणखी वर्ष-दोन वर्ष चालला तर...? तर ही माणसे तग धरतील का?' भविष्य जितकं काळोखात आहे तितकाच आताचा त्याचा वर्तमानकाळसुद्धा !'

'आम्ही दोघेही म्हणजे मी आणि माझा मुलगा एकाच मिलमध्ये काम करतो आम्ही पूर्वीच्या आठ मिलचे कामगार. आमच्या संपाला सहा महिने उलटून गेले. मुलाला गावी पाठवला. गावी खर्च थोडा कमी होता.'

'आमच्या धन्यांनी शहाणपणा करून तीन महिन्यांचं धान्य अगोदरच भरलंय. आणि माझ्या दोन मुलानी नारळाचा धंदा टाकलाय.'

'महिनाभर संप मिटेल म्हणून वाट पाहिली. मग भाजीपाला विकायला सुरुवात केली. तेवढेच दिवसाकाठी दोन रुपये सुटतात.'

'मारवाड्याला देण्यासारख्या वस्तू घरी आहेत तोपर्यंत भीती नाही, एकदमच कठीण दिवस आले की बघू !'

'घामाच्या पैशाने मिळवलेले सोने कामाला आले. सोनं विकताना जिवावर येतंय; पण जीव जगवायचा म्हणजे पोटाला खायला मिळायलाच हवं !'

'याच्याकडून घे, त्याच्याकडून घे असे पैसे घेऊन दिवस ढकलतोत. कधी कुणाकडे पैसे मागायची सवय नाही म्हणून जड जातं.'

'पोरगा एका फॅक्टरीत आहे हेल्परमध्ये त्याच्या दोन–अडीचशे रुपयात रेटतोय कसं तरी !'

'साहेब, मी आंधळा, वीस वर्षांपूर्वी वेतकाम शिकलो होतो आज त्या कामावर पोट भरायचा प्रयत्न करतो.'

'मिलचा संप सुरू झाला. घरी बसून काय खाणार? चार घरची भांडी घासते.'

या धडपडीमागे एक आशा आहे. आज ना उद्यां संप मिटेल. नुसता मिटणार नाही तर आपल्या मागण्या मान्य होतील. पगारवाढ मिळेल सकाळीच मिलच्या गेटपाशी आशेने माणसे जमतात. कष्टाने, वेदनेने ओढलेल्या चेहऱ्यावर ती आशा शोधावी लागते. त्रयस्थपणे पाहिले तर त्या चेहऱ्यांवर सुरकुत्या दिसतात. सगळी शरीरे विस्कटलेली, खचलेली!

'आम्ही खचलोत असं समजू नका. जास्तीत जास्त काय होईल? भांडीकुंडी विकावी लागतील; पण मागण्या मान्य होईपर्यंत गिरणीत पाय ठेवणार नाही!'

'खरं आहे तुमचं म्हणणं, सगळं विकून पैसे संपले की, दुसऱ्या मजल्यावरून उडी मारायची! नाही तरी आम्ही किडयाचंच जिणं जगतोय ना?'

''पैशाशिवाय मुबईत जगायचं म्हणजे कठीणच; पण आता लाचार होऊन आत गेलो तर मात्र मरेपर्यंत काहीच मिळणार नाही!'

'थोरला मुलगा काल कंपनीत गेला होता नोकरीसाठी. त्याला नोकरी लागली की, चालू दे कितीही दिवस संप; पण गिरणीत पाय नाही ठेवणार!...'

आज सर्वस्वाचा त्याग करून जगणाऱ्या या कामगारांकडे अन्य समाज कानाडोळा करीत आहे असे मात्र नाही. समाजात घडणाऱ्या कोणत्याही घटनाचे पडसाद संपूर्ण समाजावर अल्पांशाने म्हणा ना;पण उमटत असतात.

'इतका शांततेने चाललेला मिल-कामगारांचा संप मी यापूर्वी कधीच पाहिला नव्हता! मारामारी, भोसकाभोसकी या प्रकारानेच पूर्वीचे संप चालायचे.'

'सरकारने कामगारांचा अधिक अंत पाहू नये. कित्येकांच्या घरात मीठ-भाकरीवर दिवस चाललेत. भुकेपोटी काहीबाही घडून जायचं.'

'आमच्या नितीनच्या वर्गात एक हुशार मुलगा होता. चार महिने झाले गावी जाऊन बसलाय. पोराच्या शिक्षणासाठी इथं थांबायचं मग बेकार माणसानं खायचं काय? कसे सहा-सहा महिने संप करतात ही माणसं तेच समजत नाही बघा!'

एखादा संप सुरू झाला की, तो चालावा, कामगाराना त्याच्या मागण्या मिळाव्यात असे मानणारा एक गट असतो, तर दुसऱ्या बाजूची माणसे मालकाने किंवा सरकारने तो संप चिरडावा अशी अपेक्षा करणारी असतात. या संपाबाबत थोडा वेगळा अनुभव येतो.

'सायब, आम्ही सोना, भाडी गहाण ठेवून पैसे दिले; पण लोकांची लय दया येते संप केव्हा संपेल ते सागता येत नाही. व्यवहार पाहून आम्ही पैसे व्याजाने द्यायचे थाबवले; पण कामगारलोक पैशासाठी काय बी विकायला आणतात. आणखी महिन्याभरात माणसं विष खातील! काहीही झालं तरी संप मिटला पाहिजे!'

'सरकारला कळायला हवं की कामगार हा तळाचा सामान्य माणूस असला तरी तोच संपूर्ण गिरणीचा पाया असतो. त्याच्यावरच अन्याय होतोय. आडमुठ्या धोरणाने ताणून धरण्यापेक्षा संप सपवायला हवा...कामगारांच्या रास्त मागण्यांचा विचार व्हायला हवा...'

'वेगळ्या बाजूने पाहिले तर या संपाला सरकारचा विरोध हा व्यक्तिनिष्ठ आहे; पण कामगारांचे हाल कशाला? प्रतिष्ठेचा प्रश्न न व्हावा हे माझं एक नागरिक या दृष्टीने मत.'

'साहेब, मिल चालू असताना चार-पाच खानावळी होते. त्यांच्यावर मी चार मुलांचं घर चालवायचे. आता संप सुरू झाला आणि माणसं पटापट गावाला निघून गेली. म्हणजे माझासुद्धा संप सुरू झालाय्. माझ्याकडे असलेले खानावळी शंभर-दीडशे रुपये गावी पाठवायचे. या महागाईत कसे पुरणार शंभर-दीडशे? आणि ते तरी काय करणार? पगारच किती कमी, तेवढ्यात स्वतःचं भागवायचं आणि गावचं करायचं. त्यांनी संप केलाय. काही तरी वाढ मिळून संप संपायला हवा!'

'आणखी काही दिवसांनी मुंबईची गुन्हेगारी प्रमाणाबाहेर वाढेल! संप संपला नाही तर त्या गरीब कामगाराने तरी काय करावं? कुणी तरी तडजोड करायलाच हवी. सरकारने, मालकानी कुणीही!'

'हा संप फोडून चालणार नाही. गरीब कामगाराने आजपर्यंत काही मागितले नाही आणि आपल्याकडे नुसतं मागितलं आणि मिळालं असं कधी झालंच नाही. कुणीही हक्क मागायला लागला की त्याला दाबायच ही मालकवर्गाची आणि सरकारची वृत्ती दिवसेन् दिवस वाढतेय. हा संप तरी सरकारने चिरडू नये! मालकधार्जिण्या सरकारचं पितळ केव्हाच उघडं पडलंय म्हणा; पण ह्या संपाचा निकाल कामगारांच्या बाजूने लागायला हवा!'

कामगाराना परके वाटावे इतक्या परकेपणाने बाकीचे समाजबांधव वागत नाहीत. एक संयमी दृष्टिकोनच इतरांचा दिसतो. मुंबईतील दुकाने दहा ते पंधरा तारखेपर्यंत खच्चून भरलेली असायची. त्यांना वाळवंटाचे रूप आले आहे! एका बाजूने ही अशी अवस्था तर दुसरीकडे प्रसिद्धीची माध्यमे गिरण्या चालू झाल्याचे सागत आहेत. दूरदर्शन. आकाशवाणीच्या बातम्यांत ते दररोज ऐकू येत आहे!

'बससंपात दहा बसेस चालू ठेवून बसवाहतूक नियमित चालू होती' असं म्हणण्यासारखं आहे. रेडिओ आणि टी. व्ही. वरून गिरण्या चालू झाल्याचं सांगताहेत ना! मग धुराड्यांतून अजून धूर का येत नाही?'

कामगारानी हा संप जिद्दीने चालविला आहे; पण आताची स्थिती वेगळी दिसतेय. चितेत जगणारा कामगार एका दिशेला. तटस्थपणाच्या आवरणाखाली सरकार मालकांच्या विचारांचा माग घेतंय, तर कामगाराना चिरडून टाकण्याचा पण घेऊन उभे राहिलेला मालकसंघ! ज्या पुढाऱ्याचे नाव घेऊन संप चालू आहे त्याला मान्यता नाही आणि मान्यताप्राप्त युनियनचा थागपत्ता नाही! या सगळ्या परिस्थितीतं सहासहा महिने स्वयंस्फूर्त संप करणाऱ्या कामगाराना काहीच मिळाले नाही तर?....

'असं कसं? काही तरी वाढ मिळायलाच हवी. मी संघाचा कार्यकर्ता आहे. तरीही अगदी प्रामाणिकपणे वाटतं की संघ तीस वर्षांत कामगाराना भरीव असं काहीही देऊ शकलेला नाही! पन्नास सालच्या संपात मोरारजीभाईंनी आडमुठ्या धोरणाने संप चिरडला. त्यानंतर पंधरा वर्षे गिरणीकामगार कॉंग्रेसपासून दूर राहिला. आताचा आमचा संप फक्त अडीच लाख कामगाराचा नाही तर आमच्या कुटुबातील माणसे धरून दहा-बारा लाख माणसांच्या जीवनाचा प्रश्न आहे! सरकारने हा संप फोडायचा किंवा चिरडायचा ठरवलं तर? तर काहीही होऊ शकेल!'

'गरिबाचं राज्य, गरिबी हटाव अस सांगणाऱ्या सरकारबद्दल आम्ही समजायचं ते समजलोत. आम्ही गिरणीकामगारांनी संप केलाय. समाजातल्या अगदी तळाच्या माणसाने आपल्या हक्कांसाठी लढा सुरू केलाय. हा संप चिरडला तर जो उद्रेक होईल तो सरकारला खरंच कठीण जाईल!

जिवाची, आयुष्याची बाजी लावून गिरणगाव उभा राहिलाय! मिलमधल्या या कामगारांना कष्ट आणि वेदनांचे दान जन्मासोबतच मिळालंय. भविष्यकाळ हा कुणाच्याही दृष्टीनं अगम्यच असतो. मग या कामगारांच्या भविष्यात काय लिहिलंय? ☐

कल्पना नावाची एक सुस्वरूप गृहिणी.
ओढगस्तीचा कारकुनी संसार. नोकरी वर्ज्य.
पैशासाठी मग ती वळते बुवाबाजीकडे.
अंगात येणे, अंगारे–धुपारे, प्रसाद वगैरे सुरू होते.

कल्पनेच्या परिस्थितीचा गैरफायदा घेणारा एक तरुण,
बिनलग्नाचा, हुशार, श्रीमंत एक्झिक्युटिव्ह.

कल्पनेची स्त्रीबुवाबाजी
आणि एक्झिक्युटिव्हने तयार केलेला सापळा.

या सापळ्यातून बाहेर पडण्यासाठी
एका अष्टमीच्या रात्री
घागर फुंकता फुंकता,
भर देवळात कल्पनेने उगवलेला भयंकर सूड....

स्त्रीबुवाबाजीवर झोत टाकणारी
सत्यघटनेवर आधारित लघुकादंबरी

# माणूस

पुढील अंकापासून क्रमशः
अंकाची किंमत दीड रुपया
लेखक ? ? ?

या तरुण लेखकाची कामगार–मालक संघर्षावरील पहिलीवहिली ‘ लढा ’ ही कादंबरी
‘ माणूस ’ मधून पूर्वीच येऊन गेलेली आहे.
‘ लढा ’ कादंबरी वाचून गजानन जागीरदार यांनी लेखकास कळवले होते –
“ कथानक चित्रपटास अनुकूल आहे. पटकथाकार त्यात अनेक रंग भरू शकेल... ”
‘ लढा ’ नंतरचा लेखकाचा नवा प्रयत्न...

# ‘ स ब ला ’

एक नवा कोरा विषय प्रथमच कादंबरीरूपाने मराठीत येत आहे.
१७ एप्रिल अंकापासून

## साप्ताहिक माणूस, पुणे